


हृदयरेषेवर वर्तुळ असल्यावर दुबळे हृदय सुचवते. या रेषेवर रविच्या उंचवट्याखाली ते असेल तर दृष्टीपासून त्रास होतो.

हृदयरेषेचा फाटा चंद्रावर जात असून त्यावर फुली असल्यास अनुवंशिक वेडेपणा असतो.

अंत:करणरेषा व धनरेषा यांच्या छेदनबिंदूवर फुली असल्यास प्रेमामुळे पैशाची अडचण व त्रास होतो.

हृदयरेषेला बुधाच्या ग्रहस्थानाखाली एकेक रेषा छेदीत असेल तर व्यापारात अपयश सुचविते.

अंत:करणरेषेवर शनिच्या ग्रहस्थानाखाली ठिपका असेल, तर प्रेम ज्याच्यावर करणार ती व्यक्ती फार कामुक असते. त्यामुळे सुख मिळत नाही.

हृदयरेषेवर एक पांढरा ठिपका असेल तर प्रेमात यश मिळते. या रेषेवर बिंदू असता प्रेमापासून दु:ख व छातीची धडधड असते.

अंत:करणरेषेवर रविच्या ग्रहस्थानाखाली मोठा ठिपका असेल तर विवाहापासून दु:ख व त्रास होतो या त्रासास विद्वान माणसे कारणीभूत होतात.

हृदयरेषेवर लाल ठिपका असल्यास मेंदूत रक्तस्त्राव होण्याची भीती असते. काळा किंवा निळा ठिपका असल्यास संधीवात होतो.

हृदयरेषेला अनेक उभ्या रेषा छेदीत असतील तर प्रेमात निराशा होते.

हृदयरेषेतून रेषा निघून मस्तकरेषेला मिळत असतील तर भिन्नलिंगी व्यक्तीचे जीवितावर फार वजन असते.

आयुष्यरेषेतून रेषा निघून हृदयरेषेला मिळत असतील, तर प्रेमात काही वेळा निराशा होते. त्यामुळे त्रास होतो. हृदयविकारापासून अशा व्यक्तीने जपायला हवे.

शनिच्या उंचवट्याखाली हृदयरेषा मस्तकरेषेला मिळत असेल तर कामुक वृत्तीच्या अविचारामुळे संकट निर्माण होते. दोन्हीही हातावर हे चिन्ह असल्यास आकस्मिक मृत्यू येतो.

दोन्ही हातावर मस्तकरेषा, हृदयरेषा, जीवनरेषा मिळत असतील व मस्तकरेषेच्या मध्यभागी गुणकचिन्ह असेल तर एकाएकी मृत्यू येतो.

अंत:करणरेषा बुधाच्या ग्रहस्थानाखाली तुटत असेल तर व्यक्तीच्या स्वार्थामुळे प्रेमप्रकरण संपुष्टात येते. पैशाचे प्रेम हृदयाच्या प्रेमावर मात करते. यकृताच्या रोगामुळे हृदयक्रियेला अडथळा होतो.

अंत:करणरेषा दोन्हीही हातावर शनिग्रहस्थानाखाली तुटत असेल तर रक्तप्रवाहाच्या दोषाने मृत्यू येतो. हृदयरेषा पुष्कळ ठिकाणी तुटत असेल तर अनिश्चितता वाटते व भिन्नलिंगी व्यक्तिविषयी तिरस्कार वाटतो.

अंत:करणरेषेतून सरळ रेषा शनिच्या ग्रहस्थानावर जात असेल तर चुकीचे प्रेम जडते व या प्रेमामुळे त्रास व नुकसान होते.

दुबळ्या हृदयरेषेपासून दोन उभ्या रेषा चंद्राच्या ग्रहस्थानावर जात असतील तर मेंदूत रक्तस्त्राव होऊन मृत्यू येतो.

हृदयरेषेतून कंपायमान अशी रेषा चंद्रावर जात असेल, तर स्वभाव खुनशी असतो.

अंत:करणरेषेतून एक रेषा निघून करंगळीवर जात असेल तर अपघात होतो.

रविच्या ग्रहस्थानाखाली अंत:करणरेषेतून उभ्या रेषा निघत असतील तर सर्वांगीण ज्ञान असून त्याचा स्वत:ला काहीच उपयोग नसतो.

अंत:करणरेषेच्या खाली असणाऱ्या शाखा प्रिय माणसाकडून निराशा पदरात टाकतात.

बुधाच्या ग्रहस्थानाखालील अंत:करणरेषेला अनेक उपशाखा असल्यास प्रेमसंबंध सूचित करतो.

अंत:करणरेषेला वर जाणाऱ्या रेषा नसतील तर भावनाशून्यता असते. हृदयरेषा मस्तकरेषेपासून दूर असून दोनही रेषांना शाखा नसतील तर जीवनात अशा व्यक्तीला प्रेमाचा ओलावा मिळत नाही.

हृदयरेषेचा एक फाटा बुधाच्या ग्रहस्थानावर जात असेल व धनरेषेवर बेट असेल तर व्यक्तीच्या अनैतिक संबंधामुळे घटस्फोट होतो.

हृदयरेषा बुधाच्या ग्रहस्थानावर अर्धवर्तुळ करीत असेल, तर गूढशास्त्राची आवड असते.

हृदयरेषेला सुरुवातीस मेख व मस्तकरेषेला मेख होऊन एक शाखा मंगळ ग्रहस्थानावर जात असेल तर विवाहापासून विरह होतो. काही व्यक्ती या योगावर विरहानंतर विवाह करताना आढळतात.

हृदयरेषा लहान असून शनिच्या उंचवटयावरून शाखा नसताना निघत असेल तर आकस्मिक मृत्यू सुचविते. त्याच्या जोडीला मस्तकरेषेच्या मध्यभागी फुली असल्यास खात्रीने मृत्यूसूचक असते. हृदयरेषेचा एक फाटा गुरूवर व दुसरा फाटा शनिवर निघत असेल तर विक्षिप्तपणा असतो.

अंत:करणरेषेचा एक फाटा गुरु बोटाच्या पेरांच्या मधून निघत असेल तर प्रेमळ व घरावर प्रेम करणारी व्यक्ती सुचविते.

अंत:करणरेषेचा एक फाटा गुरुकडे व एक मस्तकरेषेकडे जात असेल तर माणूस स्वत:ची फसवणूक करून घेतो.

हृदयरेषेला गुरुच्या उंचवटयावर शाखा फुटून एक शाखा गुरुवर जात असेल तर प्रेमापासून सुख मिळते. त्याच वेळी शुक्रावर गुणकचिन्ह असल्यास एकच प्रेम असल्याचे द्योतक होय.

अंत:करणरेषा शनिग्रहस्थानाखालून निघत असेल तर कामुकवृत्ती असते. पण खरे व कौटुंबिक प्रेम नसते.

दुबळी हृदयरेषा व दूषित मस्तकरेषा अविश्वासूपणा दाखवितात.

जाड हृदयरेषा जाळीयुक्त मोठे चंद्रग्रहस्थान व प्रभावी शुक्रकंकण असता, व्यक्ती मत्सरी व अविचारी वृत्तीची असते.

हृदयरेषा फिक्कट आणि रूंद असून शुक्राच्या ग्रहस्थानावरून एक रेषा निघून बुधाच्या ग्रहस्थानाकडे किंवा मंगळग्रहस्थानाकडे जात असेल तर त्या रेषा व्यावहारिक प्रेम व फार कामुकवृत्ती दर्शवितात. शुक्रकंकण तुटके असल्यास गुन्हे करण्यापर्यंत प्रवृत्ती असते.

दुबळी हृदयरेषा मस्तकरेषा, आयुष्यरेषेपासून वेगळी व गुरुच्या ग्रहस्थानावरून निघणारी असेल तर प्रेमात स्वत:च्या मूर्खपणामुळे अपयश येते किंवा दु:ख पदरात पडते.

फार बारीक व लांब हृदयरेषा खुनी प्रवृत्ती दर्शविते. शृंखलायुक्त हृदयरेषा असता प्रेमात चांचल्य व हृदयाची तक्रार असते.

दुबळी व शाखाहीन अंत:करणरेषा अपत्यहीनता सुचविते.

हृदयरेषा शृंखलायुक्त असून ती शनिच्या ग्रहस्थानावरून निघत असेल तर भिन्नलिंगी व्यक्तीबद्दल कीव वाटते. हातावर दुर्गण सुचविते.

चांगली हृदयरेषा, मस्तकरेषा व आयुष्यरेषा यांच्या शेवटी त्रिकोण असता, कौशल्य असते.

चांगली हृदयरेषा शुक्र व चंद्र ग्रहस्थाने मोठी असता रोमँटिक स्वभाव दर्शवितात. ही माणसे भावनावश होतात.

चंद्राच्या उंचवटयावर जाळीचिन्ह असता तसेच चांगले शुक्रकंकण व लांब हृदयरेषा असता ही बहुतकरून मत्सरी स्वभाव दाखवितात.

हृदयरेषा मस्तकरेषेजवळून जात असेल व आरोग्यरेषा वाकडीतिकडी असेल तर दम्याचा विकार असतो.

ही रेषा जास्त जाड असल्यास मेंदूत रक्तस्त्राव होतो.

हृदयरेषा अस्पष्ट आणि रूंद असता अपचन, रक्तदोष, हृदयविकार इ. विकार होतात.

मस्तकरेषा व अंत:करणरेषा यांच्यापर्यंत गुणकचिन्ह असेल तर त्या व्यक्तीचा शत्रूच्या हातून मृत्यू होणार हे सूचित करते.

अंत:करणरेषा लहान असून शनिच्या ग्रहस्थानावरून येऊन एखादी रेषा तिला छेदीत असेल तर ती व्यक्ती लोभी असते.

हृदयरेषा गुरुच्या बोटाला वेढा घालीत असून सरळ अखंड असेल तर ती व्यक्ती शास्त्रीय ज्ञानी, सामर्थ्यवान व योगी असते.

जर हृदयरेषा, मस्तकरेषा व जीवनरेषा एकत्र जुळलेल्या असतील तर ती व्यक्ती प्रेमात पडल्यामुळे, लग्न न झाल्यामुळे दु:खी असते.

हृदयरेषेतून निघणाऱ्या रेषा समोर जात असतील तर आशाजनक असतात आणि त्या जर खाली जाणाऱ्या असतील तर निराशाजनक असतात.

हृदयरेषा एक वेळ तुटून परत लगेच उगम पावत असेल तर ती व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या प्रेमात पडते पण परत तिचे प्रथम मीलन होऊन गेलेल्या व्यक्तीच्या प्रेमपाशात बद्ध होते.

शनिच्या ग्रहस्थानापासून काही अंतरावर हृदयरेषा जात असेल तर ती व्यक्ती भीतियुक्त प्रेमपाशात अडकते. आसक्त होऊन भयंकर स्वरूपाचे साहस करते.

शनिग्रहस्थानावर जाणारी हृदयरेषा कामुकता, स्वार्थीपणा व विवाहापासून धनप्राप्ती सुचविते.

हृदयरेषा सुंदर असून ती तर्जनीपर्यंत गेली असेल तर २०० वर्षे आयुष्य असते.

हृदयरेषेवर पालखी, पताका अथवा त्रिकोण असून गुरुग्रहस्थानावर मोठे गुणगचिन्ह असेल व हातावर मोठा त्रिकोण असता, ही व्यक्ती महान ज्ञानी व गुरुपदवीची असते. याच्या जोडीला विद्या व शरीररेषा चांगल्या असल्यास राजयोग होतो. प्रवासयात्रा होतात. माणूस धनिक असतो.

हृदयरेषा दोन असतील. तर स्वस्त्रीवर किंवा पतीवर अतिशय प्रेम असते. त्यांना त्याशिवाय इतर जग तुच्छ वाटते.

हृदयरेषेवर यवचिन्ह असता. शारीरिक दुर्बलता किंवा इंद्रियरोग, भाग्यहीन व्यक्तीशी विवाह दर्शविते.

हृदयरेषेवर शनिग्रहस्थानाखाली यवचिन्ह असेल तर जननेंद्रियाचा विकार व वस्नायूचे रोग होतात.

अंत:करणरेषेवर रविग्रहस्थानाखाली यवचिन्ह असल्यास दृष्टीमांद्य असते व दृष्टीचा त्रास होतो.

अंत:करणरेषा फार तांबडी असेल व तिच्याखाली यवचिन्ह असल्यास अपचनाचे विकार होतात.

या रेषेवर काळ्या-निळ्या रंगाचे बिंदू असता इंद्रिय, निर्बलता, ज्वरपीडा व कमरेत वात या विकाराचा त्रास सुचवितात.

अंत:करणरेषेवर वर्तुळचिन्ह असल्यास अंधत्व येणार असल्याचे सूचक असते.

या रेषेवर फुली असेल तर प्रेमापासून दु:ख भोगावे लागते.

या रेषेवर नक्षत्र असल्यास काहीतरी घटनेमुळे अंधत्व येते.

हृदयरेषेच्या खालून ज्या बारीक केसरासारख्या रेषा असतील, त्यांना इतर रेषा छेदीत असतील तर प्रेमात पडून निराशा पदरात येते. हे चिन्ह स्त्रीच्या हातावर सापडले तर ती व्यभिचारी असते. या रेषेवर बिंदू असेल तर ती स्त्री प्रेमांध होऊन शेवटी दु:खी होते.

हृदयरेषेतून रेषा निघून मस्तकरेषेला छेदीत असेल तर लग्नात वाद होतात. व्यक्ती अस्थिर बुद्धीची, दुराचारी बुद्धीची व दुसऱ्यावर विश्वास ठेंवणारी, हलक्या कानाची असते.

मस्तकरेषा व हृदयरेषा दोन्ही शनिच्या ग्रहस्थानाखाली मिळत असतील तर आकस्मिक मृत्यू येतो.

हृदयरेषा रविच्या उंचवटयापर्यंत व वाईट धनरेषा असता व्यक्तीला अपयश सुचवितात.

हृदयरेषेवर लाल किंवा पांढरे बिंदू माणसाला महारोग होणार हे सुचवितात.

दोन्ही हातावर गुरुच्या उंचवटयाखाली वेढा देऊन हृदयरेषा असल्यास साधूसेवा होते व महात्म्याची कृपा लाभते.

हृदयरेषेला बुधाच्या उंचवटयाखाली शाखा नसतील व बुधाच्या उंचवटयावर उभी रेषा नसेल तर ती व्यक्ती पुत्रहीन होते.


स्पष्ट शुक्र उंचवटा व चंद्राचा उंचवटा फार मोठा असून अंत:करणरेषा फार दीर्घ असेल तर ती व्यक्ती आपल्या पतीचा किंवा पत्नीचा संशय घेऊन तिला छळेल.

हातावर मुळीच अंत:करणरेषा नसून जीवनरेषा चांगली असल्यास व्यक्ती दीर्घायुषी असते.

हृदयरेषा तुटक तुटक असून इतर रेषांनी तुटलेली असेल तर ती व्यक्ती स्त्रीद्वेषी, स्वत: अविचारी व दु:ख उत्पन्न करणारी असते.

हृदयरेषेची एक शाखा शनिच्या ग्रहस्थानावर दुसरी शाखा गुरुच्या ग्रहस्थानावर जात असेल तर मनुष्य धनवान होतो. हळूहळू तीची प्रगती होते. शनिग्रहस्थानावर जाणारी अंत:करणरेषेची शाखा सुंदर पत्नी सोडून वेश्या किंवा अन्य स्त्रीशी संबंध सुचविते व गुरुग्रहस्थानाकडे जाणारी शाखा शुभेच्छा दाखविते.अशा व्यक्तीशी विवाह करणारी व्यक्ती दु:खी होते.

## भाग्यदर्शन !





भाग्यरेषेवरून आपणाला भाग्य किती अनुकूल आहे हे समजते. या रेषेला धनरेषा, भाग्यरेषा, नशीबरेषा, ऊर्ध्वरेषा, नदरेषा, कर्मरेषा, लक्ष्मीरेषा, शनिरेषा अशी अनेक नावे आहेत.

ऐहिक सुखोपभोग, कर्तबगारीने मिळणारा पैसा, विनासायास व अनपेक्षितपणे मिळणारे धन, या सर्वांचा विचार धनरेषेवरून करता येतो. या रेषेचा विचार करताना केवळ रेषेचा विचार करून भागत नाही. तर ती ज्या भागातून जात असते. त्याचाही विचार करावा लागतो. चौकोनी हातावर ही रेषा निर्दोष असते हे विशेष शुभफलदायी आहे. या रेषेवरून व्यक्तीचा आयुष्यक्रम साधा, सुखदायी अथवा अडचणीचा आहे हे समजते.

करतळावर ही रेषा सामान्यत: चार प्रकारची आढळून येते.

(१) मनगटाच्या पायथ्याशी तळव्याच्या मध्ये उगम पावून थेट शनिग्रहस्थानावर स्थिरावणारी.

(२) चंद्रग्रहस्थानावरून निघून शनिच्या किंवा रविच्या ग्रहस्थानावर स्थिरावणारी.




(१) भाग्यरेषा सुरुवातीस मोडकीतोडकी किंवा शृंखलायुक्त असल्यास त्या व्यक्तीच्या आई-वडिलांच्या आर्थिक अडचणीची झळ बालकास लागते.

(२) अंगठ्याच्या मुळातून रेषा निघून धनरेषेला छेदून बुधाच्या ग्रहस्थानावर जात असेल तर त्या व्यक्तीच्या भरभराटीस आई-वडील आड येतात.

भाग्यरेषा जाड असल्यास व्यक्तीत चिकाटी असते, पण जीवनलढ्याचा ताण मेंदूवर पडल्यामुळे व्यक्तीला अर्धांगाचा झटका येतो.

वाकडीतिकडी जाणारी भाग्यरेषा बदलता स्वभाव, अस्थिरता व भांडखोरवृत्ती दाखविते. त्यामुळे त्या व्यक्तीचे थोड्या प्रमाणात नुकसान होते.

दोन वाकड्यातिकड्या धनरेषा एकमेकांना मिळत असतील तर व्यक्तीच्या घाईमुळे फार नुकसान होते.

पहिल्या मणिबंध रेषेतून धनरेषा निघून मध्यमेच्या तिसऱ्या पेरावर जात असेल तर व्यक्ती नशिबाच्या हातचे खेळणे असते. हातावर ज्याप्रमाणे इतर चिन्हे असतील त्याप्रमाणे भाग्योदय किंवा अपकर्श होणारा असतो.

पहिल्या मणिबंध रेषेवरून भाग्यरेषा निघून अंत:करणरेषेवर थांबत असेल तर प्रेमात पडल्यामुळे त्रास होतो. वाईट हातावर हा योग हृदयविकार सुचवितो.

पहिल्या मणिबंध रेषेवरून धनरेषा निघत असेल, तर अतिशय तीव्र असे दु:ख त्या व्यक्तीच्या वाट्यास येते.

हातावर पुष्कळ रेषा असून त्या भाग्यरेषेला छेदीत असतील तर अस्वास्थ्य, बारीकसारीक गोष्टींची काळजी करणे, रागीट स्वभावामुळे नुकसान होणे. इत्यादी गोष्टी घडतात.

मस्तकरेषेपासून धनरेषा निघत असेल तर उत्साहामुळे कर्तबगारीस व प्रयत्नास यश मिळते. ३५ वर्षानंतर यश येऊ लागते.

(३) मनगटाच्या मध्याशी उगम पावून रविग्रहस्थानावर स्थिरावणारी.

(४) जीवनरेषेतून उगम पावून शनिग्रहस्थानावर जाणारी.

भाग्यरेषा तांबड्या रंगाची असून, शनिच्या ग्रहस्थानावरून शनिबोटाच्या तिसऱ्या पेरावर जात असेल तर व्यक्तीला तुरुंगवास होतो. अपमानास्पद मृत्यू येतो. त्याच्या जोडीला पेरावर त्याच बोटाच्या वर नक्षत्र असल्यास हे जास्त संभवनीय असते.

धनरेषा अंत:करणरेषेपासून पुढे असेल तर वृद्धापकाळात व्यक्तीला धनलाभ होतो. हा लाभ चिकाटी, शास्त्रीयज्ञान व शेती वगैरेपासून मिळतो. मेहनतीने संपत्ती मिळविण्याचा हा योग आहे.

भाग्यरेषा शनिग्रहस्थानाकडे जाऊन तेथून गुरुग्रहस्थानाकडे जात असेल तर व्यक्तीला जीवनात अपूर्व यश मिळते. वैवाहिक सौख्य चांगल्याप्रकारे प्राप्त होते.

हातावर भाग्यरेषा नसणे म्हणजे घटनाविहीन जीवन समजायचे.

भाग्यरेषा सरळ शनिग्रहस्थानावर स्थिरावणारी असेल तर व्यक्तीला जीवनात अपूर्व आर्थिक यश प्राप्त होणार असल्याचे द्योतक असते.

भाग्यरेषा रविच्या ग्रहस्थानावर जात असेल तर कला व वाङ्मय यात अपूर्व यश मिळते.

भाग्यरेषा बुधाच्या ग्रहस्थानावर जात असेल तर व्यापारात यश प्राप्त होते.

मस्तकरेषेला धनरेषा सुमारे वयाच्या ३५व्या वर्षी ओलांडते.

सामान्य व साधारण भाग्यरेषा हाताच्या मध्यावर असेल तर मध्यम वयात त्रास होतो.

भाग्यरेषा हृदयरेषेवरून जाताना तिच्यावर साखळी असेल तर प्रेमापासून त्रास होतो.

धनरेषा चंद्रावरून निघून हृदयरेषेवर थांबत असेल. तर उधळपट्टीमुळे किंवा प्रेमात निराशा झाल्यामुळे त्रास होतो. अशा व्यक्तीला हृदयविकार होतो.

भाग्यरेषेचा एक फाटा सुरुवातीस शुक्रावरून व दुसरा चंद्रग्रहस्थानावरून निघत असेल तर प्रेमी व्यक्तीच्या उत्तेजनामुळे यशासाठी लढण्याची वृत्ती असते. ही रेषा चांगली असल्यास सारे मनासारखे होते.

भाग्यरेषेच्या सुरुवातीस मेख झालेली असेल तर नातेवाईकांखेरीज इतर व्यक्तीच्या जीवनात आगमन होऊन त्याचा परिणाम व्यक्तीच्या जीवनावर होतो.

भाग्यरेषा चंद्रग्रहस्थानावरून निघून शनिग्रहस्थानाकडे जात असेल व चंद्रग्रहस्थानावर आडव्या रेषा असतील तर जागतिक प्रवास होतो.

भाग्यरेषा शनिबोटाच्या पायाला छेदीत असेल तर जीवनात संकटे व अपयश येते.

भाग्यरेषा हाताच्या मध्यावरून निघत असेल तर व्यक्ती स्वतःच्या कर्तबगारीवर भाग्यास चढते.

धनरेषा चंद्रग्रहस्थानावरून निघून स्पष्ट अशी शनिच्या ग्रहस्थानावर जात असेल तर प्रेमामुळे किंवा विवाहामुळे जीवनात सुख मिळते. हीच रेषा टोकदार बोटे असलेल्या हातावर असली तर व्यक्तीला स्फूर्ति व भाग्यात काय वाढून ठेवले आहे ते अगोदर समजते.

भाग्यरेषा शुक्राच्या उंचवट्यावरून निघत असेल तर कुटुंबियांचे त्याच्या जीवनावर परिणाम होतात.

जीवनरेषेजवळून काही वेळा धनरेषा स्वतंत्र जात असेल तर त्या व्यक्तीच्या जीवनात नातेवाईकांचा परिणाम होतो.

धनरेषेला चंद्रावरून रेषा मिळत असल्यास व पुढे भाग्यरेषा तुटक असल्यास, बुडण्याची भीती असते किंवा प्रेमाची व्यक्ती फसवणूक करते.

धनरेषा तुटक असून आडव्यातिडव्या रेषा असल्यास दुर्दैवी घटना त्याकाळात घडतात.

भाग्यरेषा तुटक असल्यास नुकसान होते. पण तुटल्यानंतर तिच्याजवळून दुसरी भाग्यरेषा असल्यास, दुर्दैवी नुकसान होणार नाही. आर्थिक परिस्थितीत बदल होईल.

मस्तकरेषेतून रविच्या ग्रहस्थानावर जाणारी रेषा बुद्धीच्या व कलेच्या क्षेत्रात व्यक्तीला यश व संपत्ती दर्शविते.

भाग्यरेषेला खाली शाखा असल्यास आर्थिक नुकसान सुचवितात. धनरेषेतून वर जाणाऱ्या रेषा भाग्योदय सुचवितात.

भाग्यरेषेचा एक फाटा गुरुग्रहस्थानावर एक शनिग्रहस्थानावर तिसरा रविग्रहस्थानावर जात असेल तर अपूर्व यश मिळते.

भाग्यरेषा बुधग्रहस्थानावर जाऊन थांबत असेल तर प्रत्येक गोष्टीत यश मिळते. उत्कृष्ट व भाग्याचा विवाह होतो.

भाग्यरेषा हृदयरेषेवर थांबत असेल व चंद्रग्रहस्थान मोठे असेल तर प्रेमामुळे वारंवार निराशा व त्रास होतो.

भाग्यरेषा एकाएकी बुद्धीरेषेवर थांबत असेल तर स्वतःच्या चुकीमुळे संकट व नुकसान होते.

चांगली धनरेषा असून, मोठा चंद्राचा उंचवटा असल्यास अतिशय भावनाप्रदानपणा यशाला मारक ठरतो.

मस्तकरेषेतून भाग्यरेषा निघून शनिच्या उंचवट्यावर अर्धवर्तुळाकार झाल्यास जीवन कष्टमय असते.

मंगळग्रहावरून रेषा येऊन भाग्यरेषेला मिळत असेल तर प्रेमापेक्षा गर्व व अहंकार विवाहामागे लपलेला असतो.

भाग्यरेषेला चंद्रग्रहावरून रेषा येऊन मिळत असेल तर विवाह होतो.

जीवनरेषेच्या बाजूने भाग्यरेषेजवळ स्वतंत्र चौकोन असल्यास घरगुती जीवनात अपघात होतो. तो चंद्रग्रहस्थानाच्या बाजूने असेल तर प्रवासात अपघात होतो.

भाग्यरेषेवर असलेला चौकोन अडचणीपासून संरक्षण करतो.

शनिच्या ग्रहस्थानावर अनेक रेषा भाग्यरेषेला छेदीत असतील तर व्यक्तीच्या जीवनात अनेक अडचणी येऊन तिचे नुकसान करतात. त्यांच्या सभोवार चौकोन असल्यास त्यांची तीव्रता कमी होते.

मस्तकरेषेतून रेषा निघून धनरेषेला छेदीत असतील, तर कोर्टदरबारात किंवा वाङ्मयीन अथवा कलामय कृतीमुळे नुकसान होते.

शुक्राच्या ग्रहस्थानावरून जाड रेषा येऊन भाग्यरेषेला मिळत असल्यास व्यक्तीला मनोविकाराचे प्राबल्य असते.

हृदयरेषा गुरुग्रहस्थानावरून निघत असेल व भाग्यरेषा चंद्रावरून येऊन तिला मिळत असेल तर प्रभावी व सुखकारक विवाह होतो. तो विवाह मनोविकाराच्या तृप्तीसाठी होतो.

जीवनरेषेला व भाग्यरेषेला आडव्या रेषा छेदीत असतील तर कौटुंबिक अडचणी व दुःखे येतात.

भाग्यरेषा तुटक व वाकडीतिकडी असेल तर दुर्गुणामुळे नुकसान होते.

भाग्यरेषा मस्तकरेषेपुढे तुटलेली असून हृदयरेषेपुढे परत सुरू होत असेल तर सांपत्तिक परिस्थिती आणीबाणीची येऊन भिन्नलिंगी व्यक्तींकडून मदत होऊन स्थिरस्थावर होते.

मध्यमेच्या तिसऱ्या पेरावर तीन अगर चार उभ्या रेषा असून मनगटावर गुणकचिन्ह असल्यास मृत्यूपत्रामुळे संपत्ती व मालमत्ता मिळते.

मनगटावर त्रिकोणचिन्ह व जवळच मत्स्यचिन्ह असल्यास व्यक्ती धनवान, बुद्धिवान, धार्मिक, खर्चिक व प्रवास करणारी असते.

मनगटाच्या मध्यभागातून भाग्यरेषा

निघून गुरुवर जात असेल तर कायदेपंडित किंवा विद्वान व्यक्ती असून श्रीमंती, भाग्य व कीर्ती मिळविते. दोन मस्तकरेषा असणे श्रीमंतीचे लक्षण असते.

मस्तकरेषेवर यवचिन्ह किंवा एखादा पांढरा बिंदू असल्यास आकस्मिक धनलाभ होतो.

मस्तक व आयुष्यरेषा यातून दोन रेषा शनिच्या उंचवटयावर जात असतील तर आकस्मिक संपत्ती मिळते.

मणिबंधापासून निघालेली भाग्यरेषा जीवनरेषेतून निघालेली भाग्यरेषा, मस्तकरेषेतून उगम पावून रविग्रहस्थानावर जाणारी रेषा, चंद्राच्या ग्रहस्थानावरून रविग्रहस्थानावर जाणारी रेषा, या सर्व रेषा यशस्वी, सुखी, संततीवान भाग्यवान व्यक्तीच्या हातावर आढळतात.

भाग्यरेषेचा फाटा रविवर जात असेल तर संपत्ती व यश मिळते. मनगटाकडून निघून वर जाणाऱ्या रेषा सर्व प्राप्ती, उन्नती व साधनांचे साहाय्य दर्शवितात. ही माणसे व्याजबट्ट्याचा व्यवहार करतात.

भाग्यरेषेवर यव असेलेले स्त्री-पुरुष एकमेकांकडे आकर्षिले जातात.

स्त्रीच्या हातावर दुहेरी भाग्यरेषा असेल तर स्वतंत्रपणा व वडिलांकडून द्रव्यप्राप्ती दर्शविते.

जीवनरेषेतून धनरेषेला छेदणाऱ्या रेषा नातेवाईकांच्या मृत्यूच्या सूचक असतात.

भाग्यरेषा शुक्रग्रहस्थानावरून निघून आयुष्यरेषेला छेदून शनिग्रहावर जात असेल तर पुर्वायुष्य किंवा बालपण परावलंबी असते.

चंद्रग्रहस्थानावरून निघणारी भाग्यरेषा असेल तर पुरुष अन्य व्यक्तीकडून (कुटुंबियाखेरीज) मदत होऊन पुढे येतो.

भाग्यरेषा मस्तकरेषेवरील भागातून निघून रविग्रहस्थानावर जात असेल तर पुस्तके व नाटके लिहून मनुष्य श्रीमंत होतो. हीच रेषा गुरुग्रहस्थानावर जात असेल तर व्यक्ती उत्तरार्धात महत्त्वाकांक्षी, भाग्यकारक जीवन घालवितो.

भाग्यरेषा जीवनरेषेतून निघून शनिग्रहस्थानावर जात असेल तर मनुष्य स्वतःच्या कमाईने भाग्याला चढतो.

भाग्यरेषेवर आयुष्यरेषेच्या बाजूने व मस्तकरेषेच्या खाली त्रिकोण असल्यास लष्करी क्षेत्रात व्यक्तीला यश मिळते.

भाग्यरेषेवर बेट व रविग्रहस्थानावर नक्षत्र असेल तर कलावंत किंवा वाङ्मयीन व्यक्तीशी अनैतिक संबंध असतो.

भाग्यरेषेवर बेट व गुरुवर नक्षत्र असल्यास त्या व्यक्तीपेक्षा वरच्या दर्जाच्या व्यक्तीबरोबर अनैतिक संबंध असतो.

भाग्यरेषेच्या सुरुवातीला दोन एकमेकांस जोडणारी बेटे असल्यास दिव्यदृष्टी असते.

भाग्यरेषेच्या सुरुवातीस बेट असून, पुढे वाकडीतिकडी धनरेषा असल्यास अयोग्य, अनैतिकरीत्या बालकाचा जन्म झालेला असतो.

धनरेषेच्या सुरुवातीस बेट असल्यास जन्मासंबंधी काही गूढ असते.

भाग्यरेषेवर बेट गुप्त लैंगिक व्यवहार सूचित करते व त्याचप्रमाणे आर्थिक अडचणीचा काळ सुचविते.

भाग्यरेषेच्या शेवटी नक्षत्र व चंद्राच्या ग्रहस्थानावर नक्षत्र असल्यास आत्महत्या करण्याकडे वृत्ती असते.

भाग्यरेषेच्या शेवटी व जीवनरेषेच्या शेवटी नक्षत्र असल्यास अर्धांगाचा झटका येतो.

भाग्यरेषेच्या शेवटी व शनिग्रहस्थानावर नक्षत्र असल्यास, दुसऱ्याच्या दुष्टपणामुळे किंवा चुकीमुळे फार मोठे नुकसान व संकट येते.

भाग्यरेषेच्या सुरुवातीस नक्षत्र असल्यास व्यक्ती लहान असते. वेळी आई-वडिलांची आर्थिक परिस्थिती खालावलेली असते. त्याच वेळी शुक्रग्रहस्थानावर नक्षत्र असल्यास त्यांच्यापैकी एकाचा मृत्यू झालेला असतो.

भाग्यरेषेवर नक्षत्र असल्यास त्या वयात फार मोठे संकट किंवा नुकसान होते.

भाग्यरेषेजवळ फुली असल्यास नातेवाईकांच्या जीवनात होणारी घटना जीवनावर परिणाम करते.

भाग्यरेषा तुटली असून त्यापुढे गुणकचिन्ह असल्यास व्यक्तीच्या जीवनात आणीबाणीचा फरक होतो.

भाग्यरेषेच्या शेवटी गुणकचिन्ह व बुधस्थानावर जाळी असल्यास स्वतःच्या वाईट कृत्याबद्दल मृत्यूला कवटाळावे लागते.

भाग्यरेषा चंद्रग्रहस्थानावरून निघत असेल तर त्या व्यक्तीला प्रवास घडतो.

स्त्रीच्या हातावर भाग्यरेषा चंद्रग्रहस्थानावरून निघून गुरुग्रहस्थानावर जाईल तर ती स्त्री श्रीमंताची पत्नी होते. तिला भावी आयुष्यात सुख व कीर्ती मिळते.

भाग्यरेषा मध्यमेच्या तिसऱ्या पेरावर गेलेली असेल तर ती व्यक्ती दरिद्री व कष्टमय आयुष्य घालविते. हे चिन्ह स्त्रीच्या हातावर असेल तर वैधव्य येणार हे सुचविते.

भाग्यरेषा मणिबंधाच्या मध्यभागातून निघून वर गेलेली असेल तर व्यक्तीला स्थावर व वडिलार्जित संपत्ती मिळते.

चंद्रग्रहस्थानावरून येणारी रेषा भाग्यरेषेला मिळून तिची एक शाखा रविवर जात असेल तर विवाहानंतर कीर्ती व संपत्ती मिळते.


भाग्यरेषेला चंद्रग्रहस्थानावरून रेषा येऊन मिळत असेल व मिळण्यापूर्वी तिला शुक्रग्रहस्थानावरून येऊन रेषा मिळत असेल तर विवाहाला नातेवाईकांचा विरोध असतो.


चंद्रग्रहस्थानावरून येणारी रेषा भाग्यरेषेला छेदीत असेल तर घटस्फोट किंवा दुःखी विवाह सुचवितो.

चंद्रग्रहस्थानावरून रेषा येऊन भाग्यरेषेकडे जात असेल पण मिळत नसेल

तर प्रेमाचे विवाहात रूपांतर होत नाही.

## कीर्तीदर्शन !




व्यक्तीच्या जीवनातील सर्व क्षेत्रातील नावलौकिक, सौख्य, ऐश्वर्य, समाधान इ. गोष्टींचा विचार रविरेषेवरून केला जातो. या रेषेला विद्यारेषा म्हणूनही संबोधले जाते. परंतु ही रेषा व्यक्तीचे केवळ पुस्तकी ज्ञान दर्शवित नाही. काही अशिक्षित व्यक्तीच्या हातावरही रेषा आढळते. म्हणजेच ती व्यक्ती केवळ पुस्तकी ज्ञान नसल्याने अशिक्षित असली तरी बुद्धीची हुषारी त्याच्याजवळ असते.

या रेषेचा उगम हातावर वेगवेगळ्या ठिकाणी झालेला पाहण्यात येतो. ही रेषा संपूर्ण अशी मनगटापासून रविग्रहस्थानापर्यंत प्रत्येकाच्या हातावर दृष्टीस पडत नाही. तशी ती क्वचितच आढळते. ही रेषा हातावर थोड्याफार प्रमाणात असेल तर धनरेषेची व मस्तकरेषेची फळे वृद्धिंगत करणारी असते. व्यक्तीचे सुख, ऐश्वर्य, यश, विद्या व संपन्नता इत्यादी बाबींचे मापन करण्याचे काम ही रेषा करते. जीवनात यश, कीर्ती, विद्या आणि सुख या गोष्टी हातावर रविरेषा नसेल तर व्यक्तीला पूर्णपणे मिळत नसतात. थोडक्यात हातावर रविरेषेचा अभाव असला तर व्यक्ती आपल्या ऐश्वर्याचा उपभोग घेऊ शकत नाही.

काही हातावर रविरेषा मनगटापासून उगम पावलेली असते. तसे पाहता या रेषेची उगमस्थाने आठ ठरविता येतील.

(१) मनगटापासून, (२) चंद्रग्रह-स्थानावरून, (३)जीवनरेषेतून,
(४) मंगळ-मैदानातून,
(५) मस्तकरेषेपासून,
(६) अंत:करण-रेषेपासून,
(७) धनरेषेतून, (८) फक्त रविग्रहस्थानापुरती स्थित असलेली.

मात्र ही उगमस्थाने भिन्न असली तरी तिचा शेवट मात्र रविग्रहस्थानावरच होत असतो.

चांगली जीवनरेषा व हृदयरेषा तसेच चांगली रविरेषा असता, व्यक्ती दीर्घायुषी संतती व संपत्ती यांचा लाभ घेणारी असते. विद्वान, वकील, कायदेपंडित यांच्या हातावर हा योग पहावयास मिळतो.

चांगली मस्तकरेषा, चांगली रविरेषा व अनामिका सर्वात लांब असेल तर व्यक्तीला जुगार व शर्यत यापासून धनलाभ होतो.

चंद्राकडे जाणारी मस्तकरेषा तसेच दोन्ही हातावर रविरेषा असता व अनामिका मध्यमेएवढी लांब असेलल तर जुगारी वृत्ती असते.

उथळ हातावरील चांगली रविरेषा कीर्ती व पैसा मिळवून देण्यास अडथळा निर्माण करते.

खोलगट हात सरळ कीर्तीरेषा वाकडीतिकडी बोटे ही वाईट हेतूसाठी किंवा कारणासाठी बुद्धीचा उपयोग करण्याचे सूचित करतात.

दोन्ही हातावर चांगले गुरुग्रहस्थान व चांगली रविरेषा वरच्या दर्जाच्या व्यक्तींशी ओळख व मैत्री दर्शविते.

जीवनरेषेतील एखादी रेषा रविरेषेस छेदीत असेल तर नातेवाईकांकडून धनहानी होते. पण इतर रेषा रविरेषेला न छेदता मिळत असतील किंवा जवळून जात असतील तर इतर माणसाकडून धनप्राप्ती होते.

रविरेषा दुहेरी असल्यास एकापेक्षा अधिक क्षेत्रात यश व धन मिळते.

ही रेषा तुटलेली असल्यास धनाचे नुकसान होते. डाव्याहातावरतुटलेली असल्यास कौटुंबिक नुकसान होते. उजव्या हातावर तुटलेली असल्यास व्यक्तिगत नुकसान होते.

रविरेषा तुटलेली असणे किंवा ती हातावर मुळीच नसणे किंवा रविच्य उंचवटयावर लहान लहान दोन-तीन रेषा असणे हे वारंवार धंद्यात वादळ सुचविते. पुष्कळ प्रयत्न करूनही यश पदरात पडत नाही.

चांगली धनरेषा रविरेषा व फार मोठे गुरुग्रहस्थान असेल तर व्यक्ती तेजस्वी

भांडखोर असते. तरी तिच्या महत्त्वाकांक्षा पुऱ्या होतात.

चांगली रविरेषा, चांगले चंद्रग्रहस्थान व लहान नखे वाङ्मय व कलेचा उत्कृष्ट टीकाकार व परीक्षक असल्याचे दर्शवितात.

चांगली रविरेषा, चांगले शुक्राचे व चंद्राचे ग्रहस्थान व्यक्तीला वाङ्मयक्षेत्रात यश दर्शवितात.

दोन्ही हातावर चांगली रविरेषा असून, रविग्रहस्थानावर नक्षत्र असेल, तर कलेत किंवा हातात घेतलेल्या कामात उत्कृष्ट यश मिळते.

गुरु, शुक्र यांची ग्रहस्थाने चांगली असून धनरेषेबरोबर चांगली रविरेषा असता, नातेवाईकांची इस्टेट अथवा बिनवारसाची इस्टेट मिळते.

अंत:करणरेषा व मस्तकरेषा यामध्ये रविरेषा तुटलेली असेल तर अपघातामुळे यशाला अडथळा येतो.

वाकडीतिकडी रविरेषा असणे किंवा ती नसणे धनरेषेला लहान रेषांनी छेदलेले असणे व आरोग्यरेषेवर यव असणे असे असल्यास दिवाळखोर वृत्ती असते.

रविरेषा शृंखलायुक्त असल्यास कीर्ती व पैसा मिळवण्यास त्रास पडतो.

हाताची बोटे वाकडीतिकडी असून हातावर रविरेषा असता परिस्थितीशी झगडत दिसत काढावे लागतात.

कलात्मक हातावर रविरेषा जाड असल्यास ताण पडल्यामुळे अर्धांग किंवा हृदयविकार होतो.

अस्पष्ट रविरेषा कलेची आवड देते, पण त्यासाठी कष्ट करावयाची चिकाटी नसते.

रविरेषा फार रूंद असल्यास अस्थिरता सुचविते. ही रेषा तांबडी असून लांब व सरळ असल्यास, कलेची आवड व त्या कलेच्या संबंधात व्यवसायी असते.

ही रेषा वाकडीतिकडी असेल तर चित्तस्थिर नसते. वाईट आवड असते.

मंगळमैदानातून निघणारी रविवर जाणारी रविरेषा द्रव्यलोभ न होता भांडण व झगडा सुचविते.

चंद्राकडून निघणारी रविरेषा मित्रापासून अगर तत्संबंधी मनुष्यापासून लाभ सुचविते.

स्त्रीच्या हातावर चंद्रग्रहस्थानावरून निघणारी रविरेषा असल्यास, पतीकडून तिला मान मिळतो व ती स्त्री सार्वजनिक कार्य करते.

कीर्तीरिषा चंद्रग्रहस्थानावरून निघून रविग्रहस्थानाकडे जात असेल व मस्तकरेषा चंद्राकडे झुकत असेल तर काम, चित्रकला, संगीत, वाङ्मयीन लेखन यात यश मिळते.

चंद्रग्रहस्थानावरून एखादी रेषा येऊन कीर्तीरिषेस मिळत असेल तर व्यक्तीस वडिलार्जित पैसा मिळतो.

विद्यारेषेला मंगळ किंवा बुधाच्या उंचवट्यावरून एखादी रेषा येऊन मिळत असेल. तर अन्य प्रांतियांकडून अगर धार्मियांकडून पैसे व पुढाकार मिळतो. पण या रेषा रविरेषेस छेदीत असतील तर विश्वासघात व वाईट संबंध यामुळे आर्थिक नुकसान होते.

शुक्रग्रहस्थानावरून एखादी रेषा निघून गुरुग्रहस्थानावर जात असेल तर वाडवडिलांची संपत्ती मिळते.

रविरेषा चंद्रग्रहस्थानावरून निघून रविग्रहस्थानावर जात असेल तर अन्यलिंगी व्यक्तीमुळे यश मिळते. लौकिक कार्य घडते. लौकिक मान मिळतो. सार्वजनिक निवडणुकीत यश मिळते.

दोन्ही हातावर ही रेषा जीवनरेषेतून निघत असून रविग्रहस्थानावर जात असेल तर वाङ्मय, कला यात यश व संपत्ती मिळते. नातेवाईक व्यक्तीकडून मदत मिळते. ही रेषा शुक्रग्रहस्थानावरून निघत असल्यास, प्रेमाच्या माणसाच्या प्रोत्साहनामुळे यश मिळते.

रविरेषेवर त्रिशूळ झाल्यास पुष्कळ संपत्ती व फार मोठी कीर्ती मिळते.

कीर्तीरिषेचा एक फाटा शनिवर, एक रविवर, एक बुधावर जात असेल, तर फार मोठीं कीर्ती व पुष्कळ पैसा मिळतो.

रविरेषा शनिच्या उंचवट्याजवळ किंवा उंचवट्यावर जात असेल तर निराशावादी कलात्मक बुद्धी असते.

कीर्तीरिषा वाङ्मयीन कलावंताच्या हातावर यश सुचविते.

कीर्तीरिषा रविग्रहस्थानावर जात असता व तेथे अनेक लहान रेषा असता अपयश सुचवितात.

रविरेषा रविच्या उंचवट्यावरून निघत असेल तर दुसऱ्याकडून अगर विवाहापासून धनप्राप्ती होते.

मंगळग्रहस्थानावरून (बुधग्रहस्थानाखालील) रविग्रहस्थानावर रविरेषा जात असेल तर पैसा व कीर्ती फार कष्टाने प्राप्त होते.

हृदयरेषेपासून रविरेषा निघत असेल तर प्रेमाच्या शक्तीमुळे कला, गाणे, वाङ्मय व इतर क्षेत्रात यश मिळते. वृद्धापकाळी आर्थिक स्वास्थ्य चांगले मिळते.

रविरेषा मस्तकरेषेतून निघत असेल तर स्वत:च्या बुद्धीसामर्थ्याने यश मिळते.

मस्तकरेषेकडून रविरेषा निघत असेल तर फार लढा देऊन यश मिळते.

रविरेषेला मेख झाल्यास एका वेळी दोन क्षेत्रात काम करून व्यक्ति यशस्वी होते.

कीर्तीरिषा तुटक असल्यास सर्वांगीण बुद्धी असून स्थिरता नसल्यामुळे कीर्ती किंवा पैसा पदरात पडावा तसा पडत नाही.

कीर्तीरिषेला छेदणाऱ्या रेषा पैसा मिळविण्यास व कीर्तीस अडथळा निर्माण करतात.

रविरेषा व मस्तकरेषा चांगली असल्यास कापूस, चांदी यापासून होणाऱ्या व्यापारांत भाग्य उद्याला येते.

शुक्रग्रहस्थानावरून येऊन रविरेषेस मिळणारी रेषा त्रासानंतर यश सुचविते.

जर शुक्रग्रहस्थानावरून किंवा मंगळग्रहस्थानावरून येणाऱ्या रेषा रविरेषेला छेदीत असतील तर नातेवाईकांपासून
(पृष्ठ क्र. ४९ वर)

## श्री साईबाबांच्या जीवनकथा

– चकोर आजगांवकर

# दिगंबरस्वामी (वज्रेश्वरी) यांनी सांगितलेली साईजन्माची एक वेगळी उपकथा

'साई जीवनकथे'च्या यापूर्वीच्या शृंखलेत मी साईबाबांचे पूर्ववृत्त लिहिताना मेहेरबाबा व सत्यसाईबाबा यांनी प्रकट केलेल्या उपकथा मांडल्या आहेत, हे वाचकांना स्मरत असेलच. १८३५च्या सुमाराचा पाथरी (परभणी)चा जन्म, १८३९ ते १८५१ पर्यंतचा गुरुगृही वास, १८५१ पासून १८५८च्या आठ वर्षाच्या काळातील देशाटन (त्यातच १८५४च्या सुमारास शिरडीस प्रकटन, पुन्हा १८५४ ते ५८ पर्यंतचे देशाटन व त्यात स्वामीसमर्थकृपा), १८५८ ते १८७० पर्यंतचा अज्ञातवास व त्यानंतर त्यांच्या चमत्कारांचा पडलेला प्रकाश इत्यादी ठळक मैलांचे दगड या जीवनचरित्रात विखुरलेले आहेत. पुढील कथा सांगण्यापूर्वी मी आपल्याला माझ्या नुकत्याच पहाण्यात आलेल्या वज्रेश्वरीच्या दिगंबरस्वामी यांनी लिहिलेल्या साईचरित्रातील बाबांची पूर्वकथा उल्लेखणार आहे. दिगंबरस्वामी उपासनी महाराजांच्या संप्रदायातील असल्याने त्यांचे विचार दासगणू व हेमाडपंत यांच्या विरोधात मांडलेले आहेत. त्यापैकी इतर गोष्टी वगळून मी फक्त साईंच्या पूर्वकथेतील सूत्र मांडतो. हेतू इतकाच की वाचकांना एक वेगळी उपकथा समजावी.

दिगंबरस्वामी म्हणतात की साईबाबांच्या वडिलांचे नाव हरिहर भुसारी (मुक्काम पाथरी) असे होते व मातेचे नाव गिरिजाबाई होते. बाबा हे खुलदाबाद येथील सुफी संत झरझरीबक्ष यांच्या दर्ग्याला केलेल्या नवसामुळे जन्माला आले. हा दर्गा औरंगजेबाच्या गुरूचा मानला जातो. खरी ही जागा नाथपंथी जालंधरनाथांची आहे! औरंगजेबाने जालंधरनाथाच्या समाधीवर सुफी संत झरझरीबक्ष यांची कबर बांधली. दिगंबरस्वामी म्हणतात की बाबांचा जन्म १८५४चा व नाव आत्माराम हरिहर भुसारी असे होते. बाबा पूर्वजन्मीचे शिवाजी महाराजच होते. सुफी झरझरीबक्ष या संताच्या दर्ग्याचे मुजावर यांच्या पोटी मौलवीबक्ष या सिद्धाचा जन्म झाला. तो पूर्वजन्मीचा औरंगझेब होता. तो या जन्मी फकीर वेषधारी मलंग दत्ताच्या कृपेने मुक्त पुरुष झाला. मौलवीबक्षाने हरिहरपंतांकडून बाबांना ५ वर्षाचे झाल्यावर मलंगगिरीवर नेऊन मच्छिंद्रनाथाद्वारे दत्तदर्शन करविले व १८५९ ते ६० पर्यंत समाधीत बसविले. वडिलांसारखे त्यांचे पालन केले. नंतर बाबांचा १२ वर्षे देशाटन (१८६० ते ७२) व १२ वर्षे अज्ञातवासाचा (१८७२ ते ८४) काळ होता. मौलवीबक्ष हाच औरंग (सिंहासन)+झेब (रोशन) होता. बाबा आपल्या फकीर मौलवी गुरूला रोशनशहा म्हणत. या रोशनशहा मौलवीबक्षाने १८६० मध्ये बाबा समाधिस्थितीत बसले असता अल्लाच्या आदेशानुसार पश्चिमेकडे प्रयाण केले. गोदावरीत स्नान केले व शिरडी येथे कडूनिंब वृक्षाच्या खाली बसून देह त्यागिला. तेथे त्याची कबर बांधली गेली. तेच बाबांचे गुरुस्थान! हेच रोशनशहाचे, पीराचे स्थान होय!

बाबांनी निंबातळाच्या पीराच्या नावाबद्दल मौन पाळले होते. हे माझ्या वडिलांचे स्थान आहे, असे बाबा सांगत असत. अर्थात् या कथनात बऱ्याच वादग्रस्त गोष्टी सामावल्या असल्याने त्यावर मी भाष्य करणार नाही. या स्थानी स्वामीसमर्थांच्या एका भक्ताने गुरुपादुका स्थापन केल्या, त्या प्रतीकात्मकच! औरंगझेब व शिवाजी यांच्याशी शिरडीच्या पीराचा तसेच संतश्रेष्ठाचा दूरान्वयानेही काही संबंध होता काय, त्याचा ऐतिहासिक पुरावा सापडणे अत्यंत दुरापास्तच होय! यामुळे या उपकथेचा स्वीकार जसाच्या तसा करता येणार नाही.

श्री साईबाबा हे शिरडीमध्ये १८७५च्या सुमारास आपल्या अध्यात्म वैभवाच्या उषःकालात होते. गावकरी व खेडूतांना त्यांची महत्ता समजण्याजोगी नव्हती. अशा वेळी शिरडीच्या क्षितिजावर उगवलेल्या या दिव्य तेजोगोलाचा शोध घेऊन त्याचे मूल्यमापन करणारे गंगागीरबाबा हे दुसरे महात्मे होत. नाथ व दत्तपरंपरेच्या गुरूकल्पनेला अनुसरून बाबा निंबातळीच्या त्या प्रतीकात्मक गुरुस्थानाभोवती गुलाबपुष्पांची व झेंडूच्या पुष्परोपांची वाटिका निर्माण करीत होते. ही गुरूंची प्रतीकपूजा होती. **''तू माझ्याकडे पहा – मी तुझ्याकडे लक्ष देईन''** ही गुरूकृपादृष्टी बाबांनी पुढे प्रसारित केली. त्यांच्या अध्यात्मात गुरूंना अनन्यसाधारण महत्त्व होते. गुरू हाच ब्रह्मा-विष्णू-महेश होता. त्यांची गुरूकृपा गुरुध्यानातून अवतरत होती. गुरूनामाच्या सूक्ष्म उच्चारणाने ते आकाशतत्त्वाद्वारे विश्वात्मक प्रभूकडे हे ध्यान नेत असत. त्यामुळे चंचल मन स्थिर होऊन ज्योती ज्योतीत मिळून जात असे. यासाठीच बाबांनी गुरुस्थानाचे प्रतीकात्मक महात्म्य सदैव सांभाळले. निंबाजवळ ही कृपेची गुलशन होती, तर निंबामागे निवडुंगाच्या काटेरी बनात, त्या परिसराचे महात्म्य ओळखून बाबांनी आपल्या समाधि-स्थानाची जागा भविष्यकाळी निवडली. प्रारंभीच्या काळात या जंगलातील एका खड्ड्यात हा बालयोगी पोटाशी पाय दुमडून घेऊन विसावत असे. अशी ही स्थानाची अंतर्बाह्य जवळीक ही गुरूशिष्य परंपरेचा एक महान गौरव आहे.

गंगागीर महाराजांनी बाबांचे दर्शन घेतले तो १८७५चा सुमार असावा. त्यावेळी बाबा मशिदीत स्थायिक झालेले होते. पण गुरूस्थानास सजविण्याची गुरूभक्ती चालूच होती. गंगागीर हे पूर्वाश्रमी एक कुस्तीगीर

व बलदंड तरूण होते. पुढे ते धर्मशास्त्राचा अभ्यास करून कीर्तनकार, नामसंप्रदाय प्रसारक बनले. वडगावपासून मोगलाईत, नगर जिल्ह्यात व आसमंतीच्या प्रदेशात त्यांनी भक्तीचा, नामस्मरण सप्ताहांचा प्रसार केला. ते या कामासाठी शिरडी येथे आले असता प्रमुख पुढारी मंडळी गावाबाहेर गेली होती. झेंडूच्या झाडांना पाणी घालताना त्यांना बाबा व जवळच म्हाळसापती दिसले. ही उपासना केवळ गुरूस्थानाची नसून अखिल विश्व व्यापणाऱ्या त्या विश्वात्मक गुरूदेवाची आहे, हे त्यांना समजले. स्थूलातून अज्ञानी जीवाला सूक्ष्माकडे उंचावत नेणारे गुरुतत्त्व ही व्यक्ती नाही, ते तत्त्व आहे, ती सत्ता आहे. ती बाबांच्या फकिराची, त्या सरकारची (दत्तांची) शक्ती आहे, हे जरी त्यांनी जाणले नसले, तरी बाबांची थोरवी, त्यांची अलौकिक गुरूपरंपरा व त्यांचा अवतारी दर्जा गंगागीरांना आकळला. खरे पहाता व्यंकुशांनी त्यांच्या कर्माची मोट एका विटेत बंदिस्त केली होती व त्यांना ज्ञानभक्तियोगाचे तीन शेर दूध एका वांझ गायीच्या आचळांतून प्रतीकात्मकतेने पाजले होते (१८३९ ते १८५०). पुढे ब्रह्मानंद अवस्थेत अजंठा-वेरूळ पर्वतराजीतून फिरत दौलताबाद, खुलदाबाद याद्वारे मंगळवेढा, मोहळ, अक्कलकोट या पंथांवर आरूढ असलेल्या स्वामींची व त्यांची केव्हातरी १८५४-५८ या काळात गाठ पडली, असे स्वामीचरित्रकार व मेहेरबाबा स्वमुखे सांगत असत. स्वामींनी ब्रह्मानंदातून सहजसमाधी अवस्थेचे स्पर्शदान बाबांना करून, त्यांना भौतिक व वैश्विक पातळीवर एकाचवेळी वावरण्याचे सामर्थ्य देऊन कार्यप्रवण केले. सर्वधर्मांच्या एकतेचा **'एकच अल्ला मालिक'** हा संदेश देत देत व मानवसेवा हीच ईश्वरसेवा हे पटवीत बाबांनी या प्रेरणा घेऊनच आपले पुढील जीवन व्यतीत केले. गंगागीरांनी या संतशिरोमणीला जाणले. त्यांच्यामागून ते मशिदीकडे गेले. बाबांनी, **''या चांगदेव महाराज, या वटगावच्या वटेश्वरा!''** असे त्यांचे स्वागत केले. म्हाळसापती, बाबा व चांगदेवांनी एकत्र चिलीम ओढली. गंगागीर या महात्म्याने प्रथम बाबांना जाणले, त्यांचे खरे मूल्यमापन केले.

> **''हा तेजाचा पूर अनावर।**
> **उजळी इथली पर्णकुटी घर।**
> **जिवाजिवाना शिवतेचा वर।**
> **चैतन्याच्या समूर्ततेचा**
> **सदेह साक्षात्कार।''**

— श्री साईगीतायन

## ''गौरवे गातील हे प्राकार'' – गंगागीर महाराजांची भविष्यवाणी

(स्थळ: रुईगाव  काळ: १८७५)

(गंगागीरबाबा शिरडीस बाबांचे दर्शन घेऊन रुईगावास गेले व तेथे नामसप्ताहाची योजना त्यांनी आखली. तात्या कोते, गणपतराव कोते, दाजी पाटील इत्यादी मंडळी त्यांना भेटावयास रुईगावी गेली व शिरडीगावी नामसप्ताह पार पाडण्याचा त्यांना आग्रह करू लागली.)

**तात्या:** महाराज, आपण शिरडीला आलात तेव्हा आम्ही गावात नव्हतो. आपल्या चरणांच्या सेवेला आम्ही मुकलो, याबद्दल माफी असावी.

**गंगागीर:** जाऊ द्या! तो योगच नव्हता. एवढे मनाला लावून का घेता!

**गणपतराव:** आपली यथोचित स्वागतसेवा घडली नाही, ही खंत वाटते आहे.

**गंगागीर:** अशा बारीकसारीक गोष्टींनी मन विचलित करून घेणे योग्य नव्हे. आता काय काम काढले आहे?

**दाजी:** महाराज, आपण शिरडीला आपल्या नामसप्ताहाच्या अखंड गजराने धन्य करावे. आम्ही सारे एक दिलाने मदतीला येऊ म्हणतो.

**तात्या:** महाराज, मी सप्ताहाच्या सांगतेसाठी प्रसादाच्या कार्यक्रमाकरिता २० पोती गहू देईन.

**गणपतराव, दाजी:** आम्ही गावकऱ्यांकडून शिधासाहित्य गोळा करू. सप्ताह यशस्वी होईल.

**गंगागीर:** गणपतराव, तात्या, दाजी! मी याबाबत आपल्यासाठी आता काहीही करू शकणार नाही. तुम्ही आल्या पावली शिरडीला माघारी जा!

**सर्वजण:** महाराज, आपण ''हो'' म्हणेपर्यंत आम्ही येथून हलणार नाही. आपल्या पायाशी बसून आमरण उपोषण करू! आपण राग सोडलाच पाहिजे.

**गंगागीर:** मित्रांनो, मी रागावलो नाही. मी हे काही रागाने सांगत नाही.

**दाजी:** मग आमच्यावर ही अवकृपा का बरे, महाराज?

**गंगागीर:** आता शिरडीत नामसप्ताहाने काहीही अधिक लाभ घडायचा नाही.

**तात्या:** आम्ही शिरडीकरांनी असा कोणता गुन्हा केला आहे बरे?

**गंगागीर:** तात्या, दाजी! मला त्या महात्म्याचे शिरडीत प्रत्यक्ष दर्शन झाले आहे. मी पावन झालो आहे.

**गणपतराव:** महाराज, आपण आमच्या साईबाबांबद्दल, त्या तरूण साधूबद्दल म्हणता ना? त्यांनाही सप्ताहाला बोलावू या! मग तर झाले ना?

**गंगागीर:** नाही, गणपतराव. श्री साईबाबा हे महान, दैवी रत्न आहे. तो साक्षात् परमात्मा आहे. त्यांना तुम्ही जाणलेले नाही. उकिरडयावर पडला तरी हिरा तो हिरा. त्यांच्या पुण्याईने शिरडी महान तीर्थक्षेत्र बनेल. ते तुमचा व जगाचा उद्धार करतील. त्यांना शरण जा! त्यांच्या पायाखालची धूळ मी मस्तकी धारण करतो आहे.

**तात्या:** महाराज, आम्ही रित्या हातांनी परतावे, ही दैवाची योजना असावी.

**गंगागीर:** शिरडीकरांनो, तुमचे हात रिते नाहीत. ते सौभाग्याने भरलेले आहेत. मी पुन्हा शिरडीस येईन, तेव्हा माझी नामधारकाची झोळी त्यांच्या हातच्या कृपाकणांनी भरभरून घेईन. ज्याचा नामसप्ताह तुम्ही करू पहाता तो साक्षात्

श्रीहरी आज शिरडीत लीलारूपाने वावरतो आहे. त्याला जाणा, त्याचे कार्य चालवा:

**''या शिरडीच्या क्षितिजकडावर**
**दिव्य उगवला प्रकाश भास्कर**
**मोक्षनगरीचे फकीररूप हे**
**विभववंत सरकार।''**

–श्री साईगीतायन

(या प्रसंगानंतर स्वामीशिष्य पुण्याचे बीडकर महाराज शिरडीस येऊन गेले. १८७८च्या सुमारास स्वामीसमर्थांनी समाधी घेतली. बाबांचा मशिदीतील प्रकाशदीपांचा चमत्कार याच काळातील असावा.)

---

आपण बाबांचा थोडासा पूर्वेतिहास–इतिहासाने जेवढया पाऊलखुणा मागे ठेवल्या आहेत, त्यांची वाट पुसत पुसत–पाहिला. यात सत्याचा धागा, कल्पकतेची कलाबत् आणि साधनेतून पावन झालेल्या दृष्टीचे, दैवी इंद्रधनुष्याचे रंगही आहेत! चिकित्सकांची तर्कसंगती, भाविकांची भावदृष्टी आणि साधकांची मुमुक्षा या तिन्हीचा यात समतोल साधण्याचा माझा प्रयत्न आहे. आता शिरडीचा थोडा भूगोलही पाहू या! बाबा शिरडीला द्वारावती द्वारका मानीत. मशिदीला द्वारकामाई किंवा द्वारकांमाता म्हणत. श्री. मिरीकर यांना त्यांनी तसे सांगितल्याचे सतचरिताच्या २२व्या अध्यायात आहे.

श्री बाबांनी गोपाळकृष्णाच्या मूर्तीच्या जागी आपली समाधीची जागा निश्चित केली, शिरडीला द्वारका मानले यामागील मर्म वा रहस्य कोणते बरे? पौराणिक काळातील सोन्याची द्वारका सौराष्ट्राच्या किनाऱ्यावर वसली होती व कृष्णावताराच्या समाप्तीनंतर ती समुद्राने गिळल्याचे सर्वतोविदित आहे. त्यामुळे बाबांना शिरडीच्या आसमंतात दुसरी द्वारका म्हणजे दक्षिणद्वारका असल्याचे सुचवावयाचे असावे. दुसरा अर्थ असाही असू शकेल की शिरडी ही चारही वर्णांना आणि चारही वर्गांना खुली असलेली धर्म-पंथ-वर्ण-जातीरहित अशी सर्वांसाठी चारही द्वारे खुली असलेली रूपकात्मक द्वारका आहे.

शाहीर परशुराम यांनी आपल्या लावणीत मोहनीराजाने नेवाशाला निवास केला, या भागात समुद्रमंथन झाले व रत्नांचे वाटपही घडले असे सांगितले आहे. या भागात यादवांचे राज्य होते, असे ज्ञानेशांनीही स्पष्ट केले आहे. रूक्मिणीमाता विदर्भातील होती. पंढरपूरापासून या भागात दिंडीरवन होते. रुसलेल्या रूक्मिणीस शोधण्यासाठी श्रीकृष्ण या दक्षिणद्वारकेत दिंडीरवनात आले. त्यांना पुंडलिकाने वीट दिली. शिरडी या दक्षिणद्वारकेत येते. बाबांच्या गुरूंनी त्यांना दिलेली वीट ही त्या वीटेची प्रतीक असावी. क्षीरसागरातून आलेल्या रत्नांना संदर्भाने जोडणारी स्थळे या भागात आहेत. शंकरांनी हलाहल घेतले त्यांचे म्हातारदेव (वृद्धेश्वर) स्थान (मौजे घाटशिरस) पाथर्डीजवळ आहे. राहूचे शीर पडले, ती राहुरी येथेच आहे. मोहिनीरूप घेणारा मोहनीराजही आहे. प्रवरा ही रतनगडाहून निघणारी अमृतवाहिनी आहे. इंद्राचे बिल्वेश्वर (बेलापूर), अश्विनीकुमाराचे (अश्वी) स्थान, चंद्राचे चंद्रेश्वरस्थान (महादेव मंदिर), सूर्याचे विवस्वानस्थान (कोल्हार) ही सारी स्थाने इथेच आहेत. डॉ. गवाणकरांनी याबाबत 'शिलधी' या पुस्तकात हरिविजय इत्यादी आधारावर लिहिले आहे. पण हा पौराणिक संदर्भ जुळविण्याचा माझा प्रयास नाही. श्री बाबांच्या दिव्यदृष्टीला शिरडीचा श्रीकृष्णाशी काही संबंध असल्याचे ज्ञात होते. श्री बाबा हेच कृष्णावतार आहेत असे आम्ही भक्त मानीत आलो आहोतच. श्री बाबांचे चरण हे त्या सनातन पुरुषाचे (श्री विष्णूचे) चरण आहेत, हे दासगणूंनाही त्यांनी गंगा निर्माण करून पटविले होते. बाबा विष्णू की शिव की दत्त हा श्रद्धेचा विषय आहे. पण मला ते गुरू वाटतात. साक्षात् गुरूतत्त्वच जणू उगवले!

## जसा भक्त, तसा उपदेश

(स्थळ: द्वारकामाई काळ: १८८०)

(बाबांचा तात्या, म्हाळसापती, शामा इत्यादी भक्तांशी सुखसंवाद)

(माधवराव देशपांडे (शामा) हे द्वारकामाईच्या निकटच्या एका इमारतीत रहात व त्यांच्या शाळेच्या खिडकीतून बाबांच्या मशिदीतील हालचाली पहात. ते बाबांना एक विशिष्ट वेडा फकीर मानीत. परंतु बाबांच्या चिलीमसेवनामुळे आकर्षित होऊन ते मशिदीत चिलीमीचा आस्वाद घ्यावयास येत. तथापि हळूहळू बाबांच्या सान्निध्यात आल्यावर शामा यांना बाबांएवढी जगात अन्य शहाणी व्यक्ती नाही, याचा प्रत्यय आला! बाबांचीही शामावर मर्जी जडली. श्रीकृष्णाचे शामा उद्धव झाले. आपल्या सख्यभक्तीने ते बाबांचे जिवलग सखे व विश्वासू मित्र बनले. एकदा बाबा शामा, तात्या, म्हाळसापती इत्यादी (अगदी प्रारंभिक काळातील) भक्तांशी संवाद करीत होते. हा १८७५चा सुमार असावा.)

**शामा:** देवा, एवढा कसा रे खट्याळ देव तू? सारखे लाड करण्याच्या मिषाने गालगुचे, चिमटे घेत असतोस! आम्हाला नाही आवडत असा देव!

**बाबा:** शामा, गेल्या ७२ पिढ्यांत मी तुला कधीतरी हात लावला आहे का?

**शामा:** देवा, तू हेच नेहमी उगाळीत असतोस. किती पिढ्यांत तू माझ्याजवळ होतास?

**बाबा:** शामा, आपण दोघे अनेक जन्म एकमेकांच्या संगतीत होतो, हे तुला माहीत नसले तरी मी सारेकाही जाणतो. इतिहासात जमा झालेला सारा भूतकाळ मला पूर्ण ज्ञात आहे. तुझ्या-माझ्या फार पिढ्या झाल्या आहेत बरे!

**शामा:** हे जर तुला ठाऊक आहे, तर सांग पाहू की रामाने खरोखरच दर्यावर पूल बांधला होता का? रामाने कोटी वानर गोळा करून समुद्र पार केला, हे खरे आहे का?

**बाबा:** शामा, हे पूर्ण सत्य आहे. मी स्वत: हे माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. मी त्यावेळी त्या ठिकाणी हजर होतो.

**शामा:** देवा, असे खोटे बोलून आम्हाला

फसवू नकोस. तुझे वय तरी काय! तू काय रामायणाच्या काळात तेथे वावरत होतास!

**बाबा:** शामा, मी त्या फकिरमियाच्या मशिदीत बसून कधीही खोटे बोलत नसतो.

**शामा:** देवा, पुराणात सांगितलेले ब्रह्मलोक, विष्णूलोक, शिवलोक हे सारे सत्य आहेत काय?

**बाबा:** होय शामा, पण हे लोक आत्म्याच्या प्रवासाच्या वाटेवर लागतात. ते लोक म्हणजे मनुष्याच्या जीवाच्या प्रगतीच्या अवस्था म्हणेनास. परंतु हे लोक तुझ्या व माझ्यासाठी मात्र नाहीत. आम्हाला वेगळ्या वाटेने जायचे आहे. (रामदासीच्या गाठोड्यातून 'विष्णूसहस्त्रनाम' काढून शामाला देत) शामा, हे तुला घे! हे हृदयावर ठसव! भगवंताचे प्रेम हेच आपले सर्वस्व आहे.

**शामा:** देवा, ही चोरीची वस्तू मला नको. आधीच तो रामदासी महा कोपिष्ट, केवळ दुर्वास आहे. त्याच्या नकळत तुम्ही त्याची पोथी मला देत आहात, ती मला घेता येणार नाही. तो रामदासी माझ्यावर चोरीचा आळ घेईल आणि मला फाडून खाईल.

**बाबा:** नाही शामा, ही पोथी मी तुला दिली आहे. ती तू घेच! तुझे अनंत कल्याण होईल.

**''हरि निज भक्तांचा केला।**
**भोळ्या भाविकांचा भुकेला।**
**प्रेमा लागी समूळ विकला।**
**सदा हाकेला हांक देत॥''**

– श्री साईगीतायन

या पोथीचा त्या तापटाला उपयोग नाही. शामा, ही पोथी तू जवळ बाळग व तिचे सदैव पठण कर! हे 'विष्णूसहस्त्रनाम'च तुझ्या कामी येईल. तुझे हित करील. एकदा माझी छाती धडधडत होती. प्राण राहील की जाईल, असे वाटले तेव्हा ही पोथीच कामी आली. काळीज शांत झाले. प्राण सुखावले. हरीच हृदयात उतरला. आता याच हरिनामाचा उच्चार करीत इतरांना मी विभूती देतो व त्यांच्या कामना पुरवितो.

**शामा:** देवा, हे तुमचे खरे असेलही. तरीही त्या रामदासीची पोथी मला नको. तुम्ही स्वत: माझा सांभाळ करा! माझा भार शिरावर घ्या! मला तसे वचन द्या!

**बाबा:** शामा, तुला मी हे किती वेळ पुन्हा पुन्हा सांगू की मी माझ्या भक्तांचा जडभार माझ्या खांद्यावर सदैव वहात असतो. त्या पलीकडल्या धुनीतील अग्नि अखंड पेटला आहे. त्याच्या साक्षीने मी तुला हे शाश्वत वचन देत आहे. ही द्वारकामाता याची साक्षी आहे.

**शामा हे सांगू तुला काय लाखवार?**
**वाहत मी भक्तांचा नित्य कष्टभार।**

**या धूनीत मजसमोर**
**जागृत नित वैश्वानर**

**अग्नि साक्ष सांगे ही द्वारका त्रिवार।**

– श्री साईगीतायन

शामा, जे भक्त हरीचे नाम अखंड घेतील, ''साई'' ''साई'' नित्य उच्चारतील. त्यांच्या मनोकामना पूर्ण करणे हे माझे ब्रीद आहे!

(तात्या, बायजा, शामा, म्हाळसापती इत्यादी बाबांचा जयजयकार करून नमन करतात.)

## ते अनन्य भक्त मला प्राणाहून प्यारे!

श्री बाबांचा सुरुवातीचा उपदेश अगदी थोडक्या मोजक्या शब्दात असे. ते प्रत्यक्ष कृतीने वा दृष्टांतानेसुद्धा शिकवीत. बाबांचे सामर्थ्य अपार. त्यामुळे त्यांनी शब्दांचा जास्त वापर केला नाही. अनेक माध्यमांद्वारे ते आपले विचार प्रकट करू शकत. ते माणसाची श्रद्धा नीट तपासून घेत. त्यासाठी कित्येकदा प्रेमाने बोलत, कित्येकदा मौन स्वीकारीत, तर कित्येकदा रुद्रावतार धारण करीत. परंतु त्यांची प्रत्येक कृती अखेर भक्ताच्या अंतिम हितासाठी असे. सर्वांचा देव एक, मानवाची, प्राण्यांची सेवा ही ईश्वरसेवा, सर्वांभूती एकच आत्मा वसतो, ही तत्त्वे ते नव्यानव्या पद्धतीने भक्तांच्या मनावर ठसवीत. सत्कर्म, नामस्मरण, गुरूचे ध्यान, सदाचरण ह्या प्राणभूत गोष्टी ते हळूच येणाऱ्या-जाणाऱ्याच्या गळी उतरवीत. ते आशीर्वाद, उदी देत, मस्तकावर एका जागी स्पर्श करीत व भक्ताच्या हृदयात जागृती आणीत. मनोविकासातून ते आत्मविकासाकडे नेत. नेकी, नैतिक आचरण, श्रद्धा व सबुरीने, म्हणजे धैर्याने प्रारब्धाला तोंड देणे, यावर त्यांचा विशेष भर असे. वैर, ऋण, हत्या यांचा ते निषेध करीत. एकदा शामा, कोते पाटील दांपत्य, म्हाळसापती, काशीराम, आप्पा यांच्यासमवेत मशिदीत सुखसंवाद चालला होता. त्या प्रसंगी –

(स्थळ: द्वारकामाई काळ: १८८० चा सुमार)

(बाबांच्या समवेत शामा, कोते पाटील दांपत्य, म्हाळसापती, काशीराम, आप्पा इत्यादी)

**बाबा:** शामा, मी तुला मागील भेटीत काय सांगितले, काही आठवते काय?

**शामा:** देवा, मला आठवते. जो तुझे नाव घेईल, त्याचा तू सांभाळ करशील, हेच ना? माझी परीक्षा घेत का आहेस देवा? मी मास्तर आहे, या परीक्षेत नापास होणार नाही.

**बाबा:** शामा, मला केवळ शब्द नकोत. मला भाव हवा. प्रत्यक्ष कृती हवी. मी तुला माझेच नाव घ्यावयास सांगत नाही. अरे हरिनाम घ्या, शिवाचे नाम घ्या, अल्ला म्हणा, साई म्हणा! सारी नावे माझी आहेत. साऱ्या प्रेमाचा, श्रद्धांचा प्रवाह मजकडेच येतो. हे सनातन पाय आहेत बरे! नामाचे उच्चारण केले नाहीस, रूप स्मरले नाहीस, तरी प्रेमाचा भाव आणि श्रद्धा ठेव आणि सबुरीने जगाला सामोरे जा! मी तुझ्यामागे राहीन.

**शामा:** देवा, तू विष्णूसहस्त्रनाम वाचावयास सांगतोस, ते खरे मानू की नुसती श्रद्धा बाळगू?

**बाबा:** शामा, मुख्य भाव हवा! पण

ज्यांच्या मनात भाव नसतो, श्रद्धा नसते, त्यांनी प्रेमाने प्रभुनाम गावे, परमेश्वराचे गुणगान करावे व मनात भाव ठसवावा! प्रेमभावामुळे देहभाव जाऊन देवभाव यावयास हवा! यासाठी नाम, रूप यांचे सतत स्मरण अत्यंत प्रेमाने करावयास हवे! मी विष्णूसहस्त्रनाम तुला वाचावयास सांगितले याचे कारण ते प्रभावी मंत्ररूप आहे. ते तुला भक्तीबरोबर शक्तीही देईल. स्वत:बरोबर इतरांना तू मार्गाला लावशील.

**शामा:** म्हणजे देवा, तुझा ध्यास घेऊन मी स्वत:ला, माझ्या कुडीला, माझ्या मीपणाला विसरले पाहिजे, असेच तू म्हणतोस ना?

**बाबा:** होय शामा –

**रंगतात मम नामी**
**गुंगतात मम प्रेमी**
**भक्त ते अनन्य**
**मला प्राणाहून प्यारे।**

–श्री साईगीतायन

**शामा:** देवा, आम्ही तुझ्याशिवाय अन्य कुणाला देव मानणार नाही. तूच आमचा हरि आणि शिवहर आहेस!

**भक्तकार्य कल्पद्रुम**
**तू करुणा अमृतोपम**
**तूंच मंत्र मृत्युंजय**
**तूंच मोक्षतीर।**

–श्री साईगीतायन

**बाबा:** ही श्रद्धा ठीक आहे. मी ती स्वीकारतो. जो या मशिदीपाशी येईल आणि श्रद्धेने मला शरण होईल, आपली सुखदु:खे माझ्या पायी अर्पील, त्याला मी उद्धरीन, त्याला बेडापार करीन. मग माझ्या भक्तासाठी मी काय करणार नाही!

**या मशिदीपाशी जो येईल**
**भवसिंधू तो तरेल**
**शांतीचे दाखवीन त्यास अपरतीर।**

–श्री साईगीतायन

**बायजा, म्हाळसापती:** बाबा, आम्ही देवाची काय सेवा करावी? आम्हाला मंत्र किंवा पोथ्यांचे पठण जमणार नाही. आम्ही कसे वागावे? काय चाकरी करावी?

**बाबा:** बायजा, तात्या! अरे, ऋणानुबंधाने जवळ आलेली तुम्ही माझी लेकरे. तुम्हाला मंत्र, पोथ्या नकोत. तुम्हाला या मशिदमाईची छाया पुरेशी आहे. गुरूचरित्राचे वाचन माझ्या सरकारची कृपा मिळवून देते. एकनाथाची बावनखणी वृंदावनाची पोथी भगवंताकडे नेते. पण म्हाळसापती, तुझ्यासाठी हे नाही. तू गावसीमेवरच्या तुझ्या पिढीजात मंदिरातील खंडोबाचीच सेवा कर! त्या मल्हारी मार्तंडाच्या सेवेतून तुला सारेकाही मिळेल. वंदन, पूजन, अर्चन, भक्ती तुझ्यासाठी ठीक आहे.

**शामा, म्हाळसापती:** या मामीने आणि भाऊने कसे वर्तावे?

**बाबा:** अरे, रोज मोजकेच खावे, झोपेवरही ताबा ठेवावा. हरिनाम घ्यावे. या फकिराची, अल्लाच्या बंद्याची सेवा करावी. भाऊ, मामी! संताचा संग हाच सत्संग आहे. तुम्हाला या सत्संगानेच सारे मिळेल. अल्ला भले करील. मी देव नाही. पण मी तुमचा सर्वांचा बाप आहे. तुम्हा लेकरांना सारे मजकडून मागून घ्यावे लागेल. आपल्या बापावाचून दुसरा कोण देईल! तुम्ही माझ्याकडून हवे ते मागून घ्या!

**''माझिया भक्तांच्या धामी।**
**अन्नवस्त्राशी नाही कमी।''**

आप्पा, काशीराम! अरे, जे मला अनन्य भजतील, माझी सेवा करतील, त्यांचा योगक्षेम चालविणे, हे माझे ब्रीद आहे.

**आप्पा, काशीराम:** बाबा, आम्ही हरिनाम नित्य घेऊ. पण बाबा, आपण नित्य कुणाचे नाम घेता?

**बाबा:** म्हाळसा, तात्या! तुम्ही रात्री झोपलात की माझ्या हृदयावर हात ठेवा! म्हणजे समजेल. मी नामस्मरण थांबवले की मला उठवा! मी डोळे उघडे ठेवून झोपत असतो.

**म्हाळसापती:** बाबा, तुमचे नामस्मरण अखंड चालू असते. मी हात ठेवून पाहिले आहे. आम्ही दोघे– तात्या व मी– मात्र झोपी जातो.

**बाबा:** माझ्या लेकरांनो, अरे, हे अखंड नाम मी कबीर अवतारीच स्वीकारले आहे. त्या श्रीरामाचे नाम भवतारक आहे. त्याने शिळा उद्धरल्या आहेत. हरिनामाचा उच्चार करीतच मी विभूती वाटत असतो.

(तात्या, बायजा, शामा, म्हाळसापती इत्यादी भक्तमंडळी वंदन करून घरी परततात.)

---

**नी**मगावचे साईभक्त कै. नानासाहेब डेंगळे हे शामासारखेच श्री बाबांचे अंतरंग भक्त होते. बाबा आपल्या शिरडीतील वास्तव्याच्या सुरुवातीच्या काळात रहाते व नीमगाव या दोन गावांपर्यंत येत-जात असत. रहात्याचे चंद्रभानशेठ मारवाडी व त्यांचे सुपुत्र खुशालचंद व जाळी-नीमगावचे बाबासाहेब डेंगळे व त्यांचे बंधु नानासाहेब यांच्यावर बाबांचा एवढा उत्कट लोभ होता की ते शिरडी सोडून या गावी जात व या मंडळींसही शिरडीस वारंवार बोलावून घेत असत. नानासाहेबांचे सरकारदरबारी वजन होते. सर्कल इन्स्पेक्टर (गोपाळराव गुंड) व कलेक्टराचे चिटणीस (श्री. गाडगीळ) यांसारखी मान्यवर मंडळी डेंगळ्यांमुळेच शिरडीकडे आकर्षित झाली. श्री. नानासाहेब यांची व बाबांची भेट शिरडी व नीमगाव यांच्या वाटेवरील **'शिवाच्या ओढ्या'**च्या काठी होत असे. तेथे डेंगळे बाबांकडे आदराने पहात, देहभान हरपून बसत असत. नानासाहेबांचे वडीलबंधु बाबासाहेब यांच्याकडूनच नानासाहेबांनी बाबांच्या भक्तीची प्रेरणा घेतली. बाबासाहेबांच्या डोळ्यांची व्यथा श्री बाबांनी बिब्बे दगडाखाली ठेचून त्यांचे तेल बाबासाहेबांच्या डोळ्यांत घालून बरी केली होती. श्री. बाबासाहेबांना बाबांनी शिवाच्या नाल्याजवळ दर्शन देऊन आपले अद्भुत विभूतीमत्व प्रत्यक्ष दाखविले होते. त्यामुळे डेंगळे कुटुंबातील नानासाहेबांसह इतर मंडळी श्री बाबांना आपले परम दैवत मानू लागली. बाबांच्या आशीर्वादाने नानासाहेबांना पुत्रसंतानाची प्राप्ती झाली. एकदा शिवाच्या नाल्याकाठी नानासाहेब व

श्री बाबा यांची गाठ पडली. त्यावेळी दोघांमध्ये नित्याप्रमाणे सुखसंवाद घडला.

(स्थळ: नीमगावजवळचा
शिवाचा नाला काळ: १८८०)

## भूतांत भासू दे भगवंताचे भान!

**नानासाहेब डेंगळे:** बाबा, या शिवाच्या नाल्यापाशी आपण घटकाघटकाभर बसून कसले गूढ चिंतन करता आहात? या नाल्याच्या काठावर, या खडकांच्या पात्रात, या निवडुंगांच्या बेटापाशी आणि या बोरीबाभळीच्या तळी आपल्याला कसलातरी आगळा आनंद वाटतो आहे! बाबा, आम्हाला हे गूढ सांगा ना!

**बाबा:** नाना, या शुष्क ओढ्याकाठी, या कातळावर, या झाडाझुडपात आणि या चराचरात माझा भगवंत मला दिसतो! त्या माझ्या फकिरसरकाराच्या संगतीत मला ब्रह्मानंद मिळतो. ही सारी सृष्टी म्हणजे माझ्या हरिचेच रूप आहे. तो श्रीहरी माझ्याशी बोलतो, खेळतो, मला सुखवितो.

**नानासाहेब:** बाबा, या अलौकिक आनंदाचा वाटा आम्हाला कधी काळी मिळेल काय? आपल्या मुखावरचे तेज, आपल्या डोळ्यांतील चमक आणि आपल्या करूणामय हृदयातील दैवी संतोष पाहून मन अचंबित होते.

**बाबा:** नाना, या क्षणिक आणि नाशवंत संसारात खरा आनंद हवा असेल, तर तुला तुझ्या अंतरातील देव आणि या सृष्टीच्या कणाकणात खेळणारी, स्फुरणारी दिव्य भगवत् सत्ता जाणता आली पाहिजे.

"हे जीवन आहे अखंड मरणाधीन
मृत्युंजय आत्मा आदि अंत विहीन"

–श्री साईगीतायन

**नाना:** बाबा, आम्ही संसारात, मायाममतेत गुरफटलो आहोत. आप्तनातेवाईक, पुत्रदारा, घरदार यांतच आम्ही अखंड गुंतून खोट्या सुखदुःखात पार बुडालो आहोत.

**बाबा:** अरे, हा मायिक पसारा हा तात्पुरता आहे, क्षणभंगुर आहे! या देहापुरताच त्याचा अंमल असतो. या संसाराच्या तृष्णेतून आसक्ती जन्मते व जीव बंधनात पडतो. यासाठी त्यापासून अलिप्त रहावयास शिक! हळूहळू तुला हे जमेल.

**नाना:** बाबा, हे सर्व प्रारब्धाचे खेळ आहेत. याला मी कसे बरे आवरू किंवा टाळू शकेन! हे दैवच आम्हाला नाकात वेसण घालून दारोदार फिरवीत असते नाही काय!

**बाबा:** हे पहा, प्रारब्धाने जवळ आलेल्या घरदार, आप्तस्वकीय, धनदौलतीवर "माझे, माझे" म्हणून आसक्तीचे व अहंकाराचे खोगीर लादू नकोस! ही आसक्ती, हा अभिमान पुनर्जन्माला कारण होत असतो. एखाद्या धर्मशाळेत आपण काही क्षण विसावतो तशीच भावना या सांसारिक गोष्टीवर ठेव! खोटा मोह, लोभ व कर्तृत्वाचा अहंकार सदैव टाळीत जा! मात्र कर्तव्यकर्म व जबाबदाऱ्या नीट पाळ! नेकीने व सत्याने वागून संसारात वावर!

"कर्तव्य आचरी नको आत्मसन्मान
ज्ञानात विरू द्या कर्त्याचा अभिमान!"

**नाना:** बाबा, या संसाराच्या भुलभुलैयात एवढे अवधान कसे राखू ते सांगा!

**बाबा:** या संसारात प्रभू हाच कर्ताकरविता आहे. आपण केवळ त्याची कळसूत्री बाहुलीच आहोत, हे सतत व्यवधान ठेव! स्वत:कडे कर्तेपण घेतले की मनुष्य कर्मबंधनात सापडतो.

"कर्तेपण घेतो अजाण मानव वाया–
निर्मिते अहंता कर्माचे विंदान॥"

–श्री साईगीतायन

नाना, तू प्रभूच्या चरणी लोभ, मोह, अभिमान वहा! कर्तव्य आचर! तू प्रभूला अणूरेणूत पहा! स्वत:च्या हृदयात व सृष्टीतही मला तू एकाच वेळी पहा! तुला सर्वत्र श्रीहरिच दिसो! मगच संसारात तू देहबुद्धी सोडून वागू शकशील बरे!

(नानासाहेब डेंगळे यांना बाबांनी सृष्टीत चराचरात भगवंत भरल्याचे विराट दर्शन घडविले. शामा (माधवराव) हा बाबांचा सख्यभक्त, तर नानासाहेब हे ज्ञानी भक्त होते. चांदोरकर व दासगणू यांसारखे ज्ञानी व नामसंकीर्तन भक्त क्षितिजावर उगवण्यापूर्वीचा काळ या बाबांच्या गोपगड्यांनी सुगंधित केला. हा १८७५ ते १८८५ चा काळ बाबांच्या खेडवळ सवंगड्यांच्या संगतीचा होता. या सवंगड्यांत म्हाळसापती होते, गणपतराव होते, तात्या होते, बायजा होती, काशीराम होता व असे असंख्य भोळे-भाबडे जानपद प्रियजन होते. धन्य तो बाबांच्या लौकिक संचाराचा उष:काल!)

---

**'का**कडे स्नेहाविण जळती'– तेलावाचून पेटविलेल्या त्या पणत्यांच्या, त्या प्रकाशदीपिकांच्या प्रकाशात बाबांचा महिमा महाराष्ट्राच्या भूमीवर प्रकाशमान झाला. हा काळ १८८० चा, म्हणजे स्वामीसमर्थांच्या सामर्थ्यवान प्रभेचा १८७८ साली अस्त झाल्यानंतरचा असावा. या चमत्कारामुळे शिरडीच्या खेडूतांना बाबा म्हणजे एक साधु अथवा साधुवेषात वावरणारे एक महान सिद्ध असावेत असे वाटले! बाबांच्या सावलीत बसून त्यांच्या जीवनातील गूढ घटनांवरील भाष्याचे दोन शब्द कानी पडावे म्हणून खेडूत उत्सुक असत. बाबा साध्या शब्दांत जीवनातील घटनांवर प्रकाश टाकीत, त्यातून जीवनातील सत्कर्मांचा व सद्गुणांचा सुपरिणाम, त्याचप्रमाणे स्वार्थ, हिंसा, सूड इत्यादींचे दुष्परिणाम समजावून सांगत. पुष्कळदा प्रतिकात्मक प्रसंगांतून वा घटनांमधून बाबा जीवनाचे व कर्माचे पर्यवसान सहजपणे मनावर बिंबवीत. आपणच आपल्या पुढील जन्माचे, तसेच मुक्तीचे वा बद्धतेचे शिल्पकार आहोत, हे पटवून चारित्र्य, नि:स्वार्थीपणा, त्याग, सेवा, प्रभुभक्ती यांचे उद्धारक स्वरूप उघड करीत. असाच एक प्रसंग या ठिकाणी मांडतो. शिरडीजवळच्या रानातून वहाणाऱ्या एका ओढ्याच्या काठावर बाबा केव्हाचे येऊन बसले होते. ते कुणाची वाट पहात होते?

## ऋण, हत्या, वैर टाळा – दुष्कर्मांची फळे चुकत नाहीत

(काळ: १८८५ स्थळ: शिरडी-वळचा एक ओढा)

लागत आहेत. आपल्या कर्माचा भोग समोर आला की मनुष्यप्राणी आक्रंदत असतो. आपण केलेली दुष्कर्मेच याला कारण आहेत, हे त्याला अज्ञानामुळे समजत नसते.



(एका ओढ्याकाठी बाबा शिळेवर बसून चिलीम ओढत आहेत. एक वाटसरू तेथे येतो. बाबांना पाहून चकित होतो. नमस्कारासाठी वाकतो.)

**बाबा:** भाऊ, ये! एक विळभर विसावा घे! आपण चिलीमीचा एक झुरका घेऊ!

**वाटसरू:** दंडवत, बाबा! (झुरका घेतो.) (एका बेडकाचा प्राणांतिक चित्कार कानी पडतो.) बाबा, कसला हा आवाज? बेडकाला कोणीतरी धरलेलं दिसतं आहे. आपण ओढ्याच्या काठी जाऊन तेथे काय चालले आहे, ते पाहू या!

**बाबा:** अरे, त्या वीरभद्रप्पाने बसाप्पाचा गळा घोटलेला दिसतो. (वाटसरू पाहून येतो.)

**वाटसरू:** (चकितपणे) बाबा, ते प्राणी आहेत; माणसे नाहीत. एका सर्पाने बेडकाला पकडले आहे. बेडूक अर्धाअधिक सापाच्या तोंडी गेलेला आहे! बाबा, बलवानाने दुबळ्याला गिळावे, हा जगाचा न्यायच आहे का?

**बाबा:** अरे, करावे तसे भरावे. त्या बेडकाला गतजन्मीच्या कर्मांची फळे भोगावी

**वाटसरू:** बाबा, या बेडकाचे कोणते गतजन्मातले दुष्कर्म त्याला आता भोगावे लागते आहे?

**बाबा:** कालची पापकर्मे आजची दुःखे व व्यथा बनून पाठलाग करीत येतात. जेव्हा शिक्षेची घटका समोर साक्षात् उभी रहाते, तेव्हा आपण जाणूनबुजूनही दैवाला दोष द्यावयास चुकत नाही. दैव म्हणजेच गतकर्माच्या परिणामांचा परिपाक! हे दोघे मागील जन्मी एकमेकांचे वैरी होते. हेच वैर त्यांनी या जन्मातही बरोबर आणले आहे. प्राणीजन्मातही सर्प आपल्या वैऱ्याचा सूड उगवीत आहे. ऋण, वैर आणि हत्या या जन्मोजन्मी आपल्यामागून धावत येतात. यासाठी कधी ऋण काढू नये. काढल्यास फेडल्यावाचून राहू नये. वैराचा अग्नि क्षमेने आणि प्रेमाने शमन करावा. दुसऱ्याचा घात कधीही करू नये. हिंसा आणि हत्या प्रयत्नपूर्वक टाळावी. या कर्माचे परिणाम भयंकर आहेत.

**वाटसरू:** बाबा, ते कर्माचे राहू द्या! तो साप त्या बेडकाला घटकाभरात पूर्णपणे गिळून टाकील आणि या वैराची अखेर होईल! त्यांना वाचवा ना!

**बाबा:** भाऊ, तसे होणार नाही. त्यांचा बाप मी केव्हाचा या रानात येऊन बसलो आहे, तो कशासाठी! तो साप त्याला कसा गिळतो, तेच मी पहातो! चल, तेथे जाऊ! (दोघेही ओढ्याच्या काठी जातात.)

**वाटसरू:** ते बघा बाबा! अद्यापही त्याच जागी धडपडत आहेत.

**बाबा:** हे वीरभद्रप्पा, सोड त्याला! अजूनही बसाप्पावरची दुष्मनी सोडीत नाहीस. काही लाज, शरम धरा! ही वैरभावना सोडा आणि शांतीने जगा! (साप बेडकाला सोडतो.)

**वाटसरू:** काय हा चमत्कार! सापाने बेडकाला सोडले! दोघेही पळून गेले! बाबा, आपले शब्द यांना समजले काय?

**बाबा:** भाऊ, या बसाप्पाला वीरभद्रप्पाच्या तावडीतून सोडविण्याचे वचन मी पूर्वजन्मी दिलेले होते. ते मी पुरे केले आहे.

**वाटसरू:** बाबा, यापासून कोणता धडा घेता येईल, ते सांगा!

**बाबा:** जमीन आणि धनदौलत यांच्या लोभाने यांनी आयुष्याची राखरांगोळी केली. माणसाने हा लोभ सोडावा आणि लोभामुळे होणाऱ्या पतनातून आणि दुःखातून स्वतःला मुक्त करावे. निःस्वार्थीपणा, परसेवा, प्रेम, भक्ती यामुळे माणसाचा आत्मा श्रीमंत बनतो, धनाने नव्हे! यापासून धडा घ्या आणि सद्गुणी, चारित्र्यवान आणि प्रामाणिक जीवन जगा! देवाच्या दिशेने चाला! मृत्यूची, विनाशाची वाट सोडा! (दोघेही मार्गस्थ होतात.)

(श्री बाबांनी दोघांच्या जन्मजन्मीच्या वैरात मध्यस्थी करून भक्ताला संकटातून सोडविले. वैर, ऋण व हत्या यांच्यामुळे जीव बंधनात पडतो, नीच योनी प्राप्त करतो. ईश्वरप्रेम, गुरुशरणता आणि मानवसेवा यामुळे उद्धार होतो. सचोटी, सद्वर्तन, निरपेक्ष सेवा, काया-वाचा-मने शुद्ध रहाणे यामुळे धर्माच्या मार्गावरून पाऊल पडते. बाबा अशा सोप्या उदाहरणांनी भोळ्याभाबड्या खेडूतांना व ग्रामीण भक्तांना महान शिकवण देत. त्यांची कृपा सद्गुणी, सदाचरणी जीवांना तारण्यासाठी वाहत होती.)

---

**श्री** साईबाबांच्या १८५८ सालच्या शिरडीतील पुनरागमनानंतरची बारा वर्षे त्यांनी विजनवास व अज्ञातवासात काढली. १८५८ ते १८७० पर्यंत त्यांचा महिमा फक्त बायजाबाई, गणपतराव कोते व खेडूत जनतेने जाणला. आपल्या वडिलांच्या स्थानामागील निवडुंगांत व मातीच्या खड्ड्यातच ते झोपले. १८७३ मध्ये बीडकर महाराज, १८७५ मध्ये गंगागीर व १८८० मध्ये आनंदनाथ इत्यादी साधुपुरुषांनी त्यांना ओळखण्याचे व जनमानसात त्यांची सत्यप्रतिमा उजळण्याचे कार्य केले. स्वामीसमर्थांचे अवतारकार्य समाप्त झाल्यानंतर ती शक्ती शिरडीतून कार्यरत झाली. स्वामींची १८७८ मधील समाधी व बाबांचा १८८०च्या सुमाराचा मशिदीत पाण्याने दीप पेटविण्याचा चमत्कार प्रकाशमान झाला. ही सिद्धशक्ती १८७८ पासून १८९२ मध्ये चांदोरकर, दासगणू शिरडीच्या क्षितिजावर उगवण्याच्या उष:कालीन प्रकाशात हळूहळू दृष्टिगोचर झाली. बाबा निवडुंगांच्या व पानसाबरींच्या बनात वणवण फिरण्याच्या अज्ञातवासातून यापूर्वी १८७०च्या सुमारास द्वारकामाईच्या वातावरणाशी जुळवून घेऊ लागले. ते त्यानंतरच्या दशकांत द्वारकामाईत स्थिरावले. (१८७० ते १८८०) या काळातील प्रमुख भक्तमंडळींत म्हाळसापती, माधवराव, कोते दांपत्य, आप्पा भिल्ल, काशीराम, डेंगळे बंधु इत्यादी मंडळी प्रकर्षाने गणली जात असे. इतर खेडवळ मंडळी, ग्रामस्थ हे बाबांचे खरेखुरे सवंगडी व गोपगडी होते. त्या बाळगोपाळांतच बाबांनी आपल्या लीला प्रगट करण्यास सुरूवात केली. हे सुरुवातीचे भक्त हे जनसामान्यांतीलच भोळे भाविकजन होते. बाबा मशिदीत निजावयास जात, त्यावेळी त्यांच्यासमवेत त्यांचे प्राणप्रिय भक्त माधवराव, गणपतराव आणि म्हाळसापती त्यांच्यासमवेत असत. बाबांच्या हृदयावर हात ठेवताच त्यांच्या हृदयातून अखंड रामनामाचा जप ऐकू येई. तसेच त्यांच्या हातापायांतूनही रामनाम अखंड झरत असे, असा या द्वारकामाईत बाबांसमवेत वावरणाऱ्या व एकत्र झोपणाऱ्या पहिल्यावहिल्या सख्यभक्तांचा रोकडा अनुभव होता.

द्वारकामाई-मशिदीत बाबा झोपू लागले, त्यावेळी ते एखाद्या तरटावर किंवा गोणपाटावर पडत. मशिद अगदी जुनी मोडकळीस आलेली होती. जमिनीवर धूळ साचलेली असे. वरून कचरा, धूळ जमिनीवर पडे. नानासाहेब डेंगळ्यांनी खडबडीत जमिनीवर धुळीत रात्रौ विसावणाऱ्या बाबांना झोपण्यासाठी एक फणसाची जाड फळी आणून दिली. बाबांनी ही फळी फाटक्या-तुटक्या चिंध्यांचे दोर करून मशिदीच्या आढ्यावर टांगली. ते इतक्या उंचावर कसे चढत व तेथून कसे उतरत ते कुणासही कधीही समजले नाही. एवढी जड फळी व तिच्यावरील बाबांच्या देहाचे वजन त्या चिंध्यांचे दोर कसे सहन करीत, हे एक अलौकिक गूढ होते. जणू अष्टसिद्धी या योगेश्वराला चारी बाजूंस दीप ठेवलेल्या या फळीच्या बिछान्यावर प्रेमाने जोजवीत, अंगाईगीत गात निजवीत होत्या. हा १८८५-९०च्या सुमाराचा एक प्रसंग पहा:

## अष्टसिद्धींनो, गा हलके ग अंगाईगीत!

(स्थळ: जुनी मोडकळीस आलेली मशीद-द्वारकामाई
काळ: १८९०चा सुमार)



**म्हाळसापती:** बाबा, तुम्ही कुठे आहात? रात्री तुमच्या हृदयावर हात ठेवून मी तुमचा रामनाम जप थांबतो का पहात होतो. अरे, बाबा तर आढ्यावरील फळीवर आहेत.

**माधवराव:** म्हाळसापती, तुम्ही रात्रौ केव्हाच निद्रेच्या आधीन झालात. म्हणून मी बाबांच्या हृदयावर डोके टेकून जप ऐकला. त्याला खंड म्हणून पडला नाही. पण ते वर केव्हा गेले?

**तात्या कोते:** मी बाबांच्या हाता-पायाला कान लावून रामनाम ऐकले. पण बाबा त्या आढ्याला टांगलेल्या फळीवर कधी जाऊन झोपले, ते समजले नाही.

**म्हाळसापती:** अरे होय, बाबा त्या फळकुटावर जाऊन झोपले आहेत. आमच्या अडाणीपणाला कंटाळून ते दूर एकटे विसावले आहेत. (बाबा एकाएकी खाली झोपलेले दिसतात.)

**माधवराव:** बाबा, तुम्ही पुन्हा खाली केव्हा आलात?

**बाबा:** अरे, मला काय, खाली काय नि वर काय सारखेच. मी दोन्ही जागी आहे. मी सर्व दिशांत आणि काळात अखंड आहे.

**तात्या:** देवा, ही तर तुझी मात आहे. तू आपला चमत्कार कबूल करीत नाहीस.

**माधवराव:** बाबा, तुम्ही येथून खाली झोपलेले असता एकाएकी इतक्या उंचावर कसे जाता? तुम्ही फाटक्यातुटक्या चिंध्यांच्या आधारावर ही जाडजूड आणि

भक्कम फळी मशिदीच्या आढ्याला बांधली आहे. ती फळी स्वत:चं आणि आपले वजन रात्रौ कशी सहन करते? देवा, ही तुझी लीलाच आहे.

**म्हाळसापती :** आमच्या गुरुदेवाच्या या अष्टसिद्धी आहेत बरे! मी योगी लोकांच्या अणिमा, महिमा इत्यादी सिद्धींबद्दल खंडोबाच्या पायरीवर येणाऱ्या साधूंकडून खूप ऐकले आहे.

**तात्या :** बाबा, आम्हाला असे शरीर हलके करून लघिमा सिद्धीने वर कधी चढता येईल?

**बाबा :** अरे, ही काय वायफळ बोलायची गोष्ट नव्हे. तुम्ही माझ्या हृदयातील रामनामाचा जप कधी थांबलेला ऐकला आहे! तुम्हाला असा अखंड जप साधेल काय! हा शामा, म्हाळसा आणि तात्या बघताबघता डाराडूर घोरतात. आत्मसंयम आणि सिद्धी या उत्कट भक्ती व कठोर तप यातून मिळणाऱ्या देणग्या आहेत बरे!

**माधवराव :** हे योगेश्वरा, तुझी आत्मसिद्धी आम्हा पामरांना आणि चंचल मनाच्या संसारीजनांना कशी मिळणार! तुझी आमच्यावर फक्त कृपासावली ठेव म्हणजे झाले!

**म्हाळसापती :**

**कुणा न कळले कधी श्रीहरी**
**विसावले वर असे अधांतरी**
**कशी कळावी अलौकिकाची**
**लौकिकास मात?**

**माधवराव :** बाबा, आम्ही तुम्हाला व तुमच्या योगसिद्धींना नमस्कार करून म्हणतो :

**सकलसिद्धींनो तुमचा स्वामी**
**रंगा त्याच्या रूपी नामी**
**प्रकाशगीतामधूनं उजळा**
**गगनातील ध्वांत।**

(सर्व जातात.)

बाबांच्या, योगेश्वर्याच्या अष्टसिद्धी या सहजलीला होत्या. परंतु त्या सिद्धींचा गाजावाजा बाबांना सहन होत नसे. ही फळी व त्यावरील बाबांच्या अद्‌भुत निद्रेचा लौकिक जसा शिरडीत पसरू लागला, तसे बाबा चिडू लागले व शेवटी ही फळी त्यांनी तोडून फेकून दिली.

---

(पृष्ठ क्र. ४० वरून)

अपयश व आर्थिक नुकसान होते.

जर रविरेषा व धनरेषा एकमेकाजवळून जात असतील तर मनुष्य कलेमुळे धनवान होतो. पण एकमेकांस छेदीत असतील तर नुकसान होते.

हाताच्या मध्यभागातून दोन रविरेषा असतील तर लॉटरी किंवा इतररीत्या आकस्मिक फायदा होतो.

कीर्तीरिषा जीवनरेषेजवळील मंगळग्रहस्थानावरून निघून, रविग्रहस्थानावर जात असेल तर प्रेमाच्या माणसाकडून किंवा विवाहित स्त्रीकडून पैसा मिळतो.

या रेषेला इतरत्रहून रेषा मिळाल्यास आर्थिक लाभ होतो.

चांगली कीर्तीरिषा व चांगली मस्तकरेषा असल्यास तो मनुष्य दीर्घदृष्टी व विचारवान असतो.

रविरेषा अंत:करणरेषेतून निघून रविग्रहस्थानावर जात असेल तर उतारवयात माणूस यशस्वी होतो. त्यास द्रव्य मिळते. तो सुखी, सुस्वभावी, परोपकारी, पुण्यशील व सत्कर्मी असतो.

रविरेषेला विवाहरेषा येऊन मिळत असेल तर विवाहापासून कीर्ती व पैसा मिळतो. पण हीच जर तिला छेदीत असेल तर विवाहापासून अपमान, त्रास व आर्थिक नुकसान सुचविते.

कीर्तीरिषा मस्तकरेषेकडे तुटत असेल व अंत:करणरेषेपासून परत सुरू होत असेल तर कष्टाने यश व संपत्ती मिळवावी लागते.

रविरेषेवर स्पष्ट व चांगले नक्षत्रचिन्ह असल्यास आकस्मिक धनलाभ होतो.

रविरेषेबरोबर दोन चांगल्या रेषा रविग्रहस्थानावर असल्यास कीर्ती व आकस्मिक संपत्ती मिळते. पण या रेषा वाकड्यातिकड्या असतील तर अपयश सुचवितात. चंद्र व शुक्रग्रहस्थानावरून येणाऱ्या रेषा कीर्तीरिषेस समांतर असल्यास वारसाहक्काने संपत्ती मिळणार हे सुचवितात.

कीर्तीरिषेवर बेट असून जीवनरेषेवर वाईट चिन्ह असल्यास डोळ्याचा त्रास होतो. व्यक्तीचे अनैतिक संबंध असतात. अशी सूचना हे चिन्ह देते. श्रीमंत हातावर आर्थिक नुकसान होते.

कीर्तीरिषेवर चौकोन असल्यास, तो कीर्ती मानमरातब यांचे रक्षण करतो.

रविरेषेच्या सुरुवातीस यवचिन्ह असल्यास, अनैतिक संबंध यशाला मदत करतो. अनैतिक संबंधापासून झालेल्या मुलाचे भवितव्य या योगावर फार चांगले असते.

रविरेषा संपते तेथे नक्षत्रचिन्ह असल्यास मित्राच्या व इतरांच्या सदिच्छेने यश मिळते.

मस्तकरेषा व हृदयरेषा यांच्यामध्ये कीर्तीरिषेवर नक्षत्र असल्यास, फार मोठे संकट येणार असल्याचे सूचित करते.

रविरेषेला स्पर्श करणारी व बुधग्रहस्थानाकडे असणारी फुली यशाला फारच थोडी मदत करते. पण तीच फुली शनिच्या उंचवट्याच्या बाजूने रविग्रहस्थानाजवळ रविरेषेजवळ असेल, तर पवित्र स्वभाव असतो. हेच गुणकचिन्ह रविग्रहस्थानावर असता व्यक्ती सद्‌गुणी व प्रामाणिक असते.

कीर्तीरिषा अंत:करणरेषेवरून जात असता छेदनबिंदूवर स्पष्ट किंवा काळा ठिपका असल्यास अंधत्व येते.

(बुधग्रहस्थानाखालील) मंगळावरून येणारी रेषा रविरेषेला छेदीत असल्यास शत्रूमुळे आर्थिक नुकसान होते.

बुधग्रहस्थानावरून येणाऱ्या रेषेने रविरेषेस छेदल्यास, व्यक्तीच्या अस्थिरपणामुळे अपयश येते.

शनिग्रहस्थानावरून येणाऱ्या रेषेने रविरेषेस छेदल्यास आर्थिक अडचणीमुळे यशाला पायबंध बसतो.

(क्रमश:)

# दैववाद आणि खगोलशास्त्र

–श्री. म. दा. भट
पुणे.

फलज्योतिषाचा छंद मी माझ्या विद्यार्थीदशेपासून केला आहे. पोलिस खात्यातील सदतीस वर्षाच्या नोकरीतसुद्धा ह्या छंदानं माझी पाठ सोडली नाही. येथे जे काही मी लिहीत आहे तोही ह्या छंदाचाच एक भाग आहे.

ह्या विश्वामागे कोणतीतरी एक अचिन्त्य शक्ति काम करते असं मानणारा मी आहे. ह्या अचिन्त्य शक्तीचा शोध **'दैव'** ह्या संकल्पनेद्वारा जे शास्त्र घेते त्याला **'अध्यात्मशास्त्र'** म्हणतात आणि मानवी जीवनात प्रत्यक्षात ह्याच शक्तीचा **'दैव'** ह्या माध्यमात जे शास्त्र मागोवा घेते त्या शास्त्राला **'ज्योतिषशास्त्र'** म्हणतात.

### दैव नाही असं कोण म्हणतो

मानवी जीवनात 'दैव' नावाची गोष्ट आहे हे सर्वमान्य आहे. तत्त्वज्ञानग्रंथांतून आणि संतसाहित्यातून तत्त्वचिंतकांनासुद्धा दैवमहात्म्याचा उलगडा ठिकठिकाणी करावाच लागला आहे. कोणीही जीवनात हे असं का घडलं? का होतं? ह्याचं उत्तर स्पष्ट असं दिलेलं नाही. योगवासिष्ठयातील वसिष्ठ ऋषिपासून भगवत्गीतेतील भगवान श्रीकृष्णापर्यंत ते आजच्या नवबुद्धिवाद्यांपर्यंत सर्वजण ह्या बाबतीत अदमुरे आणि अपुरेच पडले आहेत. पूर्वजन्मीची कर्मे, प्रारब्ध इत्यादी कारणे देऊन हा विषय अजून आहे तसाच आहे.

जीवनात प्रत्येक कार्यात यशस्वी होण्यासाठी दैवाची साथ असावीच लागते असं बहुतेकांचं मत आहे.

**किंचित् दैवात् हठात्
किंचित् किंचिदेव स्वभावत:।
पुरुष: फलं आप्नोती
चतुर्थं नात्र कारणम्।**

दैव, प्रयत्न आणि स्वभाव ह्यांचा संयोग झाला की माणसाला यश मिळतं असं काहींचं मत आहे. दैवाचे अभ्युत्थान आणि कर्माचा शुभारंभ एकाच वेळेस झाला की दैव आणि कर्म ह्यांचा सुंदर मिलाफ होतो आणि सहज कार्यसिद्धि होते. श्रीमत्‌भगवत्‌गीता भारतीय तत्त्वज्ञानाचा परमोच्च बिंदु आहे. गीतेनं मानवी जीवनात यशप्राप्तीसाठी पाच प्रमुख कारणांची आवश्यकता प्रतिपादिली आहे.

**अधिष्ठानं तथा कर्ता
करणं च पृथग्विधम्।
विविधाश्च पृथक्चेष्टा
दैवं चैवात्र पंचमम्।**

(गीता, अ. १८.१४)

स्थळ, प्रत्यक्ष कर्ता, नाना प्रकारची साधने, कर्त्याचे चलनवलन, म्हणजे त्यांनी केलेल्या क्रिया ह्या चार कारणांच्या जोडीला दैव हे एक पाचवे कारण असावेच लागते असं भगवंताचं सांगणं आहे.

ज्ञानेश्वरी मराठीतील अमोल आध्यात्मिक ग्रंथ आहे. गीतेतील अठराव्या अध्यायातील वरील चौदाव्या श्लोकांवरील ज्ञानदेवांची टीका इतर सर्व टीकांपेक्षा निराळी आहे. श्लोकांतील 'दैव' ह्या शब्दावर टीका करताना ज्ञानदेवांनी त्या संदर्भात सूर्यमालेकडे पहा असं दर्शवून जणूकाही 'फलज्योतिषशास्त्रा'च्या मूळ गाभ्याला आपली मान्यताच दिलेली आहे.

**म्हणूनि चक्षुरादिकीं दाहे।
इंद्रिया पार्ठी स्वानुग्रहें।
सूर्यादिकां कां आहे।
सूरांचे वृंद॥
ते देववृंद बरवें।
कर्मकारण पांचवे।
अर्जुना एथ जाणावें।
देवो म्हणे॥**

ज्ञानदेव म्हणतात: दशेंद्रियांनी माणूस जी जी कर्मे करतो त्यांत यश मिळण्यासाठी सूर्यमालेतील ग्रहांची कृपा असणे हेच ते पाचवे कारण आहे. ज्ञानदेव सूर्यमालेतील सर्व ग्रहांना देव मानतात, देववृंद म्हणून संबोधितात.

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात 'दैव' हा विषय कसा आला आहे हे प्रतिपादन करण्यासाठी म्हणून वरील विचार मांडले. हे अवघड विषय आम्हा सर्वसामान्यांना कळत नाहीत. आम्हाला हे समजते की प्रत्येक माणसाच्या जीवनात कोठेतरी काहीतरी आकस्मिकता असते. काही वेळा ध्यानीमनी नसणाऱ्या घटना घडतात. काही वेळा गोष्टी सहजासहजी होतात. तर काही वेळा हिमालयाएवढे प्रयत्न करूनही काहीही होत नाही. ह्या सर्वांना प्रत्येकाच्या जीवनात काहीतरी अर्थ असतो. दैव, दैव म्हणून म्हणतात ते याहून काही निराळे नाही. नियतीशी संघर्ष ही मानवी जीवनातील एक शाश्वत अशी वास्तवता आहे. हा संघर्ष जोपर्यंत आहे तोपर्यंत दैव नावाची गोष्ट रहाणार आणि दैव आहे असं म्हटलं की दैवज्ञ येणार आणि ह्या ना त्या प्रकारात ज्योतिष नावाची ज्ञानशाखा रहाणारच.

### ज्योतिष एक पुरातन शास्त्र

माणसाचं दैव ज्योतिषशास्त्रानं बघता येतं, अजमावता येतं, समजतं असा ह्या शास्त्राचा दावा आहे. भारतात ह्या शास्त्राला मोठी पुरातनता लाभली आहे. भारत ज्योतिषशास्त्राची जननी आहे असे सिद्ध करणारे जास्तीत जास्त पुरावे उपलब्ध आहेत. शतपथ ब्राह्मण, तैत्तिरीय संहिता, महाभारत, वेदांगज्योतिष इत्यादी पुरातन ग्रंथांतून भारतीय नक्षत्र-ज्योतिष पद्धतीची भक्कम पायाभरणी झालेली दिसते.

थोडक्यात, भारतात फलज्योतिषशास्त्राला इ.स. पूर्व ३००० वर्षांची पुरातनता आहे.

### अथर्वज्योतिष ज्योतिषाचा पाया

अथर्वज्योतिष किंवा ज्याला आत्मज्योतिष असं दुसरे नाव आहे, त्यात सांप्रतच्या ज्योतिषाचा पाया बराच पक्का झालेला दिसतो. विद्वानांनी अथर्वज्योतिषाचा काळ इ.स. पूर्व सातशे आहे असं मत मांडले आहे. पाश्चिमात्य देशात ज्योतिषशास्त्र फार पुरातन होतं असं म्हणता येणार नाही. पाश्चिमात्य देशात

जुन्यात जुनी कुंडली उपलब्ध आहे ती इ.स. पूर्व ४१०ची आहे. ह्या कुंडलीत फक्त चंद्र आणि इतर पाच ग्रह नुसते राशीनुसार दिले आहेत. ह्यापूर्वी कितीतरी शतके आधी भारतातील पुरातन ग्रंथांतून रवि-चंद्र, पंचतारा आणि राहु-केतु अशा नवग्रहांची नक्षत्रस्थिती इत्यादिंचा स्पष्ट उल्लेख आलेला पहावयास मिळतो. पाश्चिमात्य राष्ट्रांत टॉलेमीच्या (इ.स. १५०) टेट्रॅबिबलॉस (Tetrabilos) ह्या ग्रंथापासून फलज्योतिषशास्त्रानं खरं मूळ धरलं. भारतात नंतरच्या काळात वराहमिहिरानं (इ.स. ५५०) फलज्योतिषशास्त्राचा पाया नव्या-जुन्याचा संयोग करून भक्कम असा केला. वराहमिहिरानं मोठं काम केलं. ज्योतिषाच्या सिद्धान्त, संहिता, होरा ह्या तीन स्कंधांवर त्याचे अनेक संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहेत.

इतक्या जुन्या काळापासून आजतागायत ज्योतिषशास्त्राचा अभ्यास विविध अभ्यासक करीत आहेत, ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत. आश्चर्याची गोष्ट ही की सांप्रत ह्या शास्त्रावरील जास्तीत जास्त उत्तम ग्रंथ पाश्चिमात्य राष्ट्रांतून प्रसिद्ध होत आहेत. पाश्चिमात्य ग्रंथांचा दर्जा चांगला आहे. भारतात ह्या शास्त्रावर प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांची संख्या किरकोळ आहे. ग्रंथांचा दर्जाही निकृष्टच आहे. शास्त्र आमचे आणि ग्रंथ पाश्चिमात्य अशी ज्योतिषशास्त्राची भारतात आज शोचनीय स्थिती आहे. ह्याला कारण भारतातील ज्योतिषशास्त्राचे अभ्यासकच आहेत.

झटपट विद्या, झटपट प्रसिद्धी ह्यामागे अभ्यासक लागले आहेत. चिंतन-मनन केल्याशिवाय लिहिणं-बोलणं ह्याकडे नव-अभ्यासकांचा जास्त कल दिसतो. काही अभ्यासक शास्त्रमर्यादा व सामाजिक बांधिलकी सोडून बोलतात व लिहितात. अभ्यासकांचे हे दोष ज्योतिषशास्त्राच्या प्रतिष्ठेला सांप्रत जास्त धक्कादायक ठरत आहेत. ह्या सर्वांमुळे आधीच टीकेचा विषय असलेले हे शास्त्र जास्त बदनाम होत आहे.

## ज्योतिष एक दुर्लक्षित शास्त्र

बुद्धिवादी फलज्योतिषशास्त्र मानीत नाहीत. हल्ली प्रत्येकाला असं वाटतं की शास्त्र म्हटलं की ते दोन अधिक दोन बरोबर चार असंच असलं पाहिजे. शास्त्रशाखांत काही प्रकार असतात, प्रत्येक शास्त्राला काही मर्यादा असते, कुळी असते ह्या सर्व गोष्टी विचारात न घेता ज्योतिषशास्त्रावर टीका केली जाते. शास्त्रे दोन प्रकारची असतात. ठळकपणे त्यात दोन वर्ग पडतात. पहिला वर्ग सजीवसृष्टीशी निगडीत शास्त्राचा (Science dealing with animate objects), दुसरा वर्ग निर्जिवसृष्टीशी निगडीत शास्त्राचा (Science dealing with inanimate objects). एका प्रकारातील शास्त्राची तुलना दुसऱ्या प्रकारातील शास्त्राबरोबर करता येत नाही. त्यातून मानव आणि त्याचं मन ह्यासंबंधी शास्त्राची स्थिती फार नाजूक आहे. मानव आणि त्याचं मन, बुद्धि ह्याबाबतीतील शास्त्रे नेहमीच अपूर्ण, मर्यादित आणि ह्या ना त्या प्रमाणात अदमुरी राहिली आहेत. ही शास्त्रे प्रयोगशाळेची शास्त्रे नाहीत. ह्या शास्त्रांना कोणत्याही लॅबोरेटरी स्टॅन्डर्सनं मोजता वा मापता येणार नाही. ज्योतिषशास्त्र त्यातलंच एक शास्त्र आहे. त्यातून गेली तीनशे-चारशे वर्षे ज्योतिष समाजातील ज्ञानवंतांकडून संपूर्ण दुर्लक्षित राहिलं आहे. ह्या सर्व गोष्टी शास्त्रांवर टीका करताना टीकाकारांनी लक्षात घ्यावयास हव्यात.

## फलज्योतिष अध्यात्मशास्त्राचं एक अंग

ज्योतिषशास्त्र अध्यात्माचं एक अंग आहे, मानवी जीवनाचं बीजगणित आहे, निसर्ग, सूर्यमाला आणि मानव ह्यांचं नातं सांगणारी एक उत्तम ज्ञानशाखा आहे.

मानवी मन, मनोकामना, वासना यांच्या रंग आणि छटा उलगडून दाखविणारं ते एक आद्य मानसशास्त्र आहे असं मला वाटतं.

प्रा. जे. बी. एस्. हॅल्डने (J. B. Haldane) थोर विचारवंत आणि तत्त्वज्ञ होते. काही वर्षांपूर्वी त्यांनी कलकत्त्यात वास्तव्य केले होते. द हिंदू (The Hindu) ह्या वर्तमानपत्रात ते काही दिवस लिहित असत. 'Is science a misnomer' अशा शीर्षकाखाली त्यांचा एक लेख प्रसिद्ध झाला होता. त्यात ते लिहितात:

I am inclined to think that the word 'Science' though it is not grossly misleading in Western Europe, may be so in India. I do not know how it is translated into most Indian languages. But I should like to see it translated into a word or phrase meaning 'Interest in Nature' or perhaps better 'Interest in Prakriti' for as I understand it, the word Prakriti covers those aspects of human minds which can be the subjects of scientific investigation.

वरील विचार चिंतनीय आहेत. शास्त्रज्ञ हॅल्डने म्हणतात: 'शास्त्र' ह्या शब्दाचा नेमका अर्थ पश्चिम युरोपात आता गूढ किंवा गर्भित राहिला आहे असं नाही. परंतु भारतात मात्र तो थोडा असावा. निरनिराळ्या भारतीय भाषांत हा शब्द कसा वापरतात हे समजत नाही. पण येथील एकंदर विचारपद्धती पहाता तो एखाद्या व्याख्येच्या स्वरूपातच करावा लागेल आणि तो तसा केला तर या देशात **'निसर्गात रस घेणारं ज्ञान' 'प्रकृतिज्ञानात रस'** असाच करावा लागेल. प्रकृति-ज्ञानात मानव आणि त्याचं मन ह्यासंबंधी अनेक गोष्टी समाविष्ट होऊ शकतात म्हणून मला असं वाटतं की ह्यासंबंधी विचार वा अभ्यास शास्त्रीय संशोधनाचा विषय होण्यास हरकत नाही.

प्रा. हॅल्डने यांचे वरील विचार काही भारतीय शास्त्रांच्या संदर्भात खरे आहेत. ज्योतिषशास्त्राच्या बाबतीत जास्त संयुक्तिक व बरोबर आहेत. ज्योतिषशास्त्राचा उगम सूर्यमालेत आहे. सूर्यमाला त्याचा पाया आहे. सूर्यमालेतील ग्रहांची स्थिती आणि गति ह्यांत जोपर्यंत ढवळाढवळ होत नाही तोपर्यंत ज्योतिषशास्त्राचा पाया पक्का रहाणार आहे. खगोलशास्त्रज्ञ काहीही म्हणोत सूर्यमालेतील ग्रह, ग्रहभ्रमणें, त्यातील स्थिती आणि गति ह्यात बदल वा त्याचं मानवकृत बाह्य नियंत्रण होईल असा दिवस उजाडणार नाही अशी माझी श्रद्धा आहे; आणि उजाडलाच तर त्यावेळेस एका नवसृष्टीची निर्मिती होईल.

## विश्वाचं भातुकलं

### सूर्य-चूल, इतर ग्रह बोळकी

फलज्योतिषशास्त्र निसर्गाचा अभ्यास आहे. तो एक प्रकृतीचा विचार आहे, अध्यात्माचे अंग आहे. ते शास्त्र म्हणजे

अद्वैताचे विज्ञान आहे. भारतीय ऋषिमुनींनी निरनिराळ्या ग्रहांना दिलेल्या आद्य गुणधर्मांचा (Attributes) मागोवा घेत विचार केला तर संपूर्ण सूर्यमाला म्हणजे सांख्यतत्त्वज्ञानाचं सुंदर प्रतीकच आहे असं मला वाटलं.

फलज्योतिषशास्त्र अभ्यासकानं सांख्यतत्त्वानुसार सूर्यमालेचा मागोवा घ्यावा. स्त्रीपुरुष संयोग, निर्मिती ह्यांचे मूळ अधिष्ठान सूर्यमालेत आहे. त्यातील ग्रहांनुसार देव, दैव, स्वभाव, परिस्थिती, यश आणि अपयश इत्यादि मानवी जीवनातील विविध प्रश्नांचे आकलन सांख्यतत्त्वानुसार होते हे सूत्र आहे. म्हणूनच आम्ही ज्योतिषी नाथसंप्रदायाच्या पिंड-ब्रह्मांड सिद्धान्ताप्रमाणेच असं मानतो :

Man is the miscrocosm of the macrocosm and that that which is below is the reflection of that which is above.

खाली पृथ्वीवर आहे ते सर्व वरील आकाशातील भूमध्यपरिस्थितीत (Geo-centric System) ग्रहयोगांचे जणूं प्रतिबिंबच असते.

देवहूतीपुत्र कपिलमुनीने सांख्यशास्त्र मांडले. सांख्यतत्त्वज्ञानात दैववाद आहे. म्हणूनच माझ्या मते सांख्यतत्त्वज्ञान फलज्योतिषशास्त्राला जास्त जवळचे व्हावे. त्यात सईश्वरवादी कोण, निरीश्वरवादी कोण हा वेदान्त्यांत वादाचा विषय असेलही ? The system of Kapila leads directly to fatalism and mediately to atheism असे काही जर्मन अभ्यासकांचे मत आहे. (Historical Sketch of Sanskrit Literature– Adelung.) दैव (Destiny) ह्या एका गोष्टी व्यतिरिक्त फलज्योतिषशास्त्रात इतर दुसरे काय आहे ?

सांख्यशास्त्रात सृष्टीतील सर्व पदार्थांचे तीन वर्ग केले आहेत. एक **ज्ञ (पुरुष)**, दुसरा **अव्यक्त (मूळ प्रकृति)** व तिसरा **व्यक्त (सर्व विकार)**. ह्यातील पहिल्या आणि दुसऱ्या प्रकाराबद्दल परमार्थ शास्त्रात ऊहापोह करणे युक्त होईल. मी सूर्यमालेत फलज्योतिषतत्त्वानुसार डोकावत आहे. म्हणून व्यक्त म्हणजे मानवी विकारांची-वासनांची अभिव्यक्ती आणि त्यांची फले हाच माझ्या प्रतिपादनाचा येथे मूळ गाभा आहे. वेदान्तात त्रिगुणात्मक प्रकृति म्हणून ज्याला म्हणतात त्यालाच आध्यात्मिक ज्योतिषात (Esotoric Astrology) वासना (Instincts) म्हणून म्हणतात. ह्या वासना वारांगनेप्रमाणे असतात, नटीप्रमाणे असतात. वासना माणसाला घडवतात, वासना काम करतात आणि वासनाच माणसाला सुखदु:खांच्या नाना प्रकारात टाकतात, इत्यादि जे आपण समजतो, मानतो त्याचा ज्योतिषशास्त्रदृष्ट्या विचार केला पाहिजे.

वासना माणसाला नाचवतात, सुखदु:खांत टाकतात, असे जे आपण म्हणतो ह्याचा दुसऱ्या अंगी विचार केला पाहिजे. शास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर एका अर्थी वासनेचे मूळ माणसाची बुद्धिच आहे. म्हणूनच भगवत्गीता **'बुद्धिकर्मानुसारिणी'** असे म्हणते. जगात काळोख नावाची गोष्ट नाही. जिकडे-तिकडे प्रकाश आहे. **'सूर्य: आत्मा जगतस्य'** असे मानायचे आणि काळोख आहे असे म्हणावयाचे. अखंड प्रकाशात अंधार नावाची बुद्धिनेच कल्पना केलेली एक गोष्ट आहे. ही बुद्धिच सर्व नाटककार आहे. प्रकृति आणि वासना यांना नाचविणारी आद्य शक्ति आहे. मानवी बुद्धि **''प्रकृतिच्या पोटीं गौप्य जो असे''** असा जो अहंकार (Ego) ह्याच्या बोलण्यावरून विषय नावाच्या तमासगीरांना जमा करते, त्यांच्याबरोबर नाचू लागते. टाळ, डफ घेऊन मग इंद्रियें जमतात आणि कुंडलीतील सुख-दु:खांच्या नाटकाला सुरूवात होते.

**उभयसंगु पहिले।**
**बुद्धितत्त्व प्रसवले।**

कुंडलीत तुम्हीं बुधादित्य योग पहाता. परंतु ही विश्वरचना चालविणारा एक अद्वितीय बुधादित्य योग मूळ सूर्यमालेत आहे. बुध ग्रह मानवी बुद्धीचा कारकग्रह आहे. जगाचा आत्मा असलेल्या सूर्याजवळच तो भ्रमणशील आहे. बुद्धि जी कर्मानुसारिणी म्हणून सांगितली आहे, तिचा कारक ग्रह जो बुध, परप्रकाशित (Non-Luminious) आहे. तो आद्य स्वयंप्रकाशित सूर्य नावाच्या महान ताऱ्यांजवळ आहे. सूर्यमालेतील पहिला ग्रह बुध प्रचंड शक्तीभोवती फिरतो. ती शक्ति म्हणजे सूर्य.

सूर्य हाच सर्व जगाच्या उत्पत्तीचे कारण आहे. विश्वाचा चालक तोच आहे. **सूर्य: आत्मा जगतस्य।** हेच तत्त्व नवीन नवीन आधुनिक शास्त्रे ह्या ना त्या प्रकारे सांप्रत आपणाला पटवून देत आहेत. सूर्य ही एक प्रचंड शक्ति आहे. वेदान्तात चित्प्रकाश जो प्रत्येक प्राणीमात्रांत भरून राहिला आहे तो सूर्यच आहे. ह्याच चित्प्रकाशानं विश्वनिर्मिती केली आहे. एक भातुकलीचा खेळ मांडला आहे. ह्या खेळातील अगदी पहिला ग्रह बुध आहे. ज्योतिषात बुद्धिचा कारक ग्रह बुध मानला आहे. तो स्त्री-पुरुष, नपुंसक कसाही असतो. इंद्रियांना आज्ञा करण्याची शक्ति शास्त्रकारांनी बुधाला दिली आहे.

बुध हा देवांचा गुरु बृहस्पति (गुरु ग्रह) याला तारेपासून फसवून झालेला एक अनौरस पुत्र आहे अशी एक दंतकथा आहे. ह्या दंतकथेत शास्त्र आहे. बुध अनौरस आहे ह्याचा अर्थ तो स्वतंत्र आहे. त्याची बुद्धि स्वतंत्र आहे. तो आईबाप मानत नाही. तो गुरूचा पुत्र आहे ह्याचा अर्थ तो श्रेष्ठ आहे, मोठा आहे, बुद्धिश्रेष्ठ आहे. तो अनौरस आहे ह्याचा दुसरा अर्थ बुध ग्रहाला जातकुळी नाही. सर्व ज्ञातींचा तो कारकग्रह आहे. तो पुरुष आहे. तो स्त्री आहे. तो नपुंसक आहे. बुद्धिला लिंग नसते. स्त्रीची बुद्धि, पुरुषाची बुद्धि, नपुंसकांची बुद्धि असा निरनिराळा प्रकार नसतो.

हा चिरंतन भातुकलीचा खेळ कोणी एका चैतन्यांशाने केला आहे. त्याला कोणी परमात्मा म्हणतात, कोणी ईश्वर म्हणतात, तर कोणी चैतन्य मानतात. पण एक मात्र खरे की हा जो कोणी चैतन्यांश आहे त्याच्या अगदी जवळ-निकट-संन्निध असा बुध नावाचा ग्रह आहे, बुद्धितत्त्व आहे. कोणतीही गोष्ट निर्माण होण्यास चित्प्रकाशाबरोबर बुद्धितत्त्वाची एकमेव जरूरी आहे. निर्मिती होण्यास नुसते बुद्धितत्त्व उपयोगी ठरत नसते, तेथे पाहिजे असते **वासना, प्रेरणा, काम.**

### शुक्र हा निर्मितीचा ग्रह – सूर्यमालेत दुसरा

फलज्योतिषात शुक्र हा वीर्यप्रदायक, कामविकार दाखविणारा, विलासी, चित्रविचित्र गोष्टींची आवड असलेला, मोठा कलाकार ग्रह मानला आहे. स्त्री-पुरुषांतील

विवाह-प्रेम-लैंगिक भावना इत्यादिंचा कारक ग्रह म्हणून त्याला ज्योतिषात अग्रमान आहे. कामविकार हा त्याचा मुख्य विषय आहे. हे आपल्या पृथ्वीवरील शुक्राचे जीवन आहे. विश्वात त्यापेक्षा निराळे नाही. सूर्यमालेत विश्वनिर्मितीच्या संदर्भात शुक्र ग्रहानें हेच कार्य केले आहे. ब्रह्मदेवाला असे वाटले की आपण निराकार राहू नये, साकार व्हावे, श्वास घ्यावा, प्रश्वास घ्यावा, काहीतरी हालचाल करावी. हे ज्याला वाटले त्याला शुक्र नावाचा ग्रह म्हणून संबोधितात. बुधानंतर, बुद्धितत्त्वानंतर सूर्यमालेत हा शुक्र ग्रह ठाण मांडून बसला आहे. शुक्र ब्रह्माची वासना आहे. तो काम आहे. तो चित्प्रकाशाची इच्छा आहे. त्यातूनच ब्रह्माला असे वाटले की मी एक आहे तो बहु व्हावे **एकोऽहं बहुस्यां।** ह्यात अर्थ भरला आहे. ह्या शुक्रानंतर मग पुढे सूर्यमाला सांख्यतत्त्वानुसार कशी आहे, ह्याचा विचार करावयास पाहिजे.

## सूर्यमालेत शुक्रानंतर पृथ्वी

### स्त्री-पुरुषांमुळे पृथ्वीवर निर्मिती आहे हे आपण मानतो

पृथ्वीवर देवाला निर्मिती पाहिजे होती. ती करण्यासाठी सूर्यमालेत शुक्र पृथ्वीच्या अलिकडेच येऊन बसला. कारणनिर्मितीसाठी कामविकार लागतो, स्त्री-पुरुषांचं युग्म लागतं. निर्मितीसाठी नंतर योग्य स्थळ लागतं. सूर्यमालेतील पृथ्वी ग्रहानं ते पुरविलं.

**याकारणे कामें।**
**स्त्रीपुरुषयुग्मे।**
**मिळती तेथ जन्मे।**
**आघवेजग॥**

आता सूर्यमालेकडे पहा. सूर्य स्थिर आहे. सूर्याभोवती ग्रहांचे कॉस्मिक मेरी-गो-राऊन्ड (CosmicMerry-go-round) चालू आहे. एका विशिष्ट क्रमानं सूर्य सोडून त्यात सर्व ग्रह फिरतात. ह्या प्रत्येक ग्रहाला भारतीय ऋषिमुनींनी ज्योतिष तत्त्वानुसार जे आद्य गुणधर्म दिले आहेत ते नीट अभ्यासले तर मी हा जो विचार आपणापुढे ठेवीत आहे त्याचं थोडं स्पष्टीकरण होईल.

सूर्यमाला

**रवि** – स्थिर, **बुध** – बुद्धितत्त्व, **शुक्र** – प्रकृति स्त्री, **पृथ्वी** – चंद्र-उपग्रह, **मंगळ** – पुरुष, **गुरु** – ज्ञान, **शनि** – कर्म.

**चंद्र-उपग्रह**

(१) मन (२) प्राण (३) मनसः स्पंदनं प्राणः। (४) प्राणस्य स्पंदनं मनः। (५) चित्तचतुष्ठय।

**थोडं स्पष्टीकरण**

सूर्यमालेतील ग्रहानुक्रम आणि त्यांचे ज्योतिष ग्रंथातून दिलेले गुणधर्म (Basic Attributes) सांख्यतत्त्वज्ञानाच्या माध्यमात सूर्यमालेत बीजगणितासारखे मांडलेले पहावयास मिळतात. आपण पृथ्वीवर रहातो. आपली पृथ्वी शुक्र आणि मंगळ ह्या दोन ग्रहांचा शेजार करून आहे. शुक्र स्त्री आहे. मंगळ आद्य पुरुष ग्रह आहे. थोडक्यात पृथ्वीचा हा प्रकृति-पुरुषांचा शेजार आहे. ज्योतिषात मनाचा कारक ग्रह चंद्र सांगितला आहे. तो पृथ्वीभोवती फिरतो. पृथ्वीचा उपग्रह आहे. वास्तविक चंद्र काही इतर नक्षत्र ताऱ्यांप्रमाणे स्वयंप्रकाशित नाही. पण भगवान श्रीकृष्ण जगातील पहिले मानसशास्त्रज्ञ होते. गीतेत **नक्षत्राणां अहं शशी।** असं सांगून त्यांनी जगातील सर्व तत्त्वज्ञांची जणू विकेटच घेतली आहे. सुख आणि दुःख हा मनाचा खेळ आहे. एका इंग्रजी लेखकाने म्हटलं आहे 'Happiness is a condition of mind rather than result of circumstances.' 'सुख' आणि 'दुःख' ह्या दोन शब्दांतील 'सु' आणि 'दु' बाजूला काढले की उरतं ते 'ख' म्हणजे आकाश. तत्त्वज्ञान सांगते की माणसातील दहा इंद्रियांचा मूळ गाभा मन आहे. मन प्राणतत्त्व आहे. प्राणाचं स्पंदन म्हणजे मन आणि मनाचं स्पंदन म्हणजे प्राण. चित्तचतुष्ठयांत मन व्यावहारिकदृष्ट्या जास्त महत्त्वाचे आहे. माणूस जन्माला आला की हळूहळू त्याच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाण वाढू लागते. ही जाण म्हणजेच ज्ञान आहे. गुरू ग्रहाकडे हे ज्ञान शास्त्रकारांनी सोपविले आहे. गुरू म्हणजे मोठा. मोठा म्हणजे मोठा अहंकार. ज्ञान अहंकार आहे. मी हे ज्योतिष आणि अध्यात्म यांच्या अनुरोधानं लिहीत आहे म्हणून येथे पुरावा पण तसाच दिला पाहिजे. माणसाचा जन्मच मुळी कामविकारात आहे. काम आला की क्रोध येतोच; आणि हे दोनही ज्ञानाची संगत करूनच रहातात. सृष्टीचा हा आद्य नियम आहे.

**जैसी चंदनाची मुळी।**
**गिंवसोनी घेपे व्याळी।**
**ना तरी उल्बाची खोळी।**
**गर्भस्थासी।**
**कां प्रभावीण भानु।**
**धूमेवीण हुताशनु।**
**जैसा दर्पण मळहीनु।**
**कहींच नसे।**
**तैसें इहींवीण एकले।**
**आम्ही ज्ञान नाही देखिलें।**
**जैसे कोंडे नि पां गुंतले।**
**बीज निपजे।**

चंदनाच्या मुळीला साप वेढा घालतो. गर्भाला वेष्ठणाची गवसणी असते. प्रकाशावाचून सूर्य नसतो. धुरावाचून अग्नि नसतो. मळावाचून आरसा नसतो. धान्याच्या कोंड्यांतच कुठंतरी बीज लपून रहातं. ज्ञानदेव म्हणतात तसं कामक्रोधाशिवाय ज्ञान आमच्या पहाण्यात आले नाही.

आमच्याकडील जुन्या ज्योतिष ग्रंथांत **पंचतारा** म्हणून एक तत्त्व मानलं आहे. रवि स्थिर आणि चंद्र पृथ्वीचा उपग्रह म्हणून हे दोन ग्रह बाजूस ठेवून उरलेल्या इतर पाच ग्रहांना पंचतारा म्हणून संबोधितात. हे पाच ग्रह म्हणजे बुध-शुक्र-मंगळ-गुरू आणि शनि हे होत. हा पंचमहाभूतांचा विचार आहे. आपलं जीवन म्हणजे एका अर्थानं पंचमहाभूतांचा खेळच आहे. ह्या खेळाशिवाय येथे दुसरं आहेच काय! माणसाचा जन्म झाला की **'मी'** आणि **'माझं'** ह्याचं ज्ञान होतं. ते ज्ञान मोठं मोठं होत जातं. **'देह'** हे त्याचं केंद्रस्थान असतं आणि **'कर्म'** हे त्या ज्ञानाच्या अभिव्यक्तीचं माध्यम असतं.

**देह तंव पांचांचे जालें।**
**हें कर्माचां गुणीं गुंथलें।**
**भंवतसे चाकीं सूदलें जन्ममृत्यूचां॥**

ज्योतिषशास्त्रात शनीला कर्माचा कारक ग्रह म्हणून मानतात. तो आयुष्यकारक

म्हणूनही मानला आहे. तो रविपुत्र आहे. यमाचा भाऊ आहे. तेली आहे. ह्या शास्त्रीय संकल्पना वाटतात. तो तेली आहे, ही कल्पना तर अफलातून आहे. तेली आला की घाणा आला. घाण्याला दोन बैल असतात. ह्या दोन बैलांतील एका बैलाचं नाव 'प्रवृत्ती' आहे आणि दुसऱ्याचं नांव 'निवृत्ती' आहे. वैद्यनाथ (जातकपारिजात) म्हणतो, मानवी जीवनांतील यश किंवा अपयश दशमस्थानावरून बघावं. निसर्गकुंडलींत दशमाचा अधिपती शनीच मानला आहे. मानवी जीवन तसं पाहिलं तर दुसरं-तिसरं काय असतं? एक तर हे निखळ प्रवृत्तीपर असतं किंवा क्वचित् शुद्ध निवृत्तीपर असतं. प्रवृत्ती आणि निवृत्ती दोन टोके आहेत. सामान्य माणसांना जीवनात ही दोनही टोके जवळजवळ आणणे जमत नाही. म्हणून तत्त्वज्ञ संतांनी आम्हाला ह्याचा मध्य मार्ग दाखविला आहे. जीवनात प्रवृत्तीबरोबर थोडी निवृत्ती सांभाळा. कर्मयोगी व्हा. असा त्यांचा संदेश आहे. आमची जुनी सूर्यमाला शनीपर्यंतच होती. त्यानुसार येथे सांख्यतत्त्वानुसार थोडं विचारमंथन केलं. सूर्यमालेत आता **हर्षल-नेपच्यून-प्लुटो** हे नवीन ग्रह आले आहेत. त्यांचा विचार केला आहे. संगीताचे सूर तेच, गाणं निराळं, राग वेगळा आणि मांडणी वेगळी. संगीतातील ऑक्टेव्ह पद्धतीचा (Octave Theory) पाया धरून ह्या नवीन ग्रहांचे आद्य गुणधर्म ज्योतिषांनी अनुभवानं मांडले आहेत. येथे पूर्वरंग संपवू व आता उत्तररंगाला सुरुवात करू, इतर अनुषंगिक विषयांकडे वळू.

**ज्योतिषशास्त्रातील शिफारसवजा भाग गौण**

ग्रहरत्ने, मुहूर्त, ग्रहशांती, ग्रहांचे जप, विवाहमीलनांतील कुंडलीमीलन ह्या संदर्भात काहींचे प्रश्न असतात. ह्यात काही अर्थ आहे का? काही टाळता येते का? अशा शंका काहीजण विचारतात. मूळात हा श्रद्धेचा भाग आहे. येथे मी फक्त शास्त्रीय उत्तर देतो. प्रत्येक शास्त्रात शिफारसवजा (Reccomandatory) अशा काही गोष्टी सांगितलेल्या असतात. वरील सर्व प्रकार तसेच आहेत. कोणत्याही शास्त्रात शिफारसवजा आलेले नियम, उपाय आद्य-नियमांवर (Mandatory Rules) मात करू शकत नाहीत. वरील सर्व भाग असे आहेत. ज्योतिषशास्त्रात मूळ ग्रहयोग काय आहेत, दैव काय आहे, प्रारब्ध काय दाखविते ह्या गोष्टी शेवटी महत्त्वाच्या आहेत आणि त्यानुसारच सर्व घडणार हे सत्य आहे.

**कां ललाटींचे लिहिलें।**
**न मोडे गा काहीं केलें।**
**काळे गोरेपण धुतलें।**
**फिटों नेणें॥**

(ज्ञा., १८-१०२)

कपाळी जे लिहिले आहे ते पुसता येत नाही त्यालाच दैव म्हणतात. ज्ञानदेवांप्रमाणेच पराशरानं मैत्रेयाला ज्योतिष शिकविताना सांगितले आहे: **'विधाता लिखिता या सा ललाटाक्षरमालिका।**

एक ज्योतिष अभ्यासक म्हणून वरील मुलभूत विचार मांडला. असे असले तरी प्रत्यक्षात माणसानं प्रयत्न आणि कर्म ह्याची पक्की कास धरावी हेच खरे आहे. माझे सद्‌गुरू **स्वामी स्वरूपानंद** सांगत, डावा हात दासबोधांवर असावा आणि उजवा हात ज्ञानेश्वरीवर ठेवावा. संपूर्ण ज्योतिष निखालस असं समजत नाही असं ज्ञानवंत ज्योतिषांचं मत आहे. ज्योतिष अभ्यासताना मात्र खऱ्या अर्थाने **'दैवज्ञ'** भूमिका घ्यावी असं माझं मत. ह्या संदर्भात मला **शॉफेनहॉवर** जे म्हणतो ते पटतं. तो म्हणतो :

Whole course of a man's life in all it's incidents great and small is as necessarily predetermined as the course of a clock.

**ज्योतिष टीकाकार**

हल्ली ज्योतिष अंधश्रद्धा आहे असं म्हणून त्याविरुद्ध एक चळवळ चालू आहे. आजकाल परिस्थिती सर्वच बाबतीत मोठी विचित्र आहे. अभ्यासाविना प्रश्न विचारणे, कर्तव्य आणि जबाबदारी विना हक्क मागणे हे लोकशाहीचे दान आहे. कोणी कोणाला कशाचाही जाब विचारावा असा काळ आहे. ह्यात जाब विचारणाऱ्याला त्या त्या क्षेत्रात काही किमान ज्ञान वा अधिकार असावा लागतो हे लोक विसरले आहेत. पण अधिकाराशिवाय प्रश्न हल्ली सर्व क्षेत्रांत विचारले जातात आणि अधिकाराशिवाय उत्तरेही दिली जातात. हे पाहून त्या त्या ज्ञानशाखेतील अधिकाराची अधिक विचारपूस करण्याचा अधिकार तरी कोणाला आहे ह्याची चौकशी करण्यासाठी एक समिती असण्याची आवश्यकता वाटते.

**कसली श्रद्धा आणि कसली अंधश्रद्धा?**

नानाविध चळवळी प्रत्येक ज्ञानशाखेविरुद्ध चालविता येतील अशी सांप्रतची सामाजिक परिस्थिती आहे. न्यायशास्त्रावर आमची श्रद्धा आहे. सांप्रत कोर्टातून काय घडतं आहे की जे पाहून ती आमची अंधश्रद्धा म्हणू नये? शिक्षणशास्त्रावर-पद्धतीवर आमची श्रद्धा आहे. पण नापासाचे पास, पासाचे नापास, चुकीचे प्रवेश, खोटी सर्टिफिकेट इत्यादि बातम्या वाचून तीही आमची एक अंधश्रद्धा का म्हणू नये? वैद्यकशास्त्रात अनेक तक्रारी मेडिकल कौन्सिलकडे पडल्या आहेत. वकिली व्यवसायाच्या संदर्भात नाना तऱ्हेच्या तक्रारी बार कौन्सिलकडे आहेत. विश्वविद्यालयांतून अनेक गैरप्रकार चालू आहेत. अशा परिस्थितीत श्रद्धा कोणती आणि अंधश्रद्धा कोणती हे ठरविणं कठीण आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात हे सर्व असं आहे. अहो, आम्ही जगतो आहोत. कसेतरी दिवस काढत आहोत. ही आमची श्रद्धाच सांप्रत अंधश्रद्धा झाली आहे असे दिवस आहेत. ज्योतिषांशी ही मंडळी पैजा मारतात, बक्षिसे लावतात. कोठलीही ज्ञानशाखा असो, मग ती प्रगत असो वा अप्रगत असो, पैजा लावणारे आणि घेणारे एक तर अविवेकी असतात किंवा मूर्ख असतात.

ज्योतिष बघणं म्हणजे मागासलेपणाचं लक्षण असं ही मंडळी म्हणतात. पण अत्यंत प्रगत राष्ट्रांतून काय दिसतं पहा. पाश्चिमात्य देशांत ज्योतिषशास्त्रासंबंधी नुकतेच काही Opinion Polls घेण्यात आले. त्यांत असं दिसलं की एकंदर लोकसंख्येच्या १/३ लोकांचा ह्या शास्त्रावर विश्वास आहे. दुसऱ्या १/३ मंडळींना ज्योतिष विचारणं-वाचणं आवडतं. उरलेले १/३ लोक एक तर ह्यात रस घेत नाहीत किंवा त्यांचा त्यावर विश्वास नाही. म्हणजे तिकडे हल्ली २/३ मंडळींना ज्योतिष हवं आहे. ही सर्व पाहणी पाहून

New York Times ह्या वृत्तपत्रानं आपल्या एका टिप्पणीत म्हटलं आहे, 'In the cyclical way of the world, we have been passing through a period of resurgent mysticism.'

ही झाली तिकडील सामाजिक संदर्भात ज्योतिषाची गोष्ट. आता अभ्यासाच्या बाजूनं थोडा विचार करू. पाश्चिमात्य देशांत फलज्योतिषशास्त्र अभ्यासक वाढत आहेत. एक उदाहरण म्हणून देतो. अमेरिकेतून नुकताच एक उत्तम ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. ह्या ग्रंथाचं नाव आहे 'Ancient Hindu Astrology for Modern Western Astrologers' – लेखकाचं नाव आहे **जेम्स ब्राहा** (James Braha). मोठा उत्तम ग्रंथ आहे हा. लेखक अधूनमधून सतत भारतात आला. त्याने मूळ संस्कृत ग्रंथांतून सुंदर माहिती एकत्र करून एक अप्रतिम ग्रंथ तिकडील अभ्यासकांना दिला.

ह्या चळवळीतील मंडळी अधूनमधून काही धर्मग्रंथांवर व पोथ्यांवर टीका करतात. ह्यात त्यांचा काय हेतू आहे ते समजत नाही. ह्यासंबंधी 'आम्ही' मागासलो आहोत असं त्यांचं म्हणणं आहे. पोथ्या, स्तोत्रांवरसुद्धा पाश्चिमात्य सांप्रत अभ्यास करीत आहेत. त्याचं एक उदाहरण देतो. एक जर्मन स्त्री अभ्यासक बाईनं नुकतंच **'रामरक्षा'** स्तोत्रांवर तीनशे पानांचं पुस्तक लिहिलं आहे. त्यात तिनं **'रामयंत्र'** दिलं आहे. रामरक्षा स्तोत्रांचा स्वतंत्र विचार केला आहे. ह्यात मला येथे विशेष सांगावयाचं आहे ते हे की ह्या लेखिका तांत्रिकन्यास शिकण्यासाठी अनेक पंडितांना भेटल्या. ह्या लेखिकेचं नाव आहे– **गुड्रूल ब्युनेमॉन.**

समाजात जे जे विघातक आहे ते ते नष्ट झालेच पाहिजे. त्यात इतर अनेक विषय येऊ शकतात. त्यादृष्टीने ही मंडळी उत्तम काम करीत आहेत. परंतु ज्योतिषासारखी गणिताधिष्ठीत पुरातन ज्ञानशाखा आणि तीही दुर्लक्षित असता ह्या मंडळींनी ती मान्याची जागा म्हणून निवडू नये. देव, देवळे, पोथ्या, धर्मग्रंथ इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींवर हल्ले करताना ह्या मंडळींनी सांप्रत थोडा विवेक दाखविण्याची आवश्यकता आहे असं मला वाटतं.

मी एक ज्योतिषशास्त्राचा अभ्यासक आहे. मला जे वाटलं आणि ह्या संदर्भात सुचलं ते थोडक्यात आपणासमोर ठेवले आहे. त्यातील **'न्यून ते पुरतें। अधिक तें सरतें'** करून घेण्यास आपण सुजाण आणि जाणकार आहात ह्याची मला खात्री आहे.

माझ्या लेखात मी **'दैवज्ञ'** आणि **'दैव'** ह्या भूमिकेतून काय लिहिले ते सर्व विसरून जा. महाकवी टेनिसन म्हणत असे की, अशुभ प्रार्थनेनं कमी होतं. आपल्याकडील संतांची अशीच शिकवण आहे. मी येथे सर्व देवदेवतांना प्रार्थना करतो. त्यांनी तुमचं सर्वांचं कल्याण करावं. राष्ट्राचं मंगल करावं. सर्व जाती-धर्मांचं शुभ करावं.

**दूरिताचें तिमिर जावो।**
**विश्व स्वधर्मसूर्यें पाहो।**
**जो जें वांच्छील तो तें लाहो।**
**प्राणिजात॥**

## साखळी पत्रांशी संस्थानचा संबंध नाही !

काही साईभक्त दुसऱ्या साईभक्तांना साखळी पत्रे पाठवितात. या प्रकाराबाबत बऱ्याच साईभक्तांनी संस्थानकडे नाराजी व्यक्त केली असून यावर कारवाई व्हावी अशीही मागणी केली आहे.

म्हणून 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' सर्व साईभक्तांस असे कळवू इच्छिते की साईभक्तांत आपापसात पाठविली जाणारी साखळी पत्रे वा पत्रकांशी वा त्यातील मजकूराशी श्री साईबाबा संस्थान, शिरडीचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असा काहीही संबंध नाही. तरी सर्व साईभक्तांनी याची कृपया नोंद घ्यावी.

**– कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## श्री साईप्रेरणा मित्रमंडळाने समाजप्रबोधनाचे कार्य हाती घेतले !

**दे**गलूर (जि. नांदेड) : येथे गतवर्षी दीपावली पाडव्याच्या दिवशी श्री साईप्रेरणा मित्रमंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाच्या वतीने विविध समाजोपयोगी कामे, नाना उपक्रम व समाजप्रबोधनाचे कार्य हाती घेण्याचे येथील सर्व साईभक्तांनी ठरविले आहे. शुभारंभाचा उपक्रम जुन्या बसस्टँडच्या मागील बाजूस श्री. गंगाधर गुंगेवार यांच्या भूखंड संकुलात 'श्री साईनिकेतन' नगराची स्थापना करण्यात येऊन श्री साईनिकेतन नगराच्या फलकाचे अनावरण दै. 'गोदातीर समाचार'चे संपादक डॉ. रविंद्र रसाळ यांच्या हस्ते पार पडले. तसेच साईबाबांच्या पुण्यतिथी तथा विजयादशमी दिनी मंडळाच्या वतीने लावलेल्या एस्.टी. च्या वेळापत्रकाच्या फलकाचे अनावरण नगराध्यक्ष श्री. नंदकुमार दाशेटवार यांच्या हस्ते झाले.

मित्रमंडळ रक्तगट तपारणी शिबिर, सामान्य ज्ञान चाचणी स्पर्धा, व्याख्यानमाला इत्यादी उपक्रम हाती घेणार आहे. मंडळाची नवीन कार्यकारिणी निवडण्यात येऊन अध्यक्षपदी श्री. कृष्णा रेखावार तर सचिवपदी श्री. ओमप्रकाश मानधना यांची निवड झाली. ●

## 'श्री साईलीला' सभासदांना निवेदन

'श्री साईलीला'चे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४-बी, खोदादाद सर्कलजवळ, दादर, मुंबई – ४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावावर असावा.

# प्राचीन भारतीय साहित्य

(मागील अंकावरून)

**शौरसेनी :** शूरसेन देश किंवा मथुरा प्रांताच्या जवळपास बोलली गेलेली भाषा. ही भाषा संस्कृत नाटकातील राणीवासातील दासी, सामान्य स्त्रिया, व्यापारी, गवळी, पालखी वाहून नेणारे भोई, वेश्यागारातील दलाल, राजाचा नम्र सचिव (हा राजाच्या जनानखान्याचा अधिकारी असतो), यात्रेकरू अशा पात्रांच्या तोंडी रंगमंचावर म्हणजे नाटकात बोलली गेली. ही भाषा खास करून गद्यात बोलली गेली आहे. 'रत्नावली' 'अभिज्ञानशाकुंतलम्', 'मृच्छकटिकम्' आदि नाटकांमध्ये ही भाषा आहे. तथापि या भाषेत स्वतंत्र असे एकही नाटक लिहिले गेले नाही.

जैन धर्मातील दिगंबर संप्रदायाचे अनेक ग्रंथ या शौरसेनी प्राकृत भाषेत लिहिलेले आहेत. या संप्रदायाचे दोन मुख्य ग्रंथ असून ते (१) 'पवयन सार' आणि (२) 'कत्तिकेयानु पेक्खा' असे असून हे दोनही शौरसेनी भाषेत लिहिलेले आहेत.

**महाराष्ट्री :** महाराष्ट्र देशात बोलली जात होती ती प्राकृतरूप भाषा म्हणजे महाराष्ट्री प्राकृत-भाषा. या भाषेचा उपयोग लोकगीते प्राकृत काव्ये, म्हणून झाला. सप्तशती किंवा सतसई ही ह्युलचंद्र नावाच्या महाराष्ट्री प्राकृत कविने केली. पंडित प्रवससेनाने रावणवध (सेतुबंध), पंडित वाक्पतिराजाने गौडवहो, तथा पंडित हेमचंद्राने 'प्राकृत द्वयाश्रय' काव्य तथा 'बज्ञालग' नामक प्राकृत काव्य सुभाषित ग्रंथ याच भाषेत लिहिले आहे. (आजच्या मराठी भाषेचे व्याकरणही पंडित हेमचंद्र या जैन पंडिताने लिहिले म्हणून शिक्षणारंभी ॐ नमः सिद्धम। हा जैन धर्मातील नमस्कारविधि आहे असे शिकविले जाते) पंडित राजशेखराने लिहिलेली कर्पूरमंजरीत जे विशुद्ध सट्टक (नाटकाचा एक प्रकार, तमाशा) वर्णिला आहे त्यात हरिउद्ध (हरिवृद्ध) तथा नन्दिउद्ध (नंदिवृद्ध), पुलिसा, पंडित पुलिश, पोतिष अशा प्राकृत पंडितांचा उल्लेख आहे, हे वेगवेगळ्या महाराष्ट्रक भागातील पंडित ही भाषा कशी भिन्न भिन्न बोलली जाते ते सांगतात. तथापि यांचा कुठलाही ग्रंथ नाही. महाराजा भोजाने लिहिलेले प्रथम कूर्मशतक तथा द्वितीय कूर्मशतक ही दोनही काव्ये शिलालेखात खोदलेली आहेत. मध्यप्रदेशातील धार येथून उत्खननात हे सापडले. ज्या जागेत हे उत्खनन झाले तेथे भोजराजाने तयार केलेली 'सरस्वति कण्ठाभरणम्' नावाची पाठशाला होती. तर ही दोनही काव्ये महाराष्ट्री मागधी भाषेत लिहिलेली आहेत. या महाराष्ट्री भाषेचा एक भेद असून त्यास जैनमहाराष्ट्री असे म्हणतात. या भाषेत जैन श्वेतांबरांच्या कथा, जीवन-चरित्रादि संबंधीचे ग्रंथ आहेत.

जोधपूर राज्यातील घटियात्रा गावी सापडलेल्या मंडोर येथील प्रतिहार राजा कुक्कुट किंवा कक्कुट याचा इ.स. ८६१ सालचा शिलालेख याच भाषेत आहे.

**पैशाची :** भारताच्या पश्चिमोत्तर पहाडी प्रदेशात काश्मीर, नेपाळ वगैरे भागाची ही लोकिक बोलीभाषा प्राकृत आहे. या भाषेत पंडित गुणाढ्याने 'बृहत्कथा' नामक ग्रंथ लिहिला, गुरु गोरक्षनाथांनी किमयागार ग्रंथ याच भाषेत लिहिला. या भाषेची संस्कृतमध्ये पंडित क्षेमेंद्रदेव तथा पंडित सोमदेव यांनी पैशाची 'कविताबद्ध' तथा 'पैशाची संग्रहबद्ध' असे ग्रंथ लिहिले.

**अवन्तिक :** मालवा प्रांत अवन्ति नगरीचा परिसर तथा अवन्तिपुरात बोलली गेलेली प्राकृत म्हणजे 'अवन्तिक'. यालाच चूलिकापैशाची किंवा भुतांची भाषा असेही म्हटले जाते. भूत, प्रेत, तंत्र, मंत्र, शास्त्राचे अनेक ग्रंथ या भाषेत लिहिलेले आहेत. या भाषेत 'गोरक्ष काव्यकिमयागार' नावाचा एक स्वतंत्र ग्रंथ (पैशाची भाषेतील ग्रंथ 'किमयागार' वेगळा आहे) रसविद्येवरील ग्रंथ गुरु गोरक्षनाथांनी तयार केला. यात लोखंडाचे सोन्यात रूपांतर कसे करावे याविषयीचा पूर्ण विधि आहे आणि त्या पद्धतिने खरोखरीच सोने तयार होते. याविषयीचा हा एक अध्याय आहे. महाराजा शूद्रकरचित 'मृच्छकटिकम्' या नाटकात भूतभाषा किंवा चूलिकापैशाची याचा उल्लेख आहे. पंडित राजशेखराने एक श्लोक लिहिला आहे ज्यात ही भूतभाषा म्हणजे चूलिकापैशाची ही अवन्ति (उज्जयिनी), परिपात्र (बेतवा तथा चंबळेचा किनारा), दशपुर (मन्दसौर) या भागात विशेष वापरात आहे असे सांगितले आहे. (पहा— नागरी प्रचारिणी सभा, भाग २, पृष्ठ १०)

इसवी सनाच्या पूर्वी दुसऱ्या शतकात पंचनदी प्रांत (पंजाब) आणि आसपासच्या भागात राहणाऱ्या 'मालव सेन' याच्या नेतृत्वाखाली जगणाऱ्या एक मानवजातीच्या टोळीने राजपुताना प्रांत काबीज करून अवन्ति देशावर आपले राज्य स्थापिले. या भालवसेनाचा भूभाग म्हणून मालवा असे या देशास म्हटले गेले. मालवसेन हा तांत्रिक शाक्त संप्रदायातील होता. याची बोलीभाषा ही चूलिकापैशाची भाषा होती. या राजाने स्वतः 'चूलिका पंचकाव्य', 'चूलिका ज्ञानसंग्रह' नावाचे ग्रंथ लिहिले. याचा मंत्री चूलिकातनय याने 'सिद्धसाधना चूलिका' हा ग्रंथ लिहिला. या भाषेत चित्रलिपी वापरली जाते. शब्दक्रमांचे अंक, चित्रे, चिन्हें तथा अक्षरे अशी ही भाषा लिहिली जाते. चूलिका म्हणजे भगवति आदति उत्तानपादा. म्हणून ही पृथ्वीची भाषा. ती भुतांना समजते कारण भुते पृथ्वीच्या आश्रयाने राहतात. तिबेट, मंगोलिया येथील भाषा लिपिंचा उगम या चूलिकापैशाची भाषेतून झाला आहे. चूलिका म्हणजे सर्व बदलांना सामाहित करून घेणारी. हा मूळ पैशाची भाषेचा तांत्रिक उपभेद आहे.

**अपभ्रंश :** या भाषेचा प्रचार लाटदेश (गुजरात), सुराष्ट्र (सौराष्ट्र किंवा सोरटी), त्रवणदेव (मारवाड), दक्षिण पंजाब, भृगुकच्छ, राजपुताना, अवंति, मन्दसौर, आदि भागात ही भाषा बोलली जात होती. वस्तुतः अपभ्रंश ही कोण्या एका देशाची भाषा नाही. बिघडलेल्या रूपातील ही एक मिश्र भाषा आहे. भारतातील सर्व भागातील विद्वान या भाषेचा प्रयोग करीत असून, राजपुताना, मालवा, काठेवाड, कच्छ आदि भागातील भोई, चारण, भाट यांच्या 'डिंगल'

नामक भाषेतील सर्व गीते ही याच अपभ्रंश भाषेत लिहिली गेली आहेत. जुनी हिंदी भाषा, अग्रहिणीभाषा, अहिरणी, हे याचेच रूपक आहेत. या भाषेचे साहित्य बरेच विस्तृत दिसते. बहुतेक सर्व साहित्य कविता, ओवि, छंदबद्ध आहे. यांचा 'दोहा' हा शब्द नेहमी येतो. या भाषेतील प्राचीन तथा बृहत्ग्रंथ म्हणजे 'भविस यत्तकहा' हा ज्योतिष ग्रंथ आहे. (भविष्यत्केकण्न) पंडित धनपालाने १० व्या शतकात हा लिहिला. पंडित महेश्वर सूरींनी 'सज्जम मंजरी' (सज्जन मंजरी), आचार्य पुष्पदंतकृत (फुफ्फदंत), 'तिसट्ठि महापुरिस गुणालंकार', पंडित नयनंदीनिर्मित 'आराधना', आचार्य योगेन्द्रदेवलिखित 'परमात्म प्रकाश', पंडित हरिभद्रचे 'नेमिनाह चरिड' (नेमिनाथ चरित्र), पंडित वरदत्तरचित 'वैरसामि चरिड' (वीरस्वामीचरित्र), 'अंतरंग संधि', 'सुलसाखायन' (सुलभ सांख्यायन व्याकरण), 'भविय कुटुंबचरित' (कौटुंबिक भविष्ट), 'संदेश शतक', 'भावन्नसंधी' इत्यादि अनेक ग्रंथ आहेत. (पहा – भविसयत्तकहा: भूमिका, पृष्ठ ३५/४६, गायकवाड ओरियंटल सीरीज)

यांव्यतिरिक्त पंडित सोमप्रभाचा 'कुमार-पण्यबोध', आचार्य रत्नमंदिर मणिविरचित 'उपदेश तरंगिणी', पंडित लक्ष्मणदेव गारीकृत 'सुपासनाह चरियम्', 'दोहाकोष', कालिदासाचे 'विक्रमोर्वशिषयम्' (चतुर्थ अंक), पंडित हेमचंद्रलिखित 'कुमारपाल-चरित' (प्राकृत दाश्रयकाव्य), 'कालकाचार्य कहा' आणि 'प्रबंध चिंतामणि' आदिंमध्ये स्थळोस्थळी 'अपभ्रंश' भाषेचा उल्लेख दिसतो. पंडित हेमचंद्राने आपल्या 'प्राकृत व्याकरण' या ग्रंथात अपभ्रंश साहित्याची १७५ उत्कृष्ट उदाहरणे दिलेली आहेत.

यावरून अपभ्रंश भाषा त्याकाळी अतिउन्नत होती हे स्पष्ट होते. या उदाहरणात श्रृंगार, वीरता, रामायण, महाभारत यांचे अंश, हिंदु, जैन धर्मातील माहिती तथा अनेक विनोदी आख्यायिका आदि विषय दिसतात. या भाषेत अनेक जैनमुनींनी ग्रंथलेखन केलेले आहे.

**प्राकृत व्याकरण:** उज्जयिनी येथील आस्थान पंडित वररूचि याने 'प्राकृत प्रकाश' नावाचे प्राकृत व्याकरण लिहिले. यात पंडित वररूचिने महाराष्ट्री, पैशाची, मागधी, शौरसेनी आदि संस्कृतच्या उपभाषांचे वाक्यखंड तयार करण्याविषयीचे नियमही दिले. या वेगवेगळ्या भाषेत वाक्य कसे तयार करावे यासाठी याने 'वाक्यकार' नावाचाही एक ग्रंथ लिहिला. म्हणून यास वाक्यकार वररूचि असेही म्हटले जाते.

पंडित लंकेश्वरनाथ याने 'प्राकृत कामधेनु', मार्कण्डेय पंडितकृत 'प्राकृत सर्वस्व', पंडित चण्डकेतुकृत 'प्राकृत लक्षण' इत्यादि व्याकरणग्रंथ दिसतात. प्रसिद्ध जैन विद्वान् पंडित हेमचंद्र याने संस्कृत व्याकरण 'सिद्ध हेमचंद्रानु शासन' नावाच्या ग्रंथात प्राकृत व्याकरण समाविष्ट केले आहे. त्यात त्याने पाणिनीच्या 'सिद्धांत कौमुदी'च्या पद्धतिने विषय-विभाग करून व्याकरण सूत्रांचे क्रम ठेवलेले आहेत. हेमचंद्राने प्रथम महाराष्ट्री प्राकृताचे नियम लिहिले. त्यानंतर शौरसेनी प्राकृताचे नियम लिहिले. आणि शेवटी 'शेषं प्राकृतवत्' असे लिहिले आहे. नंतर मागधी प्राकृताचे नियम लिहून शेवटी 'शेषं शौरसेनीवत्' असे लिहिलेले आहे. त्याचप्रमाणे पैशाची, चूलिकापैशाची तथा अपभ्रंश या भाषांचे नियम लिहून सर्व प्राकृत भाषांचे संदर्भ देऊन शेवटी 'शेषं संस्कृत वत्सिद्धम' असे लिहिले आहे. संस्कृत तथा अन्य प्राकृत व्याकरणात उदाहरणासाठी त्याने बहुधा वाक्य किंवा पद दिलेले आहे. तथापि अपभ्रंश भाषेच्या बाबतीत पूर्ण गाथा, छंद, कविता यांचे अवतरण दिलेले आहे.

**प्राकृत कोष:** प्राकृत भाषेत बरेच कोष लिहिलेले आहेत. पंडित धनपाल याने ९२७ सनात 'पाइयलच्छी नाममाला' लिहिली. पंडित राजशेखराची पत्नी चौहान अवंतिसुंदरीने प्राकृत कवितेत येणारे देशी (संस्कृत वगळून) शब्द एकत्रित करून त्याचा एक 'कोष' तयार केला. त्यात प्रत्येक शब्दाची स्वरचित उदाहरणे दिलेली आहेत. हेमचंद्राच्या कोषात या कोषाचा उल्लेख आहे. पंडित हेमचंद्राने 'देशी नाममाला' नावाचाही एक प्राकृत कोष तयार केला. कविता बद्धतेत 'अ'कारादि क्रमाने, दोन अक्षरी, तीन अक्षरी, चार अक्षरी असे शब्दक्रमही दिलेले आहेत. देशी भाषांच्या अध्ययनासाठी हा कोष अतीव उपयोगी आहे. पाली भाषेचाही एक कोष बौद्ध भिक्षु मोग्गलायन (मुद्गलायन) याने 'अभिधानप्प दीपिका' नावाने १२ व्या शतकात लिहिला. याची कोषशैली 'अमरकोष'च्या पद्धतिवर आधारलेली दिसते.

## दक्षिण भारतीय किंवा द्रविड भाषा –

संस्कृत भाषेतून उदयास आलेल्या प्राकृत, मागधी, शौरसेनी, महाराष्ट्री, पैशाची, अवन्तिक, अपभ्रंश आदिंचा मागोवा आत्तांच घेतला. आता प्राचीनकाळी दक्षिण भारतातील भाषांचा आपण अभ्यास करू या. तामिळ, मलयालम्, कन्नड तथा तेलुगु अशा भाषा भारतात त्याकाळी प्रचलित होत्या. यांना द्रविड भाषा असेही म्हटले जाते. या द्रविडी भाषांची लिखित सामुग्री फारच थोडी उपलब्ध आहे. म्हणून आपण संक्षेपाने यांचा अभ्यास करू –

**तामिळ:** दक्षिण भारतीय भाषांची जननी तामिळ भाषा आहे. ही दक्षिणेतील किंबहुना संस्कृत भाषेनंतरची अशी सर्वात जुनी भारतीय भाषा आहे. तामिळ प्रांतात ही बोलली जाते. या भाषेतील सर्वात प्राचीन व्याकरण ग्रंथ हा 'अगत्तियम्' किंवा 'तोल काप्पीयम्' हा आहे. अगस्ति ऋषींचा शिष्य तोलक ऋषी यांनी हा ग्रंथ लिहिला. या व्याकरण ग्रंथावरून तामिळ साहित्याचा विकास या ग्रंथापूर्वीही खूपच होता हे जाणवते. या भाषेतील प्राचीन ग्रंथ 'नालदियार' हा आहे. पूर्वी हा बृहत्ग्रंथ होता. नंतर लहान लहान भागात हा ग्रंथ तयार झाला आहे. दुसरा प्रसिद्ध ग्रंथ तिरुवल्लुवार यांनी लिहिला. त्यास 'तिरुक्कुरल' असे म्हणतात. कुरल म्हणजे दीड-दोन ओळींचा श्लोक. यासच 'तामिळ वेद' असेही म्हटले जाते. यात धर्म, अर्थ तथा काम यासंबंधीचे उपदेश आहेत. तिरुवल्लुवार हा जातीने अंत्यज असून जैन धर्मावलम्बी दिसतो. अज्ञातचक्षु नावाच्या कविने 'काव्य चिंतामणि' हा ग्रंथ लिहिला. कवि कम्बनूकृत 'कम्ब रामायण', 'दिवाकरम्', 'तामिळ व्याकरण' आदि ग्रंथ लिहिले. या भाषेत अनेक ऐतिहासिक ग्रंथही

लिहिलेले दिसतात. महाकवि पोइकयारकृत 'कालवलि नाडपट्ट' (७ वे शतक), 'विक्रम शोत्रतुला' (१२वे शतक), पंडित जयकोंडन्लिखित 'कलिंग तुपरणी' (७ वे शतक), 'राज राजनुप्य' (१२वे शतक). (पहा– ओझा: भारतवर्षाची प्राचीन इतिहास सामुग्री, पृष्ठ २९/३०)

तामिळ भाषेची लिपि अत्यंत अपूर्ण असल्याने त्यात संस्कृत भाषा लिहिता आली नाही. म्हणून स्वतंत्र 'मंदिरलिपि' (टेंपलस्क्रिप्ट) नावाची नवीन 'ग्रंथलिपि' निर्माण केली गेली. नंतर या ग्रंथलिपित अनेक संस्कृत ग्रंथांचा अनुवाद केला गेला.

**मलयालम्:** मलयालम् भाषा, त्रावणकोर, कोचिन, तथा मलबार प्रांतात बोलली, लिहिली जाते. तामिळ भाषेतून या भाषेचा उगम झाला. तथापि या भाषेच्या पूर्वी 'ग्रंथलिपि'ची निर्मिती तामिळ भाषेत असल्याने त्याकाळात या भाषेत ग्रंथसंपत्ति तयार झाली नाही. नंतरच्या काळात, ज्योतिष, व्यवहार, पूजाविधि, समुद्रपूजा, निसर्गशास्त्र, पशुवैद्यकशास्त्र अशा विषयांचे अनेक ग्रंथ तयार झाले.

**कन्नड:** ही कर्नाटकात बोलली, लिहिली जाते. याही भाषेच्या विकासात जैन धर्मगुरुंनी, मुनींनी आपले योगदान दिले आहे. ही भाषा जैन मुनींमुळेच उन्नत झालेली आहे. याच्या साहित्यात काव्य, अलंकार, व्याकरण इत्यादिंचे ग्रंथ तयार झालेले दिसतात. दक्षिण भारतातील राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष (पहिला) याने ९व्या शतकात कन्नड भाषेत अलंकार विषयांवर 'कविराज मार्ग' नामक ग्रंथ लिहिला. साहित्यिक ग्रंथांव्यतिरिक्त जैन, लिंगायत, वैष्णव, देवीउपासक आदि संप्रदायांनी याच भाषेत ग्रंथ रचिलेले दिसतात. यातील विशेष उल्लेखनीय ग्रंथ लिंगायत संप्रदायाचा संस्थापक आचार्य बसवकैलास किंवा बसवेश्वरस्वामी यांनी लिहिलेला 'बसवपुराण' आहे. पंडित सोमेश्वर कविने लिहिलेले 'सोमेश्वर शतक' हाही एक सुंदर उपदेशात्मक ग्रंथ आहे. कवि पम्प याने 'पम्प भारत' किंवा 'विक्रमार्जुन विजय', कवि रन्न याने लिहिलेला 'गदायुद्ध' इत्यादि. पंडित दुर्गसिंह याने संस्कृत 'पंचतंत्र' या ग्रंथाचा अनुवाद त्याच नावाने केला. ही भाषा संस्कृत भाषेशी विशेष जवळ आहे. या भाषेत अनेक संस्कृत ग्रंथांचे भाषांतर विजयनगरच्या साम्राज्याच्या वेळी झाले. तसेच अनेक नवनवीन संस्कृत तथा कन्नड ग्रंथ तयार झालेले आहेत.

**तेलुगु:** ही तेलंगण प्रांत किंवा आंध्रप्रदेशात बोलली, लिहिली जाणारी भाषा आहे. या भाषेच्या साहित्यावर कन्नड तथा संस्कृत भाषांचा प्रभाव अधिक आहे. याचे प्राचीन साहित्य फारसे उपलब्ध नाही. जगन्नाथ पंडित हा या भाषेतील तथा संस्कृत भाषेचाही प्रकाण्ड विद्वान होऊन गेला. ११व्या शतकात आंध्र प्रांतावर सोळंकी राजघराण्याचे अधिपत्य होते. तेव्हा सम्राट राजराज याने अन्य विद्वानांच्या मदतीने, पंडित ननियभट्ट (किंवा नन्नप्प) याजकडून संस्कृत 'महाभारत' या ग्रंथाचा तेलुगु भाषेत अनुवाद करविला.

## प्राचीन भारतीय शिक्षालये

आतापर्यंत आपण संस्कृत, प्राकृत तथा उपभाषा यांची साहित्यिक माहिती घेतली. आता या साहित्यानंतर शिक्षणपद्धती, शिक्षण, तथा शिक्षणालय यांची थोडी माहिती घेवू.

प्राचीन भारतात होवून गेलेल्या गुप्तराजघराण्याने शिक्षणाच्या प्रचारासाठी खूपच प्रयत्न केले. गुप्त राजघराण्याचा कालखंड हा भारताचा सुवर्णयुगाचा काळ मानला जातो. त्यावेळी भारतात सर्वसामान्य भारतीय, जगातील कुठल्याही सर्वसामान्य माणसांपेक्षा अधिक शिक्षित दिसतो. चीन, जपान आणि अतिपूर्वेकडील इतर देश यातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी भारतात येत असत. बौद्ध आचार्य, हिंदु तपस्वी आणि संन्यासी हे शिक्षण देत असत. यांचा प्रत्येक संघाराम (साधूंचा संघ जेथे आराम करतो असे ठिकाण) किंवा मठ हे एक एक स्वतंत्र शिक्षणालयच होते. प्रत्येक मोठ्या शहरात कित्येक संघाराम आणि मठ मुद्दाम तयार केले गेलेले होते. युवन त्संग लिहितो की कनोजमध्ये संघारामांमधून कित्येक हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मथुरा येथील संघारामात २ हजार विद्यार्थी अध्ययनरत आहेत. हा चिनी यात्री पुढे असेही लिहितो– भारतात ५०, हजार मठविद्यालये आहेत. यात काहींमध्ये दोन लाख बारा हजार एकशेतीस विद्यार्थी एकावेळी शिक्षण घेतात. भिन्न भिन्न बौद्ध संप्रदायातील मठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची भिन्न भिन्न संख्या असलेली एक यादीच त्याने दिलेली आहे. (राधाकुमुद मुखर्जीकृत हर्ष, पृष्ठ १२४ ते १२७) विद्वान ब्राह्मणांच्या घरी तथा जैन यतींच्या उपाश्रयांमध्ये लहान लहान पाठशाला काम करीत होत्या. राजांनी सुरू केलेल्या वेगवेगळ्या शाळाही होत्या. अशातऱ्हेने भारतात बहुतेक सर्व जागी लहान किंवा मोठी शिक्षणालये विद्यमान होती.

**नालंदा विश्वविद्यालय:** त्याकाळी भारतात लहान लहान शिक्षणालयेच फक्त कार्यरत नव्हती तर मोठमोठी विश्वविद्यालयेंही येथे कार्यरत होती. त्यात नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला, धनकटक् (दक्षिणेत) आदि मुख्य नावे दिसतात. चिनी यात्री युवन त्संग याने नालंदा विश्वविद्यालयाचे विस्तृत वर्णन केलेले आहे. त्यातील काही भाग असा– मगधसम्राट महाराजा शक्रादित्य याने प्रारंभी हे नालंदा विश्वविद्यालय सुरू केले. त्यानंतरच्या मगध राजांनी याला अधिकाधिक मदत केली. नालंदा विश्वविद्यालयाच्या अधिकारात २ हजाराहून अधिक गावे येत. वेगवेगळ्या राजांनी वेगवेगळ्या कारणांसाठी ही गावे नालंदा विश्वविद्यालयास दान दिलेली होती. यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर विश्वविद्यालयाचा दैनंदिन खर्च चालत होता. येथे १० हजार अध्ययनार्थी तथा १५शे अध्यापक वस्ती करून रहात असत. भारताव्यतिरिक्त अनेक देशांचे विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत. या विद्यापीठाच्या चतु:सीमेत उंचच उंच मठ आणि विहार बांधलेले होते. मध्यात सभागृह तथा विद्यालयें होती. यांच्या चारी बाजूस बौद्ध भिक्षु, शिक्षक आणि प्रचारक यांच्या निवासासाठी चार-चार मजल्यांच्या उंच इमारती होत्या. विविधरंगी दरवाजे, विविधरंगी आकारांचे कड्या-कोयंडे, छत आणि खांब यांच्यावरील कोरीवकाम अप्रतिम दर्जाचे होते. पाहणारा सहज मोहित होईल अशी उत्कृष्ट कलाकुसर तेथे होती. याच्या काही भागात कित्येक मोठमोठी पुस्तकालये आणि ६ पदव्युत्तर शिक्षणक्रमाची दालने होती. विद्यार्थ्यांकडून कुठल्याही तऱ्हेची फी किंवा धन घेतले जात नसे. उलट विद्यार्थ्यांना निवासस्थान, भोजन आणि

औषध आदि मोफत मिळण्याची व्यवस्था होती.

उंचश्रेणीच्या विद्यार्थ्यांच्या खोल्या निम्नस्तरीय विद्यार्थ्यांपेक्षा मोठ्या असत.

या विद्यापीठात संपूर्ण बौद्ध साहित्याचा अभ्यास होत असे. याव्यतिरिक्त वेद, गणित, ज्योतिष, हेतुविद्या (तर्कशास्त्र), व्याकरण, वैद्यक, पशुवैद्यक, कृषी, कर्म आदि अनेक विषयांचे परिपूर्ण शिक्षण दिले जात होते. येथे ग्रह, नक्षत्र यांचे अध्ययन करण्यासाठी उंच गच्चीवर नक्षत्र प्रयोगशाळाही होती. नालंदा विश्वविद्यालयात पाण्यावर चालणारे एक मोठे घड्याळ होते. संपूर्ण मगध राज्याची वेळ (समय) ही या जलघड्याळावरून किंवा जलयंत्रावरून लावली जात होती. यास पाहण्यासाठी भारत आणि परदेश येथील प्रवासी येत असत. या विद्यापीठात प्रवेश घेण्यापूर्वी एक परीक्षा द्यावी लागत असे. ही अत्यंत कठीण परीक्षा होती. बहुधा विद्यार्थी या परीक्षेत नापास होत असे. या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर मगच आतील दालनात प्रवेश मिळत असे. येथे अध्ययन केलेला विद्यार्थी, त्या त्या विषयातील तज्ज्ञांचा मेरूमणि मानला जात होता. येथील प्रमुख आचार्यपद हे आचार्य धर्मपाल, त्यांचा शिष्य आचार्य धर्मकिर्ती आणि त्यांचा शिष्य आचार्य धर्मोत्तर असे अनेक श्रेष्ठ आचार्य येथे अध्यापनाचे कार्य करीत. सम्राट हर्षवर्धनाने आपल्या राज्याभिषेकासमयी बोलावलेल्या विद्वत् परिषदेत ९ हजार नालंदा बौद्ध भिक्षुंना आमंत्रित केले होते. नालंदा विश्वविद्यालयाचा विद्यार्थी असा शब्दच त्याकाळी अत्यंत पूजनीय समजला जात होता. मोगलांच्या आक्रमणानंतर या विद्यापीठाचा आणि त्या परिसराचा नाश करण्यात आला. तेव्हा ३० हजार नालंदा भिक्षु उत्तरेकडील हिमालयातून तिबेट, मंचुरीया, चीन अशा भागात निघून गेले.

**तक्षशिला विश्वविद्यालय:** तक्षशिला विद्यापीठ भारतातील सर्वात जुने विद्यापीठ आहे. हे नालंदा विश्वविद्यालयाच्या पूर्वी विद्यमान होते. याच विद्यापीठात, पतंजलि, जीवक, सुश्रुत, चरक तथा आचार्य विष्णुगुप्त चाणक्य हे याच विद्यापीठाचे विद्यार्थी होते. नंतरच्या काळात हे सर्व येथील आचार्यही होते. हे विद्यापीठ खूपच मोठे होते. यात वयाच्या सोळा वर्षानंतरच्या विद्यार्थ्यांना प्रवेश होता. बहुधा राजांची मुले, संपन्न परिवारातील मुले आदि येथे शिक्षण घेत असत. या विद्यापीठात तयार झालेल्या 'महासुत सोम जातक' नावाच्या ग्रंथात एका आचार्याकडून शिक्षण घेणाऱ्या ११० हून अधिक राजकुमारांचा उल्लेख आहे. धनहीन विद्यार्थी दिवसा काम करून रात्री शिक्षणवर्गात शिकत असत. काही विद्यार्थ्यांना या विद्यापीठाकडूनही काम दिले जात असे. काही विद्यार्थी शिक्षणोपरांत गुरुदक्षिणा देत असत. विद्यार्थ्यांच्या जीवनातील आचार-विचार यावर येथे विशेष महत्त्वपूर्ण ध्यान दिले जात होते. येथे भिन्न भिन्न ज्योतिषग्रंथ, जीवनग्रंथ तथा जातकग्रंथ यांचे शिक्षण दिले जात होते. इतर विषयांबरोबर– वेद, अठरा विद्या, व्याकरण, शिल्प, धनुर्विद्या, हस्तिविद्या, मंत्रविद्या, औषधविद्या, कामशास्त्र, शल्यचिकित्सा, राजविद्या, योगविद्या आदिही शिकविले जात होते. येथील चिकित्साशास्त्राचे अध्ययन अनमोल समजले जाई. येथील शिक्षणानंतर येथील विद्यार्थी शिल्प, राजविद्या, व्यवसाय आदि विषयांचे क्रियात्मक अनुशीलन तथा देशांतर रीति-रिवाज जाणण्यासाठी कितीतरी दूर भ्रमणासाठी जात असत. याची अनेक उदाहरणे 'महासुत सोम जातक' नावाच्या ग्रंथात दिलेली आहेत. हे विश्वविद्यालय मुगल आक्रमणानंतर नष्ट केले गेले.

**शिक्षणक्रम :** चिनी यात्रिक इत्सिंग याने आपल्या प्रसिद्ध ग्रंथात प्राचीन भारतातील शिक्षणक्रमाचा उल्लेख केलेला आहे – उत्कृष्ट विद्वान् होण्यासाठी व्याकरणशास्त्रात पारंगत असणे आवश्यक आहे. कोणत्याही विषयातील विद्वत्ता व्याकरण अध्यापनाशिवाय अशक्य आहे. अनेक व्याकरणग्रंथांचा तो उल्लेख करतो. तो म्हणतो, मुलाचे किंवा मुलीचे वय ६ वर्षाचे झाले की वर्णबोधाची सिद्धरचना किंवा सिद्धिरस्तु हे पुस्तक शिकविले जात होते. या पुस्तकाच्या शिक्षणास अर्ध संवत्सर किंवा ६ महिने लागत असत. त्यानंतर पाणिनीची अष्टाध्यायी शिकविली जात असे. ही अष्टाध्यायी तीन महिन्यात विद्यार्थी कंठस्थ करीत असे. त्यानंतर धातुपाठ (जो एक हजार श्लोकांचा आहे), याचे अध्ययन करीत असत. वयाच्या १० व्या वर्षी विद्यार्थी नाम, धातुरूपावलि, उणादि सूत्र आदिंचे अध्ययन करीत असे. हे अध्ययन विद्यार्थी तीन वर्षे करीत असत. त्यानंतर पंडित जगदादित्य तथा पंडित वामन यांची 'काशिकावृत्ती' या ग्रंथाचे सखोल अध्ययन करीत. युवन त्संग लिहितो, भारतात अध्ययन करण्यासाठी प्रथम व्याकरण ग्रंथाचे अध्ययन आवश्यक आहे. अन्यथा भारतात जाऊन शिक्षण घेण्याचे परिश्रम निष्फल होतील. हे सर्व व्याकरणग्रंथ कंठस्थ होणे अनिवार्य आहे. या पद्धतिच्या अभ्यासक्रमानंतर (वृत्ति, शिक्षावृत्ति) गद्य, पद्य रचना कशा पद्धतिने केलेली आहे याचे अध्ययन करतात. नंतर छंद, स्पंद, गंध या शास्त्रांचा अभ्यास करीत. त्यानंतर 'हेतुविद्या' (तर्कशास्त्र, लॉजिक) तथा 'अभिधर्मकोष' यांचे अध्ययन करीत. (महर्षि नागार्जुनस्वामी यांनी हेतुविद्येविषयीची भूमिका सांगण्यासाठी 'न्याय-द्वार-तारक-शास्त्र' ग्रंथ लिहिला. याच्या अध्ययनाने योग्य पद्धतिने अनुमान (तर्क) करता येते.) त्याकाळी या नागार्जुनाचार्यांनी लिहिलेल्या 'न्याय-द्वार-तारक-शास्त्र' या भाष्यावरच हेतुविद्येचे अध्ययन होत असे. 'जातकमाला' नावाच्या ग्रंथाच्या अध्ययनाने ग्रहणशक्ति तथा स्मरणशक्ति ते विद्यार्थी उन्नत करीत असत. या सर्व अध्ययनानंतरच शास्त्रार्थ तथा विवाद-सभाचर्चा कशा कराव्यात या विषयाचे शिक्षण दिले जाई. तथापि व्याकरणशास्त्राचे अध्ययन अजूनही संपलेले नसते.

सभाशास्त्राविषयी अनेक ग्रंथ लिहिलेले दिसतात. या सभाशास्त्राच्या अध्ययनानंतर पतंजलिकृत 'महाभाष्य' (हे पाणिनीच्या व्याकरणग्रंथावरील भाष्य आहे) शिकविले जाई. प्रौढ विद्यार्थी तीन वर्षात हे आत्मसात करीत असे. यानंतर पंडित भर्तुहरिविरचित 'महाभाष्य टीका'; 'वाक्यप्रदीप' आदि ग्रंथ शिकविले जात. महाभाष्य टीका हा मूलग्रंथ ३ श्लोकांत भर्तुहरिने लिहिला. पंडित धर्मपाल यांनी यावर वाक्यप्रदीप नावाची १४ हजार श्लोकांची रचना टीका केली. या दोन ग्रंथांच्या अध्ययनाने विद्यार्थी व्याकरणग्रंथ पारंगत विद्वान होत असे. (दुसरा चिनी यात्रिक ह्युयेन त्संग यानेही शिक्षणक्रमाचे वर्णन केलेले आहे.) व्याकरणशास्त्राच्या अध्ययनानंतर, मंत्रविज्ञान, रहस्यविज्ञान, तंत्रविज्ञान,

हेतुविद्या तथा ज्योतिषविज्ञान यांचे अध्ययन होत असे. यानंतर वैद्यकशास्त्र, पशुवैद्यकशास्त्र, प्राणीशास्त्र यांचे अध्ययन विद्यार्थी करीत असत. यानंतर न्यायशास्त्राचे शिक्षण दिले जात असे. सर्वात शेवटी अध्यात्मविद्या शिकविली जात असे.

इत्सिंग पुढे लिहितो– नालंदानिवासी आचार्य धर्मपाल यांच्यानंतर त्यांचा शिष्य आचार्य धर्मकीर्ति यांनी, त्यांच्यानंतर त्यांचा शिष्य धर्मोत्तर यांनी आणि नंतर आचार्य गुणप्रभ यांनी 'विजय पिटक' या हेतुविद्येच्या ग्रंथावर वेगवेगळ्या रीतीने टीकाग्रंथ लिहून हेतुविद्याशास्त्र लोकप्रिय केलेले आहे. (पहा– टाकाकुसु: बुद्धिस्ट प्रॅक्टिसेस इन इंडिया, पृष्ठ १६५/८७ तथा वाटर्स–ऑन युवन च्वांग्स ट्रॅव्हल्स, भाग १, पृष्ठ १६०)


वर दिलेला शिक्षणक्रम हा 'उत्कृष्ट विद्वान्' बनण्यासाठी निश्चित केलेला शिक्षणक्रम आहे. सर्वसाधारण विद्यार्थी या क्रमाने शिक्षण घेत नसत. ते बहुधा आपल्या अभिष्ठ (प्रिय) विषयाचेच अध्ययन करीत तथा संसार, गृहगृहस्थी अशा कार्याकडे वळत. बौद्ध धर्माबरोबर वेद, उपनिषद तथा सनातन धर्मशास्त्र असे सर्व विषय शिकविले जात असत.

इत्सिंग हा चिनी यात्री पुढे लिहितो की, त्या त्या विषयातील प्रकाण्ड विद्वान् अध्यापक विद्यार्थ्यांच्या डोक्यात कोणतीही माहिती सक्तिने भरीत नसत. तर त्या विद्यार्थ्यांची मानसिक विकासपद्धति ते त्यास शिकवित असत. हे आचार्यजन सुस्त विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देवून त्यास तोच विषय त्याला समजेल अशा पद्धतिने ते शिकवीत तथा मंदबुद्धि विद्यार्थ्यांस ते तीक्ष्ण बुद्धिचा विद्वान् बनवित असत.

विद्वानांमध्ये शास्त्रार्थाची प्रथा अतिप्राचीन आहे. त्याकाळी अशा विद्वत्सभांचा लाभ सामान्य जनास मिळत असे. वेगवेगळ्या स्थानी तथा वेगवेगळ्या काळी, या सभा भरविल्या जात. बहुतेक राजदरबारातील उत्सव हे अशा विद्वत्सभेनेच साजरे होत असत. त्याचबरोबर मठ, मंदिर, गुफामंदिर, पाठशाला अशांच्या प्रांगणात या सभा होत असत. त्यामुळे जनसामान्य अनेक सिद्धांतांशी परिचित होत असत.

नंतरच्या काळात म्हणजे तक्षशिला, नालंदा यांच्या समाप्तिनंतर या शिक्षणक्रमात बदल परिवर्तन होत गेले. पुढील काळात वेगवेगळे, दार्शनिक संप्रदाय, धार्मिक संप्रदाय यांच्या विकासाबरोबर शिक्षणक्रमाची दिशा तदनुरूप बदलत गेली. यांच्या पाठशाळेत साधारण ज्ञानानंतर दार्शनिक किंवा धर्म अशा त्यांच्या ग्रंथाचे अध्ययन करविले जात होते. इतर कोणतीही तत् सम ज्ञानसाधना करविली गेली नाही. त्यातून त्या त्या धर्माविषयी ज्ञान घेतलेले इतर धर्माशी स्पर्धा तथा नालस्ति करू लागले. त्यातून संयम सुटला म्हणून वित्तहानी, मनुष्यहानि, कुटुंबहानी, ग्रामहानी किंवा युद्धे होत गेली. त्यामुळे ज्ञानसाधनेचे पर्व दिशाहीन झालेले दिसते. आपलाच धर्म श्रेष्ठ असेच या धर्मशाळांनी शिक्षण देण्याचा अट्टाहास करून आपल्या अनुयायांना सत्य तथा चर्चा मीमांसा यावर बंदी केली. सामान्य माणूस दिशाहीन झाला, धर्माच्या नावाखाली अयोग्य तथा अधर्माचे मरण उपभोगू लागला.

## श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



'श्री साईलीला'च्या वाचकांना स्मरतच असेल की **संमेलन विशेषांकात** 'जे न बोलायचे....' या सदरात 'बाबांची शिकवण' या शीर्षकांतर्गत प्रसिद्ध झालेल्या लेखात म्हटले होते की.... आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. पण शिवाजी पार्कवर ज्या पादुकांचे आगमन होणार आहे त्या पादुकांच्या प्रतिमा नसून साक्षात् श्री साईबाबांनी वापरलेली ती प्रत्यक्ष पवित्र पादत्राणं आहेत....

आता श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

## प्रश्नसंहिता

– साईसेवक श्रुतनाथ

(धर्म आणि अध्यात्म ही अशी दोन क्षेत्र आहेत की यांचा जेवढा अधिक अभ्यास करावा तेवढी प्रश्नमालिका अधिकाधिक वाढतच जाते. परंतु सामान्य माणसाला दैनंदिन जीवनातील संसारी प्रश्नांनी एवढे ग्रासून टाकलेले असते की धर्म आणि अध्यात्माचा विचार त्याला अडगळीच्या खोलीत कोंडून ठेवावा लागतो. तरीही संसारी आयुष्यात धर्म आणि अध्यात्माशी त्याचा संबंध भक्तीच्या रूपात येतच राहतो आणि धर्म आणि अध्यात्मासंबंधीचे प्रश्न, अडगळीच्या खोलीचे दार आतून ठोठावू लागतात! अशा प्रश्नांचं समाधान शोधणारं हे नवं सदर 'प्रश्नसंहिता' आम्ही या अंकापासून सुरू करीत आहोत. प्रश्नांचं समाधान करतील साईसेवक **'श्रुतनाथ'**!

तेव्हा तुमचे प्रश्न साईसेवक **'श्रुतनाथ'** यांच्या नावे 'श्री साईलीला'च्या पत्त्यावर पाठवावे. प्रश्नासकट उत्तरे प्रसिद्ध केली जातील.

**– कार्यकारी संपादक)**

### प्रश्न क्र. २

**श्री श्रुतनाथजी,**

सादर नमस्कार वि. वि.

**आपण प्रश्नसंहितेमध्ये प्रश्नांची उत्तरे देता हे वाचले. माझा प्रश्न अध्यात्मासंबंधी आहे.**

**मी देवीभक्त व साईभक्त आहे. मी रोज पूजा–पाठ व ग्रंथांचे वाचन करते.**

**माझा प्रश्न असा आहे की,**

**मला माझ्या घरात सुगंध येतो. कधी सकाळी, कधी संध्याकाळी तर कधी अर्ध्या रात्री सुगंध येतो. काही दिवस सुगंध आला नाही आणि मनात विचार आला की, 'बरेच दिवस झाले सुगंध कसा आला नाही?' की लगेच चार–पाच तासात किंवा दुसऱ्या दिवशी सुगंध येतो! कधीकधी तर दोन–तीन दिवस सतत सुगंध येत राहतो. अशावेळी मी काय करावयास पाहिजे? आपण मला पुढील मार्ग दाखवावा.**

**– स्नेहलता त्रिपाठी**
पुणे.

**स्नेहलताताईंस,**

तुमचे पत्र वाचले. तुमचा प्रश्न प्रत्यक्ष अनुभवातून निर्माण झाला असल्यामुळे महत्त्वपूर्ण आहे.

श्री साईनाथ तुमच्या प्रश्नाचे उत्तर देण्यास मला मदतरूप होवोत अशी त्यांच्या चरणी प्रार्थना!

ताई, मनुष्याला रस, रूप, गंध, स्पर्श आणि श्रवण या पाच माध्यमातून बाह्य जगाविषयीचे ज्ञान होत असते. रसज्ञान जिव्हेमुळे, रूपदर्शनज्ञान नेत्रांमुळे, गंधज्ञान नासिके (नाक) मुळे, स्पर्शज्ञान त्वचेमुळे आणि श्रवणज्ञान कर्णांमुळे होते असते. म्हणजे बाह्य जगाचे ज्ञान होण्यासाठी, ज्याचे ज्ञान घ्यायचे आहे त्याच्याजवळ आणि ज्याला ज्ञान मिळवायचे आहे त्याच्याजवळ जिव्हा, नेत्र, नासिका, त्वचा, कर्ण असे अवयव असलेले शरीर असणे आवश्यक असते. तरच 'संपर्क' शक्य असतो. यांच्या कक्षा साधनेने रूंदावता येतात आणि रूंदावल्या जातात. म्हणूनच प्रत्येकाच्या अवयवांची संवेदनक्षमता वेगवेगळ्या पातळीवरची असते.

ज्याप्रमाणे एकाच मानवी देहात ही पंचेंद्रिये असतात त्याप्रमाणे यातील एक किंवा दोनच इंद्रिये असलेले अन्य शरीराचे जीवमात्रही अस्तित्वात असतात. उदाहरणार्थ कुत्र्याला माणसासारखं बोलता येत नाही पण कर्णांच्या माध्यमातून ध्वनीज्ञान आणि नासिकेच्या माध्यमातून गंधज्ञान घेण्याची त्याची क्षमता मानवापेक्षा कितीतरी पटीनं अधिक असते! अशी कितीतरी उदाहरणे आता तुम्हालाही देता येतील.

मानवाची स्मृती ही, त्याच्या या पाच इंद्रियांकडून मिळणाऱ्या ज्ञान-अनुभवातून सामान्यत: निर्माण होत असते, आणि अनेक जन्मांची स्मृती बरोबर घेऊनच तो प्रत्येक वेळी नवा जन्म घेत असतो. त्यामुळे त्याला या जन्मात येणारे अनुभव वा अनुभूती ह्या त्याला आत्ताच्या देहाकडे असलेल्या पंचेंद्रियांकडून मिळणाऱ्या ज्ञानाच्या स्मृतीतूनच मिळत आहेत असे ठामपणे म्हणता येत नसते.

शिवाय या पाच इंद्रियांकडून मिळणारे रस, रूप, गंध, स्पर्श आणि ध्वनीचे ज्ञान म्हणजे केवळ अनुभूती आहे आणि कुठल्याही प्रकारची अनुभूती ही ती घेणाऱ्याच्या संस्कार, आहार आणि विहारावर अवलंबून असते. म्हणून एकच प्रकारचा अनुभव एकाच वेळी दहाजणांना वेगवेगळ्या पातळीवरची अनुभूती देतो. कारण, समजा कुणाचातरी ध्वनी ऐकता येत असला तरी ऐकणाऱ्याला ध्वनी होता येत नसते! कुणाला गंध घेता येत असला तरी साक्षात् गंध होता येत नसते!! कारण जडशरीर नावाच्या माध्यमाला असलेल्या कर्ण आणि नाक या अवयवांद्वारा फक्त अनुभूतीच घेता येत असते. ज्याची अनुभूती घेतोय त्याचाच अविभाज्य भाग होता येत नसते! तसे होता यावे यासाठीच तर अध्यात्म आणि योगमार्गाचा अवलंब करावा

असे सनातन वैदिक धर्माने सांगितले. खरोखरच असं ज्याला होता येतं त्याला नुसत्या गंधाने 'पाहता' येतं, नुसता ध्वनी ऐकून गंध 'ओळखता' येतो आणि नुसत्या नेत्रांनी पाहून 'रसपाना'ची अनुभूती घेता येते!

याला कारण असं की या प्रत्येक इंद्रियाकडून मिळणाऱ्या माध्यमामागे या माध्यमांना म्हणजे ते ते वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या इंद्रियांना जन्माला घालणारा मानवी शरीरापेक्षाही तरल पातळीवरचा तसाच वैशिष्ट्यपूर्ण सूक्ष्म अस्तित्वांचा शक्तिमान आणि प्रामाणिक स्त्रोत आहे! याची 'जाणीव' आपल्या ऋषी-मुनींना झाल्यामुळे त्यांनी, विविध पुजाविधींच्या सुरवातीस म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांद्वारा दैवतांकडे आपल्या निरनिराळ्या अवयवांचं रक्षण करा अशा प्रार्थना केल्या!!

आणखी सोप्या भाषेत सांगायचं तर केवळ ध्वनी म्हणून वावरणारी, केवळ गंध म्हणूनच वावरणारी किंवा केवळ रस म्हणजे आर्द्रता, केवळ रूप म्हरजे प्रकाश आणि केवळ स्पर्श म्हणजे संवेदना म्हणून वावरणारी सूक्ष्म अस्तित्व आहेत!

आपली भक्ति, आपली एकाग्रता किंवा आपल्या साधनेमुळे आपल्या मेंदूतील गंध, स्पर्श, रस, रूप, ध्वनी यांच्यापैकी कुठलीही संवेदना देणारे मेंदूतील मज्जातंतू अधिकाधिक झंकारून तरल किंवा तरलतम अवस्थेत जातात आणि गंध, संवेदना, आर्द्रता, प्रकाश, ध्वनी म्हणूनच अस्तित्वात असणाऱ्या सूक्ष्मांच्या जगाशी संपर्कीत करतात!

'गंध'र्व – गंधर्व म्हणजेच देवगंधर्व आणि मनुष्यगंधर्व ही सूक्ष्मातील अस्तित्वे 'गंध' म्हणूनच वावरत असतात!

ताई, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे तुम्हाला हमखास सुगंधाची अचानक अनुभूती येत असेल तर तुमच्या भक्ति किंवा साधनेमुळे तुमचा संपर्क गंधर्वयोनीशी जोडला जाण्याची प्रक्रिया घडू पहातेय !

परंतु सूक्ष्माशी होणारा हा संपर्क अत्यंत अवधानपूर्वक, नम्रतेनं आणि समजुतदारीच्या भूमिकेतून व्हायला हवा. अशी भूमिका फक्त गुरूसमोर विनम्र होऊनच तयार होत असते.

तुम्ही साईबाबांच्या भक्त आहात. बाबांना गुरू मानता म्हणून यापुढे जेव्हा सुगंध येईल तेव्हा बाबांसमोर उदबत्ती लावून प्रार्थना करा की, 'असा सुगंध का येतो, कुठून येतो आणि या सुगंधासाठी माझं (म्हणजे ताई तुमचं) उत्तरदायित्व काय आहे याचे कृपया मार्गदर्शन व्हावे व माझे रक्षण करावे.'

या प्रार्थनेनंतर बाबा यथावकाश तुम्हाला निश्चितच मार्गदर्शन करतील. तशी मीही बाबांच्या चरणी तुमच्यासाठी आत्ता याक्षणी प्रार्थना करीत आहे!

– साईसेवक श्रुतनाथ

## आभार!

आम्ही 'श्री साईलीला'च्या नोव्हेंबर-डिसेंबर, १९९२च्या अंकातून सर्व साईभक्तांस प्रत्येकाने 'श्री साईलीला'स पाच वर्गणीदार मिळवून देऊन 'श्री साईसेवा' करावी असे आवाहन केले होते. त्याप्रमाणे खालील साईभक्तांनी प्रतिसाद दिला आहे. त्यांचे आभार. या भक्तांना बाबांचा आशीर्वाद म्हणून बाबांच्या शिरडी येथील धुनीतील पवित्र उदीही पाठविण्यात आली आहे!

१. श्री. एस्. बी. धाडवे, नवीन सिडको, नाशिक.
२. श्री. प्रकाश नारायण नाईक, फोंडा, गोवा.
३. श्री. रामचंद्र बळीरामजी बारअी, काटोल, नागपूर.
४. श्री. उत्तम लक्ष्मणराव लाहोरकर, हदगाव, नांदेड यांनी १२ सभासद केले आहेत.
५. श्री. रमण सुदाम पवार, अंजनगाव, सुर्जी, अमरावती.
६. श्री. एस्. के. वडे, पालघर, ठाणे.
७. श्री. दशरथ शंकर बोऱ्हाडे, जुन्नर, पुणे.
८. श्री. राजगोपाळ मुरलीधर दाड, बारड, नांदेड.
९. श्री. डी. के. मंत्रवादी, म्हापुसा, गोवा.
१०. श्री. डी. एम्. देशपांडे, शास्त्रीनगर, भंडारा.
११. श्री. एच्. बी. काशीकर, रामनाथपूर, हैद्राबाद.
१२. श्री. प्रकाश विठ्ठल सुगंधी, विजापूर, कर्नाटक.
१३. श्री. कृष्णा व्यंकटेश स्वामी, मुखेड, नांदेड.
१४. श्री. व्यंकटेश कृ. तेलकर, हुबळी, कर्नाटक.
१५. श्री. विठ्ठल धर्माजी भोईर, कळवा, ठाणे.
१६. श्री. जगन्नाथ बाबू संखे, मुरबे, ठाणे.
१७. श्री. सदानंद भिकाजी धुरी, भांडुप (प.), मुंबई.
१८. श्री. शाम जुवळे, दादर (प.), मुंबई.
१९. सौ. चित्रा रविंद्र चुरी, चिंचणी, ठाणे.
२०. श्री. सतीश महादेव अवचट, सदाशिव पेठ, पुणे.
२१. श्री. नारायण देविदास तळेकार, भुसावळ.
२२. श्री. आर. एस्. नागूल, नाशिक.
२३. श्री. विजय ज. टांककर, लोअर परेल, मुंबई.
२४. श्री. विलास शामरावजी कोडाप, गडचिरोली.
२५. श्री. प्रशांत एस्. सारंग, भांडुप, मुंबई.
२६. श्री. प्रकाश दत्तात्रय शितोळे, फोंडाघाट, सिंधुदूर्ग.
२७. श्री. प्रभाकर रा. देशपांडे, डोंबिवली (प.), ठाणे.
२८. कु. रामचंद्र काना वेटा, कोपरखैरणे, नवी मुंबई.